साने गुरुजींच्या गोड गोष्टी : २

घामाची फुले



केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई.

करी मनोरंजन जो मुलांचे । जडेल नाते प्रभुशी तयाचे ।।

सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी

"करी मनोरंजन जो मुलांचे।
जडेल नाते प्रभुशी तयाचे॥"

गोड गोष्टी : भाग दुसरा

घामाची फुले

: लेखक :
सानेगुरुजी, एम्. ए.

सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी सानेगुरुजींच्या गोड गोष्टी

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

किंमत १५ रूपये

वाचनालय

©केशव भिकाजी ढवळे

पहिली आवृत्ती १९४१,
सव्वीसावी आवृत्ती १९९१
पुनर्मुद्रणे १९९२, १९९३, १९९४
१९९६,
एकतिसावे पुनर्मुद्रण :डिसेंबर १९९८

टाईपसेटिंग
अक्षय फोटो टाइपसेटर्स
१- चित्रकूट
डॉ. आंबेडकर मार्ग, ठाणे ४०० ६०१

मुद्रक
जस्मिन आर्टस्
सदाशिव गणेश परूळकर
वडाळा उद्योग भवन
वडाळा, मुंबई ४०० ०३१

प्रकाशक
ज्योती धनंजय ढवळे
केशव भिकाजी ढवळे
पहिली भटवाडी, गिरगाव,
मुंबई ४०० ००४

गोष्टी म्हणजे खाऊ

गोड गोष्टींचा हा दुसरा भाग. यातील गोष्टी मुळात माझ्या नाहीत. पहिली गोष्ट 'स्वर्गातील माळ.' ही पुष्कळ वर्षांपूर्वी ट्रेझर चेस्टमध्ये मी वाचली होती. ती गोष्ट मी पुढे अनेकांना सांगितली. मी माझ्या भाषेत सांगे. मधून मधून विचार घाली. ती गोष्ट येथे मी दिली आहे. दुसरी गोष्ट 'जाई.' इंग्रजीत 'डोरा' म्हणून एक फारच सुंदर कविता आहे. त्या कवितेतील गोष्टींच्या स्मरणाने ही गोष्ट मी लिहून काढली आहे. तिसरी गोष्ट 'बासरीवाला.' ही गोष्ट 'शिशुसाथी' या बंगाली बालमासिकात मी वाचली होती, ती गोष्ट आठवून मी ही लिहिली आहे. चौथी गोष्ट 'अश्रूंचे तळे' कोठल्या तरी हिंदी साप्ताहिकात १२ - १३ वर्षांपूर्वी ही गोष्ट मी वाचली होती. तीच गोष्ट मी येथे आठवून लिहिली आहे. तिच्यात नवीनही काही घातले आहे. पाचवी गोष्ट 'ज्याचा भाव त्याचा देव.' ही गोष्ट स्वामी विवेकानंदांनी लिहिली. भगिनी निवेदिता यांनी ती इंग्रजीत लिहिली. मी ती मराठीत देत आहे. अर्थात भाषांतर करून नव्हे. मी माझ्या विशिष्ट पद्धतीने ती मांडली आहे, सजविली आहे. सहावी गोष्ट 'थोर त्याग.' बंगालमधील थोर संत चैतन्य यांच्या चरित्रातील एका प्रसंगावर ही सत्यकथा मी लिहिली आहे. सातवी गोष्ट 'मातृभक्ती.' बंगाली मासिक 'शिशुसाथी' यात १२ - १३ वर्षांपूर्वी अशा आशयाची गोष्ट मी वाचली होती. ती स्मरून मी ही लिहिली आहे. आठवी गोष्ट 'बहुला गाय.' बायकांमध्ये रूढ असलेल्या बहुला गाईच्या गाण्याच्या आधाराने ही गोष्ट मी लिहिली आहे. नववी गोष्ट 'घामाची फुले.' रामायणातील एका प्रसंगावरून ही गोष्ट मी लिहून काढली आहे.

अशा या नऊ गोष्टी आहेत. या गोष्टी भाषांतररूप नाहीत. या गोष्टी शेकडो मुलांना मी तुरुंगात व बाहेर सांगितल्या आहेत. त्या त्यांना आवडत. ती मुले म्हणत, 'या लिहून काढा.' तुरुंगात जे सत्याग्रही तरुण या गोष्टी ऐकत ते म्हणत, 'या लिहून काढा. आम्हालाही मुलांना सांगायला त्या उपयोगी पडतील. खेड्यांतून मुले जमवता येतील.' गोष्टी म्हणजे खाऊ. हा खाऊ दिला म्हणजे मुले प्रसन्न होतात.

गोष्टी जरी मी माझ्या भाषेत, मधून मधून नवीन कल्पना, विचार घालून मांडल्या असल्या, समोर त्या त्या मूळ गोष्टी जरी नसल्या, तरी या गोष्टींचे सारे श्रेय मला नाही. ते श्रेय मूळच्या कल्पक लेखकांचे आहे. मी आपला 'फोडिले भांडार धन्याचा हा माल। मी तंव हमाल भारवाही ॥' या श्रीतुकारामहाराजांच्या वचनाप्रमाणे हमाल आहे. माल वाटीत आहे. हा माल मुले गोड मानून घेतील अशी आशा आहे.

साने गुरुजी

भाग दुसरा : घामाची फुले

अनुक्रमणिका

स्वर्गातील माळ	५
जाई	१४
बासरीवाला	२७
अश्रूंचे तळे	३५
ज्याचा भाव त्याचा देव	४२
थोर त्याग	५०
मातृभक्ती	५८
बहुला गाय	६७
घामाची फुले	७४

घामाची फुले : कथा पहिली

स्वर्गातील माळ

गावाचे नाव होते आमोदे. मोठे सुंदर होते गाव. नावाप्रमाणेच गावाची कीर्ती होती. आमोद म्हणजे सुवास. त्या गावाच्या कीर्तीचा सुवास आजूबाजूस सर्वत्र पसरला होता. गावातील सारे लोक सुखी होते. गाव स्वच्छ होता. गावाला वेत्रवती नदीमुळे शोभा आली होती. सकाळ-संध्याकाळ केव्हाही पाहा. नदीचे तीर मुलाबाळांनी, बायामाणसांनी, गुराढोरांनी गजबजलेले दिसे.

आमोदे गाव उदार होते. सारे लोक प्रेमळ होते. एकमेकांस मदत करीत. कोणी कोणाचे उणे पाहात नसे. द्वेष नाही, मत्सर नाही; परंतु अलिकडे काय झाले कोणास कळे. पूर्वीसारखे ते गाव राहिले नाही. प्रेम कमी झाले. सहानुभूती नाहीशी झाली. जो तो स्वत:पुरते पाहू लागला. कोणी मानासाठी हपापले. कोणी सत्तेसाठी. गावातील सुख संपले. भांडणे सुरू झाली. आमोदे गावाला उतरती कळा लागली.

पूर्वी या गावाची एक आख्यायिका होती. दर वर्षी दिवाळी आली म्हणजे स्वर्गातील माळ या गावात येई. ज्याने सर्वांत सुंदर देणगी दिली असेल त्याच्या गळ्यात ती माळ पडत असे. देवाघरची माळ, तिचा वास दशदिशांना पसरे; परंतु अलिकडे बारा वर्षांत तशी माळ आली नाही. गावाची पुण्याई संपली. देवाची अवकृपा झाली. देवाला आवडणारे कृत्य जणू कोणीच करीना; देवाला आवडेल अशी देणगी कोणी देईना.

परंतु या वर्षी अशी दाट वदंता उठली होती की, स्वर्गातील माळ येणार येणार! भविष्य करण्यात आले होते. कोणाच्या गळ्यात पडणार ती माळ?

लोकांचे तर्क सुरू झाले. कोणी नास्तिक व शंकेखोर म्हणू लागले, 'कसची येते माळ! गेले ते पूर्वीचे दिवस. साऱ्या गप्पा आहेत.'

त्या आमोदे गावात एक श्रीमंत जमीनदार राहात होता. त्याचे टुमदार घर होते. त्याला मुलगा नव्हता, परंतु तीन मुली होत्या. तिन्ही मुली मोठ्या सुंदर होत्या. हिरी, माणकी व रुपी अशी त्यांची नावे होती. त्यांच्याकडे एक मुलगी कामाला येत असे. त्या मुलीचे नाव होते सखू.

सखूची आई गरीब होती. ती मोलमजुरी करी. तिचा नवरा वारला होता. तिला सखू एवढी एकच मुलगी होती. आमोदे गावात ती नुकतीच आलेली होती. सखू फार लहान नव्हती, फार मोठी नव्हती. त्या श्रीमंताच्या मुलींच्या बरोबरीचीच ती होती. असेल बारा- तेरा वर्षांची. सखू प्रेमळ होती, प्रामाणिक होती, सारे काम टापटिपीने व स्वच्छतेने करी.

एके दिवशी हिरी, माणकी व रुपी अगदी कामाच्या गर्दीत होत्या. कोणते होते काम? त्या तिघी बहिणी काही तरी बांधीत होत्या. काही वस्तू कोणाला पाठवीत होत्या. वस्तू बांधता बांधता त्या एकमेकींशी बोलत होत्या.

हिरी म्हणाली, 'माझी देणगी देवाला आवडेल. शाळेत जे पुस्तक मला बक्षीस मिळाले, ते मी माझ्या एका मैत्रिणीस पाठवीत आहे. स्वतःचं बक्षीस कोणी दुसऱ्यास देतो का? परंतु मी ते देत आहे.'

माणकी म्हणाली, 'माझ्या वाढदिवशी बाबांनी जे सुंदर रेशमी पातळ मला दिलं, ते मी भेट म्हणून मैत्रिणीस पाठवीत आहे. देवाला माझी देणगी आवडेल.'

रुपी म्हणाली, 'मी माझी सुंदर बाहुली इंदापूरच्या मैत्रिणीस पाठवीत आहे. त्या बाहुलीवर माझा जीव की प्राण. तिला मी किती दागिने केले, किती तिला नटविली! परंतु अशी ती बाहुली मी आज पाठवीत आहे.'

सखू त्या बहिणींना मदत करीत होती. ती त्या वस्तू नीट बांधीत होती. त्या वस्तू का पाठवायच्या तिला कळेना. तिच्याने राहवेना. तिने शेवटी विचारले,

'तुम्ही आज ह्या वस्तू का पाठविता? सांगा ना हिराताई.'

'अग, आता दोन दिवसांनी दिवाळी येणार. दिवाळीच्या दिवशी आकाशातून माळ येणार. स्वर्गातील फुलांची माळ. देवाच्या घरची माळ! ज्याची देणगी देवाला आवडेल, त्याच्या गळ्यात ती माळ पडेल. साऱ्या गावात बातमी पसरली आहे. गेली बारा वर्षं माळ आली नाही. पूर्वी येत असे. यंदा पुन्हा येणार

असं म्हणतात. म्हणून गावातील लहान-थोर सारी देणग्या देत आहेत. प्रत्येकाला वाटतं आहे की, ती माळ स्वतःच्या गळ्यात पडावी. सखू, तू कोणती देणगी देणार?' हिरीने हसून विचारले.

सखू म्हणाली, 'मी कोणती देणार देणगी? माझ्याजवळ काय आहे देण्यासारखं? ना पातळ, ना खण; ना खेळणं, ना पुस्तक. माझी आई गरीब आहे. आम्ही काय देणार? तुमच्या गळ्यात माळ पडली तर त्यातच माझा आनंद. ज्या घरी मी कामाला जाते, त्या घरात माळ आली, तर ती मला मिळाल्यासारखीच आहे. अशा पुण्यवंताच्या घरी मला काम करायला मिळालं असं मनात येऊन मी आनंदानं नाचेन; अधिकच नेटानं तुमचं काम करीन. झालं ना हे नीट बांधून?'

'सखू कसं सारं छान करते. आम्हाला नाही जमत.' रुपी म्हणाली.

'आणि तरी ती शाळेत जात नाही.' माणकी म्हणाली.

त्या आमोदे गावात देणग्या देण्याची लाट उसळली होती. नास्तिक व शंकेखोरसुद्धा देणग्या देऊ लागले! मोठेमोठे शेटसावकार, तेही पुढे सरसावले. कोणी आपल्या नावाने धर्मशाळा बांधली; कोणी एक विहीर बांधून तिच्या कट्ट्यात स्वतःच्या नावाचा दगड बसविला; असे प्रकार चालले होते.

होता होता दिवाळी आली. उजाडत्या पहाटे मंगलस्नाने करायची. आज रात्री ती माळ येणार! गावात उत्सुकता उचंबळली होती. लहान-थोरांच्या तोंडी एकच विषय. जिकडे जाल तिकडे एकच बोलणे कानांवर येई. माळ येणार, कोणाला मिळणार?

सायंकाळ होत आली. त्या तीन मुलींचे आईबाप छानदार गाडीत बसून बाहेर फिरायला गेले होते. घरी मुलीच होत्या. त्यांनी घरासमोर सुंदर सडा घातला. त्यावर सुरेख रांगोळी काढली. सखू त्यांना मदत करीत होती. मातीच्या पणत्या तयार करण्यात आल्या. सखूने त्यांच्यात वाती घातल्या, तेल घातले.

दिवे लागायची वेळ झाली. एकाएकी चमत्कार झाला. आकाशात काळेकाळे ढग जमा होऊ लागले. फारच भयंकर काळोखी आली. विजा चमकू लागल्या. कडकडाट, गडगडाट होऊ लागला. लहान मुले भिऊ लागली. प्रचंड वारा सुटला. मोठे वादळ होणार, प्रचंड तुफान होणार!

पाऊस पडू लागला. जोराचा पाऊस, मुसळधार पाऊस. पावसाळ्यात असा पाऊस पडत नव्हता. जिकडे तिकडे पाणीच पाणी. खळखळ पाण्याचे प्रवाह वाहात होते. पाऊस थांबेना, वारा थांबेना. कडाड्कडा! अरे बाप रे! केवढा आवाज! कोठे तरी खास वीज पडली असावी. त्या तिन्ही मुलींच्या पोटात धस्स झाले! त्यांचे आईबाप बाहेर गेलेले होते. वादळात आईबाप सापडले!

गावात जिकडे तिकडे अंधार. दिवाळीचा दिवस, परंतु एकही दिवा बाहेर दिसेना, कारण त्या वाऱ्यात एकही दिवा टिकेना. पणत्या लावून बाहेर आणाव्या तो विझून जात! सुखाची माळ, ती स्वर्गातील माळ येण्याचे दूरच राहिले. प्रलयकाळची रात्र आली असे सर्वांस वाटले. वेत्रवती नदीचे पाणी वाढू लागले. घो घो आवाज ऐकू येऊ लागला. गाव वाहून जाणार की काय? इतका का पापी झाला गाव? देवाला का नकोसा झाला हा गाव? की स्वर्गातील माळ पाठविण्यापूर्वी देव तो गाव धुवून टाकीत होता? त्या गावातील सारी घाण दूर करीत होता?

हिरी म्हणाली, 'आज दिवाळी, परंतु एकही दिवली बाहेर लावता येत नाही.'

माणकी म्हणाली, 'वास्तविक दिवाळीच्या दिवशी हजारो पणत्या लागायच्या; परंतु आज आपला काळोख.'

रुपी म्हणाली, 'सखू, तू तरी एखादी युक्ती सांग बाहेर दिवे लावायची.'

सखू म्हणाली, 'आपल्या घरातील सारे कंदील आपण बाहेर टांगू या. ते वाऱ्यात थोडे तरी टिकतील आणि घरात पणत्या लावू. दारे घेऊ लावून. म्हणजे त्या घरात टिकतील. बाहेर प्रकाश व आतही प्रकाश. नाही का?'

माणकी म्हणाली, 'सखू, तुला कसं सुचतं? आम्ही शाळेत जातो, परंतु आम्हाला सुचत नाही. आमच्या डोक्यात उजेड नाही, तर बाहेर काय पडणार?'

सखूने सांगितले त्याप्रमाणे करण्यात आले. घरातील सारे कंदील बाहेर लावण्यात आले. बाहेर थोडा उजेड झाला. आकाशात लख्खकन् वीज चमकली. त्या मिणमिण कंदिलांना ती वीज का हसली? आकाशातील विजे! हस, खुशाल हस. तुझा प्रकाश झगमगीत असला तरी त्याचा काय उपयोग? त्याने डोळे मात्र दिपून जातात. या कंदिलांचा प्रकाश सौम्य असला तरी त्याने रस्ता दिसतो, पाऊल कोठे टाकावे ते कळते.

पाऊस अद्याप थांबला नव्हता, पडतच होता. त्या तिन्ही मुलींचे आईबाप अद्याप परतले नव्हते. त्या मुलींना भुका लागल्या.

रुपी म्हणाली, 'सखू, आईबाबा केव्हा येणार? मला तर लागली आहे भूक. वाढतेस आम्हाला तू? वाढ फराळाचं.'

हिरी म्हणाली, 'खाऊ या काही तरी.'

माणकी म्हणाली, 'चला आपण बसू. सखू, वाढ तू आम्हाला.'

सखूने तीन केळीची पाने मांडली. पानाभोवती तिने रांगोळी घातली. नंतर करंज्या, अनरसे, सांजोऱ्या, चकल्या, कडबोळी वगैरे दिवाळीचे पदार्थ तिने वाढले. तिघी बहिणी खाऊ लागल्या. त्यांना खाताना पाहून सखूचे पोट भरून येत होते.

रुपी खाता खाता म्हणाली, 'पाऊस केव्हा थांबणार? आई केव्हा येणार?'

हिरी म्हणाली, 'थांबेल लवकरच. गावाबाहेरच्या देवळाजवळ बाबा थांबले असतील.'

माणकी म्हणाली, 'आईला, बाबांना देव सुखरूप आणो. भिजून गेली असतील. म्हणत असतील मनात की, पोरी भुकेल्या असतील. आपण तर बसलोसुद्धा चाऊमाऊ करायला.'

इतक्यात दारावर टकटक आवाज झाला. कोणी तरी आले. कोण आले?

रुपी म्हणाली, 'जा सखू, बाबा आले.'

हिरी म्हणाली, 'पावसातून आले. धाव सखू.'

माणकी म्हणाली, 'जरा खायचं थांबू या.'

सखू लगबगीने धावतच गेली. तिने दार उघडले. तो कोण होते तेथे? तेथे आईबाप नव्हते. गाडी नव्हती. मग कोणी मारली होती दारावर थाप? तेथे एक लहान मुलगा उभा होता. कंदिलाच्या अंधुक प्रकाशात त्याचे केविलवाणे तोंड दिसत होते.

'कोण रे तू बाळ?' सखूने मंजुळवाणीने विचारले.

'मी एक अनाथ मुलगा आहे. मला आई ना बाप; बहिण ना भाऊ. मी एकटा आहे. या जगात मी एकटा आहे. भटकत भटकत या गावी आलो. म्हटलं, दिवाळीच्या दिवशी ओमोदे गावी जावं. लोक तिथं देणग्या देत आहेत. आपणासही काही मिळेल; परंतु पोटात काही नसल्यामुळं गावात येईतो अंधार

पडला. मुसळधार पाऊस पडू लागला. मला रस्ता सापडेना. काटे बोचले, दगडांवर ठेचा लागल्या. मी सारा भिजून गेलो आहे. मी गारठून गेलो आहे. पोटात काही नाही. मी दमून गेलो आहे. एक पाऊल टाकणंही कठीण. मला घेता का घरात ? मला मानता का भाऊ ? माझी होता का बहीण ? येते का गरिबाची दया ? करता का माझी कीव ?' तो अनाथ मुलगा कसे पण बोलत होता !

सखूचे हृदय विरघळले. 'ये हो बाळ, ये', असे ती म्हणाली. त्याचा हात धरून ती त्याला घरात घेऊन आली. त्या तिन्ही बहिणींनी पाहिले, तो आई नाही, बाबा नाहीत. समोर एक भिकारडा पोरगा !

माणकी म्हणाली, 'सखू, कोणाचा हा मुलगा ? असेल कोणी भामटा ! त्याला का घरात घ्यायचं ?'

हिरी म्हणाली, 'भिकारडा आहे. अंगावर नाही धड चिंधी, पाय चिखलात बरबटलेले. घाणेरडे पाय घरात आणलेन.'

रुपी म्हणाली, 'जा रे पोरा, तुला लाज नाही वाटत ?'

सखू म्हणाली, 'ये हो बाळ. त्यांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नकोस. चल, तुला कढत पाणी देत्ये. अंगाला तेल लावत्ये. नीट अंघोळ कर. मग पोटभर फराळ कर. आज दिवाळी. मी एकटी आहे. देवानं मला भाऊ दिला.'

सखूने त्याच्या अंगाला तेल लावले. त्याला कढत पाणी दिले. त्याचे अंग पुसले. एका केळीच्या पानावर त्याला फराळाचे वाढले.

माणकी म्हणाली, 'सखू, त्याला स्वयंपाकघरात कुठं आणलंस ? सारं घर बाटवलंस ! कोणाचा मुलगा आहे देव जाणे !'

हिरी म्हणाली, 'सखू, तू माजलीस होय ? म्हणे त्यांच्या बोलण्याकडे लक्ष नको देऊ ! थांब, आईला येऊ दे, म्हणजे तुला काढून टाकायला सांगत्ये.'

रुपी म्हणाली, 'आणि त्याला फराळाचं तरी किती वाढलं आहेस ? त्या देण्याघेण्याच्या कमी पुरणाच्या करंज्या का वाढल्या नाहीस त्याला ?'

सखू म्हणाली, 'मी माझा वाटा त्याला दिला. आज मी तुमच्याकडे जेवणार नाही, खाणार नाही. म्हणजे झालं ना ?'

रुपी रागाने म्हणाली, 'आम्हाला लाजवतेस वाटतं ? वाहवा ग वाहवा ! म्हणे माझा वाटा दिला !'

सखू त्या मुलाला म्हणाली, 'बाळ, पोटभर जेव. मग मी माझ्या आईच्या घरी तुला पोचवीन. तिथं तू झोप हो.'

माणकी त्या मुलाकडे पाहात म्हणाली, 'काय रे पोरा, तू कोठल्या गावचा?'

तो मुलगा म्हणाला, 'माझ्या गावाचं नाव आनंदपूर.'

हिरी म्हणाली, 'मग आनंदपूर सोडून इकडे दुःखात कशाला आलास?'

तो मुलगा म्हणाला, 'माझ्या गावासारखा दुसरा गाव जगात आहे की नाही ते पाहाण्यासाठी आलो!'

रुपीने विचारले, 'तुझ्या गावात काय आहे?'

तो मुलगा म्हणाला, 'माझ्या गावात भांडण नाही, तंटा नाही, द्वेष नाही, मत्सर नाही. कोणी कोणाला तुच्छ मानीत नाही, हीन समजत नाही. सारे उद्योग करतात. एकमेकांस मदत करतात. माझ्या गावात लोकांची मनं प्रेमानं भरलेली असतात. नद्या, विहिरी पाण्यानं भरलेल्या असतात. झाडंमाडं फुलाफळांनी भरलेली असतात. शेतंभातं धान्यानं भरलेली असतात. माझ्या गावात रोग नाही, दुष्काळ नाही, दारिद्र्य नाही, दास्य नाही.'

माणकीने विचारले, 'तसा दुसरा गाव तुला आढळला का?'

तो मुलगा म्हणाला, 'अजून नाही.'

हिरी म्हणाली, 'दिसतो भिकारडा, परंतु बोलतो तर छान.'

सखू म्हणाली, 'चल बाळ, तुला आईकडे पोचविते. उद्या पायातील काटे काढीन. आता झोप. चल.'

सखू त्या मुलाचा हात धरून निघाली, तो पाऊस थांबला. आकाश निवळले. ढग गेले. आकाशातील लाखो तारे चमचम करू लागले. सारे गाव धुवून निघाले. वारे थांबले. लोकांनी दिवे लावले. हजारो पणत्या घरांसमोर चमकू लागल्या. आकाशात तारे व खाली हजारो दिवे. दिवाळी आली असे वाटू लागले. हिरी, माणकी, रुपी यांनी बाहेर पणत्या लावल्या. कशा दिसत होत्या त्यांच्या ज्योती! शांत, शीतल, सौम्य प्रकाश.

हिरी म्हणाली, 'या ज्योती हिऱ्यांप्रमाणं चमकत आहेत.'

माणकी म्हणाली, 'माणिकमोत्यांप्रमाणं तळपत आहेत.'

रुपी म्हणाली, 'सोन्यारुप्याप्रमाणं झळकत आहेत.'

सखू म्हणाली असती, 'निर्मळ प्रेमानं झळकत आहेत.'

या तिन्ही मुलींचे आईबाप घरी येण्यास निघाले. त्यांची गाडी येत होती. इतक्यात गावातील सारी लहान-थोर मंडळी, स्त्रीपुरुष, मुलेबाळे, सारी 'माळ आली, माळ आळी; सुगंध आला; कुठं तरी माळ आली; त्या बाजूनं घमघमाट येतो आहे तिकडे चला.' असे म्हणत धावत-पळत त्या श्रीमंताच्या घराकडे येत होती. त्या जमीनदाराची गाडी कशीबशी घराशी आली. गाडी सोडण्यात आली. बैल बांधण्यात आले. तो श्रीमंत मनुष्य तेथे उभा राहिला. त्याच्या मुली घरातून धावत आल्या. त्या आईबापांस भेटल्या. घरासमोर तुफान गर्दी. वास तर येत होता; परंतु माळ कोठे आहे ? ती का आकाशातून खाली येण्यासाठी निघाली होती ? हा सुगंध का पुढे आला ?

सखू त्या मुलाला घरी निजवून परत येत होती. आपल्या धन्याकडे येत होती, तो अपरंपार गर्दी. कशी तरी ती धन्याच्या घराच्या ओट्यावर चढली. इतक्यात त्या तिन्ही बहिणी आश्चर्याने म्हणाल्या, 'अग अग सखू, अग तुझ्या गळ्यात माळ ! ही बघ माळ. स्वर्गातील माळ तुझ्या गळ्यात ! तिचाच हा घमघमाट ! सखूच्या गळ्यात माळ !'

लोक ओरडले, 'काय, सखूच्या गळ्यात माळ? एका मोलकरणीच्या पोरीच्या गळ्यात? हा सर्व गावाचा अपमान आहे.'

शंभुशेट म्हणाले, 'मी एका शाळेला लाख रुपये दिले; परंतु मला माळ नाही. देव अन्यायी आहे!'

भिकाशेट म्हणाले, 'मी माझ्या नावानं विहीर बांधली; परंतु मला माळ नाही. अन्याय आहे!'

सखू म्हणाली, 'काही तरी चूक झाली असावी. माझ्या गळ्यात कशाला माळ? ज्या धन्याकडे मी काम करते, त्यांच्या घरातील कोणाच्या गळ्यात ती पडायची असेल. चुकून माझ्या गळ्यात पडली असावी. मला भिकारडीला कशाला माळ! मी कोणती अशी देणगी दिली?'

इतक्यात तो लहान मुलगा तेथे येऊन उभा राहिला. त्याच्या तोंडाभोवती दिव्य प्रभा होती. जणू सूर्य उगवला. चंद्र उगवला. सारे टकमका पाहू लागले. तो मुलगा म्हणाला, 'सखू, तूच खरी देणगी दिलीस. या गावातील प्रत्येक घराचा दरवाजा मी ठोठावला, म्हटले, 'मला, अनाथाला आधार द्या.' परंतु 'असशील कोणी भामटा. असशील चोरचिलटाचा. असशील कोणत्या हीन जातीचा. नीघ येथून.' अशीच उत्तरं मला मिळाली. फक्त या सखूनं मला म्हटलं, 'ये हो बाळ. तुला न्हाऊमाखू घालते, जेवूखाऊ घालते.' शेटसावकारांनी का देणग्या दिल्या? त्यांनी जिवंतपणी आपली स्मारकं उभारली. आपल्या नावाचे दगड विहीरीतून, शाळांतून बसविले. ती त्यांची स्वतःची पूजा होती. त्यांनी स्वतःची प्रतिष्ठा दगडांनी उभारून ठेवली. देव अन्यायी नाही. देव न्यायी आहे. या संसारात सर्वांत थोर देणगी जर कोणती असेल तर ती निरपेक्ष प्रेम, भेदभाव सोडून दिलेलं प्रेम!'

'सबसे ऊँची प्रेम-सगाई।'

असे म्हणून तो मुलगा अदृश्य झाला! सारे खाली मान घालून गेले. सखूचे कौतुक करीत आयाबाया घरी गेल्या. त्या तिन्ही बहिणी सखूला म्हणाल्या, 'सखू, आम्ही शाळेत जातो. पुस्तके वाचतो; परंतु तुझ्यासारखे वागणे, बोलणेचालणे आम्हाला येत नाही. तुला कोण असं वागायला शिकवितं?'

सखू म्हणाली, 'मला कोण शिकवणार? मला शिकविणारी एक माझी आई. ती सांगत असते, 'सखू, आपण गरीब असलो तरी गोड बोलावं.' जे दुसऱ्यासाठी करता येईल ते करावं. कोणाला हिडीस-फिडीस करू नये./ सारी देवाची लेकरं.' तुम्ही वाईट नका वाटून घेऊ. ही माझी माळ मी तुमच्याच घरी ठेवीन. तुमच्या घरात तिचा सुगंध पसरो.'

तिघी म्हणाल्या, 'आमच्या जीवनात पसरो. सखूसारखं आमचंही जीवन होवो.'

* * *

घामाची फुले : कथा दुसरी

जाई

रामजी व राघो दोघे जीवश्चकंठश्च स्नेही, जणू एका घोटाने पाणी पीत, एका प्राणाने जगत. दिसायला शरीरे दोन, परंतु त्यांचे मन एक होते, हृदय एक होते. गावातील सर्वांना त्यांच्या मैत्रीचे कौतुक वाटे.

परंतु काही काही लोकांना ही अभंग मैत्री बघवतही नसे. त्या दोघांचे भांडण व्हावे असे त्यांना मनापासून वाटे आणि खरोखरच एके दिवशी तसे झाले.

त्या दिवशी कशावरूनतरी गोष्ट निघाली. रामजी व राघो हमरीतुमरीवर आले. एकमेकांचे तोंड न पाहाण्याचे त्यांनी ठरविले. राघो जरा मनाने हळवा होता. ज्या गावात आपण इतकी वर्षे परस्पर प्रेमाने वागलो तेथेच इतके भांडलो ह्याची त्याला लाज वाटू लागली. तो घरातून बाहेर पडेना. त्याचे चित्त कशातही रमेना. खाणे पिणे रुचेना. सुखाची झोप येईना. शेवटी तो गाव सोडून दूर देशी निघून गेला.

राघो आज येईल, उद्या येईल अशी त्याची बायको वाट पाहात होती; परंतु राघोकडून ना चिठी ना निरोप. त्याची बायकोही खंगू लागली. ती जेवू लागली म्हणजे नवऱ्याची तिला आठवण येई. पती कुठे असतील, ते जेवले असतील का? असे मनात येऊन तिचे डोळे भरून येत व तिचे जेवण संपे.

असे काही दिवस गेले. राघो परत आला नाही, परंतु त्याच्या मरणाची दुष्ट वार्ता मात्र आली. ती बातमी ऐकून राघोच्या बायकोने हाय घेतली. थोड्याच दिवसांनी तीही देवाघरी निघून गेली; परंतु लहानग्या जाईला आता कोण? ना आई ना बाप. लहान वयात जाई पोरकी झाली.

रामजीने आपल्या मित्राच्या मुलीला आपल्या घरी आणले. जाईची आई अंथरुणावर असता तो समाचारास जात असे. जाईला मी अंतर देणार नाही, असे मरणोन्मुख मातेला त्याने वचन दिले होते. आपण भांडलो म्हणून राघो गेला. राघोचे प्रेम खरोखर थोर. प्रेमभंग त्याला सहन झाला नाही, असे रामजीच्या मनात येई. मित्रप्रेमाचे ऋण कसे फेडावे? प्रेमाची का फेड करता येते? परंतु मनाचे काही तरी समाधान कृतज्ञता दाखवून मिळत असते. म्हणून रामजीने जाईला जणू आपली मुलगी मानली. तिचे तो सारे करी. तो जणू जाईचा आई-बाप बनला.

जाई चार-पाच वर्षांची होती आणि रामजीचा मुलगा मोहन, तो सात-आठ वर्षांचा होता. जाई व मोहन एकत्र खेळत. मोहन हूड होता, मोठा खेळकर. जाईही तशीच होती. दोघे शेतावर जात, झोल्यावर झोके घेत. कधीकधी घरीही मोहन जाईबरोबर खेळे. तो तिची बाहुली सजवून देई. तिचा खेळ मांडी. तिच्या भातुकलीत भाग घेई. 'मोहन, तू का मुलगी आहेस?' असे कोणी म्हटले की तो निघून जाई.

मोहन व जाई दोघे वाढत होती. दोघे देखणी होती. रामजी आपल्या मनात एक मनोरथ मांडीत होता. तो आपल्या मनात एक गोड स्वप्न रचीत होता. पुढेमागे मोहन व जाई यांचे लग्न लावून द्यावे, छान आहे जोडा, असे त्याच्या मनात येई. आपल्या मृत मित्रासही ह्यामुळे स्वर्गात आनंद होईल असे त्याला वाटे.

दिवसांपाठीमागून दिवस जात होते. महिन्यांमागून महिने जात होते. वर्षांमागून वर्षे जात होती. मोहन व जाई बहिण-भावाप्रमाणे वाढत होती,

निर्मळपणे वाढत होती, निष्पाप वृत्तीने वाढत होती. रामजीची इच्छा त्यांना काय माहीत? रामजीचे गोड स्वप्न त्यांना काय ठाऊक? रामजीने कधीही तशी शंका त्या मुलांना येऊ दिली नव्हती.

आता मोहन विशीच्या पलीकडे गेला. तो चांगलाच वाढला होता. हाडापेराने मोठा दिसे. अद्याप त्याच्या तोंडावर थोडी कोवळीक दिसत होती. जाईही पंधरा-सोळा वर्षांची झाली. रामजी त्या दोघांकडे बघे व प्रसन्नपणे हसे. तो आता वृद्ध होत चालला होता. आपली इच्छा आपल्या डोळ्यांदेखत पूर्ण करून घ्यावी असे त्याच्या मनात येऊ लागले.

एके दिवशी रामजीने मोहनला हाक मारली.

'काय बाबा?' त्याने मोहक वाणीने विचारले.

'मोहन, तू आज्ञाधारक मुलगा आहेस. तू मला फार आवडतोस. आता माझं वय होत आलं. फार दिवस ह्या जगात मी जगेन असं मला वाटत नाही.' असे म्हणून रामजी थांबला.

'बाबा, असं का म्हणता? तुम्ही आम्हाला पुष्कळ दिवस हवेत. आई कधीच सोडून गेली. तुम्हीही का जाणार? जाईला व तुमच्या मोहनला तुमच्याशिवाय कोण?' मोहन दुःखाने म्हणाला.

'मोहन, आज मी तुला मुद्दाम हाक मारली. माझी एक इच्छा आहे, ती तू पूर्ण कर. किती तरी वर्षं ती इच्छा माझ्या मनात आहे. पित्याची इच्छा पूर्ण करून देशील का त्याला समाधान?' रामजीने विचारले.

'बाबा, तुमच्यासाठी मी काय करणार नाही? सांगा तुमची इच्छा. ह्याच्या आधीच का सांगितली नाहीत ती?' मोहन म्हणाला.

'प्रत्येक गोष्टीची वेळ यावी लागते. बाळ मोहन, तुझं लग्न करावं असं माझ्या मनात येतं, तू आहेस तयार?' पित्याने प्रश्न केला.

'बाबा, आधी जाईचं करा. तुमच्या हातून आधी तिचं लग्न होऊ दे. तिला ना आई ना बाप. तुम्ही तिला आई-बापाची आठवण होऊ दिली नाहीत. तुम्ही तिचं सारं केलंत. तिचे सारे लाड पुरविलेत. आता एवढं आणखी करा.' मोहन म्हणाला.

'तुमचं दोघांचं लग्न मी एकदमच करणार आहे!' रामजी हसून म्हणाला.

'कोणता पाहिलात मुलगा? गरीब असला तरी चालेल; परंतु निरोगी, धडधाकट, प्रामाणिक व श्रमांना न कंटाळणारा असा पाहिला आहे ना? जाईला कोणतं पाहिलंत स्थळ?' मोहनने विचारले.

'नवरामुलगा जवळच आहे. जवळच राहातो. चांगला आहे. देखणा आहे, गुणी आहे.' पिता म्हणाला.

'कुठंसा राहातो?' मोहनने उत्सुकतेने विचारले.

'इथंच.' पिता बोलला.

'काय त्याचं नाव?' मोहनची उत्सुकता फारच वाढली.

'मोहन!' पिता शांतपणे म्हणाला.

क्षणभर कोणीही बोलले नाही. तेथे गंभीरता पसरली. पिता-पुत्र विचारात मग्न झाले. पिता पुत्राकडे बघत होता, पुत्र खाली बघत होता.

'अशक्य, अगदी अशक्य.' असे शब्द मोहनच्या कापऱ्या ओठांतून बाहेर पडले.

'काय अशक्य!' पित्याने विचारले.

'मोहनचं जाईशी लग्न होणं अशक्य.' मोहन म्हणाला.

'कोण म्हणतो अशक्य?' पित्याने प्रक्षुब्ध होऊन विचारले.

'मी म्हणतो.' मोहनने निश्चयाने सांगितले.

'मोहन, विचार कर. आतापर्यंत तू माझी कधीही अवज्ञा केली नाहीस. आजपर्यंत माझी आज्ञा पाळलीस. ही आज्ञाही पाळ. वृद्ध पित्याचं मन दुखवू नकोस.' रामजी म्हणाला.

'बाबा, ह्या एका गोष्टीशिवाय इतर काहीही सांगा. कड्यावरून उडी टाकायला सांगा; समुद्रात बुडी घ्यावयास सांगा; विषाचा पेला तोंडाला लावायला सांगा; आगीतून जावयास सांगा; – हा मोहन ते सर्व आनंदानं करील; परंतु ही गोष्ट नको.' मोहन दृढ स्वराने म्हणाला.

'का नको? ज्या दिवशी जाईला मी आपल्या घरी आणलं, त्या दिवसापासून हे स्वप्न मी माझ्या मनात खेळवीत आहे. इतकी वर्षं मनात धरलेली आशा, – ती का तू मातीत मिळवणार? मोहन, माझ्या घरात राहावयाचं असेल तर माझी आज्ञा मानली पाहिजे. माझ्या पित्यानं आज्ञाभंग कधी सहन केला नाही.

तुझा बापही स्वत:चा आज्ञाभंग सहन करणार नाही. मुलानं बापाचं ऐकलंच पाहिजे अशी आपल्या कुळाची परंपरा आहे. ही परंपरा तूही चालव.' रामजी म्हणाला.

'बाबा, जाई व मी बहीण-भावाप्रमाणे वागत आलो. दुसरा विचार कधी मनात आला नाही. बहिणीजवळ का लग्न लावायला मला सांगता? पिता झाला म्हणून त्याची अपवित्र आज्ञा ऐकायची की काय? पिता थोर आहे, परंतु पित्याहून सत्य थोर आहे. पावित्र्य थोर आहे, कुळाची पवित्र परंपरा चालवावी, अपवित्रता बंद करावी.' मोहन म्हणाला.

रामजीचा संताप अनावर झाला. क्रोधाने तो थरथरू लागला. शेवटी तो मोहनला म्हणाला, – 'तुला एक महिन्याची मी मुदत देतो; तेवढ्या अवधीत काय तो विचार कर. बऱ्या बोलानं मी सांगतो तसं करायला सिद्ध हो, नाही तर ह्या घरातून तोंड काळं करून चालता हो. तू माझा मुलगाच नाहीस असं मी समजेन. मोहन मेला असं मानीन. जा. माझ्यासमोर उभा नको राहूस.'

त्या दिवसापासून मोहन घरामध्ये फारच थोडा वेळ थांबे. जणू घर सोडून जाण्याचा तो अभ्यास करीत होता. तो कोणाजवळ बोलेना, हसेना, खेळेना. तो खिन्न व उदास दिसे. जाई त्याच्याजवळ जाई व गोड बोलण्याचा प्रयत्न करी; परंतु जाई जवळ येताच मोहन उठून जाई. जाईच्या डोळ्यांत पाणी येई. तिच्या जिवाची तगमग होई.

महिना संपला. पित्याने दिलेली मुदत संपली. एका सदऱ्यानिशी मोहन घरातून बाहेर पडला. सुखात वाढलेला मोहन! तो आता कोठे जाणार, काय खाणार, काय पिणार? तो एका लहानशा झोपडीत राहू लागला. तो मोलमजुरी करू लागला. तो उन्हातान्हातून श्रमे, खपे. कधी गवंड्याच्या हाताखाली काम करी, कधी शेतातील कुंदा खणायला जाई. त्याच्या कोमल हातांना फोड येत, परंतु हळुहळू सवय झाली. हातांना घट्टे पडले, उन्हातान्हात काम करून त्याचा चेहराही जरा राकट बनला.

मोहनने आता लग्न लावले. एका गरीब मजुराच्या मुलीशी त्याने लग्न लावले. तिचे नाव गजरी. मोहन व गजरी गरिबीत स्वर्ग निर्माण करीत होती. गजरीसुद्धा कामाला जाई. दोघे कष्टाने मिळवीत. परस्परांस प्रेम देत. मोहन गजरीला पाणी

आणून देई. तिलाही घरी वेळ असला तर मदत करी. एखादे वेळेस दोघे पहाटे दळीत. मोहन म्हणे, 'ओव्या म्हण.' गजरी गोड ओव्या म्हणे.

मोहनने लग्न लावले ही गोष्ट रामजीच्या कानावर गेली. तो म्हातारा खवळला. त्याच्या तळपायांची आग मस्तकाला गेली. त्याने जाईला हाक मारून सांगितले, 'पोरी, त्या कारट्याकडे खबरदार कधी गेलीस तर. त्याच्याकडे कधी गेलीस असं जर मला कळलं, तर तुलाही हे घर सोडावं लागेल. विचार करून वाग. समजलीस ?'

मोहनकडे जावे असे जाईच्या मनात कितीदा तरी येई, परंतु ती जावयास धजत नसे. मोहनही आपल्याजवळ धड बोलेल की नाही असे तिच्या मनात येई. ती मनातील दुःख कोणाजवळ बोलणार ? रामजी व मोहन दोघांकडे तिचा जीव ओढे. आपण गेलो तर वृद्ध रामजीस तरी कोण ?

जाईचा विवाह लांबणीवर पडला. तिचे लग्न करावे असे जणू रामजीच्या मनात येईना. जाई सासरी गेल्यावर मला म्हाताऱ्याला कोण, असा स्वार्थी विचार त्याच्या मनात येई. शिवाय जाई मोहनशी जोडलेली आहे, असे स्वप्न आज दहा - बारा वर्षे तो मनात खेळवीत होता. ते स्वप्न आपल्या हातांनी त्याला मोडवेना. जाईचा विवाह दुसऱ्या कोणाशी करण्याचा विचारही त्याला सहन होत नसे. आणि जाई ? तिच्या मनातही विवाहाचा विचार येत नसे. तिला रामजीची कीव येई. त्याची ती सेवा - चाकरी कृतज्ञतेने करी.

रामजीच्या घरात धान्याची कोठारे भरलेली होती; परंतु कोण खाणार ते धान्य ? तिकडे मोहनला उन्हातान्हात राबावे लागत होते. मेहनतीने भाकर मिळवावी लागत होती. जाईचा जीव खालीवर होई.

मोहन आपल्या वडिलांच्या घरावरून चुकूनही जात नसे. न जाणो, पित्याच्या वैभवाची, त्या घरादाराची, शेतीवाडीची इच्छा मनात उत्पन्न व्हावयाची. त्या बाजूने जाणेच नको. तसेच, स्वतःचा कृश झालेला देह जाईच्या दृष्टीस पडू नये म्हणूनही तो त्या बाजूने जात नसे. रामजी ओटीवर बसलेला असे. आपला मुलगा एक दिवस घरी परत येईल असे का त्याला वाटत होते ?

मोहनला श्रमाची सवय नव्हती. एकाएकी खूप श्रम त्याला पडू लागले. मनात दुसरीही दुःखे असतील. तो अशक्त दिसे. गजरी बाळंत झाली होती.

तिला आता कामाला जाता येत नसे. मोहनला घरचे करावे लागे, पुन्हा कामावर जावे लागे. तो अगदी थकून जाई.

एके दिवशी फारच दमून-भागून मोहन घरी आला. घरी आल्यावर तो आपल्या लहान मुलाला घेऊन खेळवीत होता. त्या मुलाचे हसे पाहून तो सारे श्रम विसरला; परंतु एकाएकी घेरी येईल असे त्याला वाटले. त्याने बाळ खाली ठेवला. तो पडला. गजरी धावत आली. तिने त्याला सावध केले, अंथरुणावर निजवले. मोहनच्या अंगात सपाटून ताप भरला. गजरी घाबरली. गरिबाला कोठले डॉक्टर ? गजरी रडत बसली. मोहन म्हणाला, 'रडू नकोस. तू रडलीस म्हणजे मला वाईट वाटतं. माझ्याजवळ बस. बाळाला घेऊन बस. त्यात मला समाधान आहे.'

मोहनचे दुखणे हटेना. त्याला कामावर जाता येईना. घरात खाण्यापिण्याची पंचाईत पडू लागली. जाईच्या कानांवर या गोष्टी गेल्या. रामजीला न कळत ती मोहनच्या बायकोकडे मदत पाठवी. कधी दूध, कधी फळे, कधी काही ती पाठवू लागली. मोहन मरणाच्या दारात होता. त्याला भेटण्यासाठी जाईचा जीव तडफडत होता; परंतु ती जाऊ शकली नाही. तिची व मोहनची भेट ह्या जगात जणू पुन्हा व्हावयाची नव्हती. मोहन मरण पावला !

गजरीच्या दुःखाला अंतपार राहिला नाही. तिला कोणाचा आधार ? माहेरचे मायेचे तिला कोणी नव्हते आणि सासर असून नसल्यासारखे. आपल्या चिमण्या बाळाला जवळ घेऊन ती रडत बसे; परंतु गरिबाला रडण्याला तरी कोठे पुरेसा वेळ आहे ? गरीब मनुष्य काम करील तेव्हा खाईल ! परंतु गजरी कामाला तरी कशी जाणार ? लहान मुलाला कोठे ठेवणार ? त्याला पाठीशी बांधून कामावर गेली असती, परंतु बाळाच्या जिवाला बरेवाईट होईल असे तिला वाटे.

मोहनच्या मरणाची बातमी रामजीला कळली. जाईला कळली. जाई रडरड रडली. एके दिवशी तिने काहीतरी निश्चय केला. रामजीला न सांगता ती गजरीकडे आली. गजरी मुलाला घेऊन बसली होती. जाई म्हणाली, 'वैनी, आपण दोघी एकत्र राहू. दोघी मिळून ह्या बाळाला वाढवू. कधी तू कामाला जा, कधी मी जाईन.'

गजरी म्हणाली, 'तुम्ही आपला सुखाचा जीव दुःखात का घालता ? मामंजी तुम्हाला पुन्हा घरात घेणार नाहीत. आम्ही दुःखात आहोत तेवढं पुरे. होईल

कसं तरी आमचं. नाही तर ते गेले तिकडे बाळ व मी जाऊ.' जाईच्या डोळ्यांना पाणी आले. ती केविलवाणी होऊन काकुळतीने म्हणाली, 'वैनी! नको ग अशी कठोर होऊ. ह्या झोपडीत माझं समाधान आहे. ही गरिबी मला प्रिय आहे. मी सुखात का तिथं होते? वैनी! माझ्या मनाची स्थिती कोणाला माहीत? मी दुर्दैवी आहे. जन्मल्यावर थोड्याच दिवसांत माझे बाबा दूर गेले व मेले. माझी आई मला सोडून गेली. मी ह्यांच्या घरात आले तर इथं पिता-पुत्रांची ताटातूट माझ्यामुळंच झाली. ह्यामुळंच मोहन श्रम करून लवकर मेला. माझा हा पायगुण. मी या साऱ्याला कारण! जन्मताच आईनं माझ्या गळ्याला नख का लावलं नाही? देवानं मला जिवंत तरी का ठेवलं? मला काहीच समजत नाही. मला सुख नको, संपत्ती नको; मला ऐषआराम नको; मला गरिबीतच राहू दे. तुझ्याजवळच राहू दे. तू मला नाही म्हणू नकोस.'

शेवटी जाई व गजरी एके ठिकाणी राहू लागल्या. लहानगा बाळ वाढू लागला. एके दिवशी जाईच्या मनात विचार आला की, 'म्हातारा रामजी ह्या बाळाला नाही का घेणार? मोहनच्या मरणाने रामजीने वरती दाखविले नाही तरी आतून तो दु:खाने भाजून निघाला होता. मोहनला त्याने घरात घेतले नाही, परंतु या बाळाचा काय आहे अपराध? ह्या बाळाची का आबाळ व्हावी? रामजी ह्या बाळाला आनंदाने घेईल, नातवाला खेळवील, वाढवील, प्राणपणाने जपेल. बाळाला मग दुधा-तुपाला वाण पडणार नाही, कपड्यालत्त्याला कमी पडणार नाही.'

जाईने आपल्या मनातील विचार गजरीजवळ बोलून दाखविले. हो ना करता करता गजरी कबूल झाली. आपला मुलगा दारिद्र्याच्या गारठ्यात कुडकुडावा असे कोणत्या मातेस वाटेल? दारिद्र्यामुळेच मोहन लवकर मेला. हा बाळ तरी शतायुषी होवो असे गजरीला वाटले असेल. ती जाईला म्हणाली, 'मामंजी निग्रही व करारी आहेत. ते बाळाला घेणार नाहीत. तुम्हाला प्रयत्न करायचा असेल तर करून पाहा. तुम्हाला प्रचीती येईल. माझी ना नाही.'

जाईला आनंद झाला. रब्बीच्या पिकाचा हंगाम होता. गहू तयार झाला होता. शेते सोन्यासारखी पिवळी दिसत होती. रामजीची शेते अपरंपार पीक घेऊन उभी होती. रामजीचा मोहन मरून गेला, परंतु पीक सोळा आणे आले. शेते अशी कधी पिकली नव्हती.

रामजीच्या शेतात कापणी सुरू झालेली होती. खसाखसा विळे चालले होते. कापणारे गाणी म्हणत होते. रामजी एका झाडाखाली बसला होता. देखरेख करावयास, काम करून घ्यावयास तो स्वत: जातीने हजर असे. काम जोरात चालले होते.

जाईने मोहनचा बाळ बरोबर घेतला व ती निघाली. प्रेमळ जाईचा बाळाला फार लळा लागला होता. प्रेम मुलांनाही समजते. रामजीच्या दृष्टीला बाळ पडेल अशी काहीतरी योजना करण्याचे जाईच्या मनात होते. ती शेतावर निघाली. ती एका बांधावर बाळाला घेऊन बसली. लहान झाडाची तेथे सावली होती. बाळ देखणा होता, मोहक होता. त्याला अधिक मनोहर व मोहक करण्यासाठी जाईने फुलांनी त्याला नटविले. तो बाळ जणू बाळकृष्णाचीच रमणीय मूर्ती आहे असे वाटत होते. जाई त्याच्याकडे पाही व पटकन् त्याला पोटाशी धरी, त्याला चुंबी. 'घेतील, बाबा ह्या बाळाला घेतील. त्यांच्या कुळातीलच हा मोत्याचा दाणा आहे. त्यांच्या वंशाचेच बीज. किती सुंदर दिसतो आहे! ह्याला कोण घेणार नाही? कोण कौतुक करणार नाही? कोण कुरवाळणार नाही? ह्या बाळाच्या पायाला बोचू नये म्हणून काटे बोथट होतील, दगडाची फुले होतील. मग बाबा का विरघळणार नाहीत? त्यांचे हृदयही बाळाला पाहून मऊ लोण्यासारखे होईल.' अशा आशेने जाई त्या बांधावर बसली होती.

कामकऱ्यांनी जाईला पाहिले परंतु रामजीला सांगण्याचे त्यांना धैर्य झाले नाही. म्हाताऱ्याचा राग त्यांना माहीत होता. जाई बस बस बसली. शेवटी सांजावले. कामकरी निघून गेले. सूर्य निघून गेला. देव मावळला व अंधार पडला. जाईचा आशासूर्यही मावळला व तिच्या हृदयात अंधार भरला.

दुसऱ्या दिवशी जाई पुन्हा त्या बाळाला घेऊन बांधावर बसली. कापणारे कापत होते. पक्षी गात होते. जाई बाळाला फुलांनी मढवीत होती. तो पाहा रामजी शेते पाहात येत आहे. जाईच्या मनात आशा जागी झाली. धावत जावे असे तिला वाटले; परंतु आला, रामजीच जवळ आला.

रामजीने रागाने जाईकडे पाहिले व तो म्हणाला, 'तू शेवटी त्या घरी गेलीस. तूही त्याच्यासारखीच मर. काढ उपास, कर उन्हात काम. तुमच्या नशीबीच नाही, त्याला कोण काय करणार? सुखाचा घास नाही तुमच्या दैवी. मरा सारी उपासमारीनं व मला म्हाताऱ्याला मात्र खायला जिवंत ठेवा.'

म्हाताऱ्याच्या बोलण्यातील दुःख व निराशा जाई समजू शकत होती. ती म्हणाली, 'बाबा! तुमचं घर मला बंद झालं हे खरं; परंतु ह्या बाळाला ते का बंद व्हावं? ह्या लहानग्याचा काय अपराध? या मोहनच्या मुलाला तुम्ही नाही का जवळ घेणार, नाही का नीट वागवणार? या बाळाची आबाळ का व्हावी? याला घ्या, तुमच्या घरी न्या. त्याला गरम कपडे करा, त्याला गाईचं दूध पाजा. या बाळाची उपासमार न होवो म्हणजे झालं. हा तुमचाच आहे. तुम्हीच लावलेल्या, वाढवलेल्या झाडाचं हे फळ आहे.'

रामजी ऐकत होता. त्या मुलाकडे तो पाहात होता. त्याने जरासे तोंड का तिकडे फिरविले? कापणारे कापीत आहेत की नाहीत हे का तो बघत होता? त्याने डोळ्यांवरून हात का फिरविला? घाम का त्याने पुसला? पुन्हा जाईकडे तो वळला. तो बोलेना. त्याच्याने बोलवत का नव्हते? का बोलण्याची त्याची इच्छा नव्हती?

'बाबा! घेता ना या बाळाला! घ्या, घ्या, घ्या –' जाई दगडालाही पाझर फुटेल अशा स्वरात म्हणाली.

रामजीचे ओठ हालले. म्हातारा बोलू लागला; परंतु त्याच्याने फार बोलवले नाही. 'दे!' एवढेच तो बोलला. त्याने आपले हात पुढे केले. जाईच्या तोंडावर

कृतज्ञतेची कोवळीक होती. तिने बाळ बाबांच्या हातात दिला; परंतु बाळ म्हाताऱ्याजवळ जाईना. तो जाईचा पदर सोडीना. बाळ रडू लागला. त्याच्या डोक्यावरचे हार खाली पडले; परंतु शेवटी जाईने बाळाच्या त्या चिमुकल्या घट्ट मुठी सोडविल्या व ती दूर झाली. रडणाऱ्या मुलाला 'उगी उगी – तो बघ काऊ, ती बघ चिऊ, उगी हां – ही बघ फुलं – रडू नको असा!' अशा शब्दांनी उगी करीत रामजी निघून गेला.

देव मावळला. सांजावले. कामकरी निघून गेले. विळे थांबले. अंधकार पडू लागला. त्या बांधावर जाई तेथेच बसली होती. बाळाच्या डोक्यावरची पडलेली फुले तिच्या हातात होती. ती रडत होती. स्वतःचे सारे जीवन तिला आठवले. रामजीने तिचे किती लाड केले, कसे कौतुक केले, ते सारे डोळ्यांसमोर उभे राहिले. मोहनची मोहक व उंच मूर्ती डोळ्यांसमोर आली. त्याचे हाल, त्याचे मरण. सारे प्रसंग समोर उभे होते. 'मी दुर्दैवी आहे. खरंच दुर्दैवी. अशा दुर्दैवी माणसांना जन्माला घालण्यात प्रभूचा काय बरं हेतू असावा? परंतु आज बाबांनी बाळ नेला, एवढं तरी सुदैव माझं होतं, एवढं तरी पदरी सुकृत होतं म्हणायचं.' असे म्हणत ती उठली व आपल्या झोपडीकडे निघाली. गजरी कामावरून आली होती. पाण्याची घागर तिने भरून आणली व चूल पेटवून ती भाकर भाजीत होती. तो जाई आली. जाईला पाहून गजरी म्हणाली, 'बाळ नाही तो?'

'वैनी! बाबांनी नेला हो बाळ. बरं झालं. बाळ सुखात राहील. त्याला थंडी बाधणार नाही, उपास पडणार नाहीत. आपण दोघी कशाही राहू.'

जाईचे शब्द ऐकून गजरी आनंदली नाही. गजरीचा दुःखी चेहरा पाहून जाईला बरे वाटले नाही. तिने बऱ्यासाठी केले होते; परंतु बाळाच्या आईला ते पसंत का नव्हते? मातृहृदय जाईने कसे ओळखावे? तो धन्य अनुभव, पावन व थोर अनुभव माता होऊनच घ्यावा लागतो. जाई माता नव्हती. ह्या जन्मी तरी मी माता होणार नव्हती. अप्रत्यक्ष माता होण्याचे तिचे प्रयत्न होते; परंतु अशा प्रयत्नांनी – दुसऱ्यांची मुले वाढविण्याच्या प्रयत्नांनी – खऱ्या मातेचा अनुभव कसा येणार?

गजरी खिन्न म्हणून जाईही खिन्न झाली. कोणी कोणाशी बोलले नाही. भाकरीचा तुकडा खाऊन दोघी घोंगडीवर पडल्या; परंतु डोळा एकीचाही लागेना. पहाटेचा - प्रहरभर रात्र उरली तेव्हाचा - कोंबडा आरवला. गजरी जाईला

म्हणाली, 'आपण बाळ परत आणू. माझा बाळ मामंजींच्या जवळ नको. मी रात्रभर विचार करीत आहे. शेवटी हाच निश्चय मी केला. बाळ परत आणायचा. आपण दोघीजणी जाऊ. तूही माझ्याबरोबर ये.' जाई काय बोलणार ? मातेच्या इच्छेपुढे ती काय बोलणार ? परंतु खरे सांगावयाचे तर बाळ तिकडे गेल्यापासून जाईलाही हुरहूर लागल्यासारखे वाटत होते. काहीतरी चुकल्यासारखे तिला वाटत होते. तिने फार आढेवेढे घेतले नाहीत, वादविवाद केला नाही. सकाळ केव्हा होते ह्याची दोघीजणी वाट बघत होत्या. झोप येईना, म्हणून जाते घालून दोघींनी दळले. लहान मुलांवरच्या गोडगोड ओव्या दोघीजणींनी म्हटल्या.

''मांडीवरला बाळ कशी करी दूर माय
प्राण कसा तो ठेवील वासरा ग वीण गाय।।
तान्हुला ग माझा बाळ नको त्याची ताटातूट
जाग जाई झणी ऊठ त्याची माझी करी भेट।।''

अशा ओव्या गजरी म्हणत होती. त्या कविता, त्या ओव्या ती स्वत:च रचून का म्हणत होती ? तिच्या हृदयाची का ती हाक होती ? तिच्या हृदयाची का ती भूक होती ? तिच्या भावनांनी का तिला स्फूर्ती दिली, वाचा दिली ?

बाहेर चांगलेच उजाडले. गडी माणसे कामावर जाऊ लागली. सूर्यनारायण सर्वांना हाका मारू लागला; सर्वांना हालवू- नाचवू लागला, हसवू- खेळवू लागला, फुलवू- फळवू लागला. जाई व गजरी दोघी निघाल्या. म्हातारा रामजी आरामखुर्चीत बसून बाळाला खेळवीत होता. गोड द्यावे व मुलाला घ्यावे, गोड बोलावे व मुलाला घ्यावे. गुळाला मुंगी, मधाला माशी, तशी गोडाला मुले. म्हातारा गोड-गोड बोलत होता –

'काऊ काऊ, चिऊ चिऊ इथे इथे बस, चारा खा, दाणा खा
आणि बाळाच्या डोक्यावरून भुर्रकन् उडून जा.'

असे रामजी म्हणत होता. मुलाला त्याने गोडशी वडी दिली होती. बाळ वडी चघळीत होता. रामजीच्या गुड्यांजवळ खेळत होता. गजरी व जाई दारात उभ्या होत्या. दार लोटण्याचे धैर्य कोणासच होईना. शेवटी जाई पुढे झाली. गजरीने दार लोटले. दोघी न विचारता आत शिरल्या. म्हातारा चकितच झाला.

गजरीने बोलायला आरंभ केला. ती म्हणाली, - 'मामंजी ! माझा मुलगा परत न्यावयास मी आल्ये आहे. तो तुमच्याकडे नको. तो तुमच्याजवळ

तुमच्यासारखा कठोर होईल, दुष्ट होईल. आई–बापाची आठवण तो विसरेल. आई–बापाविरुद्ध वाटेल ते त्याच्या मनात तुम्ही भरवाल. तो स्वतःच्या आई–बापाचा अपमान करावयास लागेल. छे. नकोच ते. द्या माझा बाळ. तो गरिबीत राहून मेला तरी चालेल; परंतु श्रीमंतीत वाढून फत्तर व्हावयास नको. त्याचं मन गरिबीत कोवळं राहील, प्रेमळ राहील. तो पित्याच्या स्मृती पुण्य मानील. आईला प्रेम देईल. माझा बाळ दीन–दरिद्री झाला तरी चालेल, परंतु मनानं तो श्रीमंत होऊ दे. द्या, खरंच द्या. त्याला नेण्यासाठी मी आले आहे.'

गजरीचा एकेक शब्द सुरीप्रमाणे म्हाताऱ्याचे काळीज चिरून जात होता. तो पहाड पाझरला. तो पाषाण विरघळला. म्हातारा एकदम उठला. जाईला व गजरीला त्याने पोटाशी धरले व रडत म्हणाला, 'पोरींनो! नका माझा अंत पाहू. नका मला छळू. माझं हृदय किती जळतं आहे, तुम्हाला कसं दाखवू? परंतु खोट्या अभिमानाला मी बळी पडलो. माझ्या अहंकारानं, हट्टानं मी माझा गुणी मुलगा गमावून बसलो. पुत्रघातकी आहे मी. तुम्ही माझ्यापासून दूर राहू नका. ह्या घरात राहा. ह्या बाळाला तुम्हीच वाढवा. इथं नांदा. मोहनच्या मरणानं आपण सारी जोडली गेलो. मोहन मेला व माझा अहंकारही मेला. प्राणांचं मोल देऊन माझ्या मुलानं मला पवित्र केलं आहे. प्रेमळ, कोमल निर्मळ केलं आहे. मुलींनो! रडू नका. झालं गेलं विसरा व म्हाताऱ्याला क्षमा करा. मी अपराधी आहे.' असे म्हणून तो पहाड खरोखर त्या मुलींचे पाय धरण्यासाठी वाकला.

'हे काय भलतंच - आम्हीच तुमच्या पायांवर डोकं ठेवायचं. तुम्ही प्रेमाचे मंगल आशीर्वाद द्या म्हणजे झालं.' असे म्हणून गजरीने म्हाताऱ्याच्या पायांवर डोके ठेवले. तिने बाळ आजोबांच्या पायांवर घातला.

ती सारी आनंदाने एकत्र राहू लागली. जाईने लग्न केले नाही. म्हातारा त्या बाबतीत कधी काही बोलला नाही. गजरी त्या बाबतीत बोलली नाही. तो फार गंभीर, नाजूक, पवित्र प्रश्न होता. त्या बाबतीत बोलणे म्हणजे अपवित्रपणा होता.

एखादे वेळेस मोहनची सर्वांस आठवण येते व सर्वांना रडू येते; परंतु हसरा व खेळकर बाळ त्यांचे अश्रू ताबडतोब दूर करतो. मोठा जादूगार आहे तो.

* * *

श्यामची फुले : कथा तिसरी

बासरीवाला

एका गावात एक श्रीमंत सावकार राहात होता. त्याचा जमीन-जुमला गावोगाव पसरलेला होता. जिकडे पाहाल तिकडे त्याचीच शेती, जिकडे पाहाल तिकडे त्याचीच घरे. हजारो लोकांच्या घरादारांचे लिलाव त्याने केले होते. शेतकऱ्यांना तर तो काळ वाटे. शेतकऱ्यांची गाईगुरे, भांडीकुंडी सारे त्याने जप्त करून न्यावे. त्याच्या नावाने सारी आसपासची श्रमणारी दुनिया बोटे मोडीत असे. शेतकऱ्याने पाऊसपाण्यात, उन्हातान्हात, ढोपरढोपर चिखलात श्रमून, खपून धान्य निर्माण करावे; परंतु सावकाराची झडप यावी व सारे नाहीसे व्हावे. खंडोगणती धान्य निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यांस शेवटी उपास पडत. त्यांची मुले अर्धपोटी राहात. अशा ह्या दुःखी कष्टी लोकांचे शिव्याशाप त्या सावकाराला मिळत. त्याला कोणी बरे म्हणत नसे. तो भेटला तर त्याला राम राम करीत; परंतु त्याची पाठ वळताच 'मरत का नाही छळवाद्या' असे वैतागाने म्हणत.

त्या सावकाराचे नाव धोंडोपंत. धोंड्यासारखे त्याचे मन घट्ट होते. दयामाया त्याला माहीत नव्हती. दुसऱ्याच्या डोळ्यांतील पाणी पाहून धोंडोपंत हसे. अश्रूंची थट्टा करणे ह्याहून वाईट काय आहे? परंतु धोंडोपंतास त्याची किंमत कळत नसे. एकच गोष्ट तो ओळखी, ती म्हणजे पैसा. धोंडोपंताचा देव पैसा. पैसा हे त्याचे परब्रह्म.

धोंडोपंताला एकच मुलगा होता. भांगेत तुळस तसा तो होता. मातीच्या पोटी कस्तुरी तसा तो होता. त्याचे नाव मनोहर. त्याला सारे मन्या अशी हाक मारीत. मन्या गोड मुलगा होता. दिसे चांगला, तसे त्याचे मनही चांगले

होते. गरिबांचे अश्रू त्याला समजत. आपल्या घरी येऊन शेतकरी रडतात, बाबा कसे त्यांना बोलतात, हे तो बघे; परंतु तो लहान होता. किती दिवस लहान राहाणार? तो हळुहळू शरीराने व मनाने मोठा होत होता. आईबापांचा एकुलता एक मुलगा. त्याचे कोडकौतुक होत होते. त्याच्या अंगावर दागिने होते, सुंदर कपडे होते. मन्याला काय कमी?

गावात मन्याला जिकडे तिकडे वडिलांची निंदा ऐकू येई. तो शाळेत गेला म्हणजे मुले म्हणत, 'गरिबांना रडवणाऱ्या धोंडोपंताचा हा मुलगा.' कधी दुकानात गेला तर 'गरिबांचा काळ धोंडापंत त्यांचा हा मुलगा.' असे शब्द त्याच्या कानांवर येत. मन्याला वाईट वाटे. त्याला दागिने अंगावर घालवत ना, तलम वस्त्रे नेसवत ना, वापरवत ना. त्याला गरिबांचे दुःख, त्यांच्या मुलांचे आक्रोश त्यात ऐकू येत. मन्या गरिबीने राहू लागला. तो शाळेतही जातनासा झाला.

एके दिवशी धोंडोपंत मन्याला म्हणाले, 'मन्या बाळ! जमाखर्चापुरतं तरी शीक. आपल्या मुनिमांजवळ बसत जा. व्यवहार पाहात जा. ह्या सर्व इस्टेटीचा मालक तू व्हायचा आहेस. हे सारं सोन्या, तुझ्यासाठी आहे.' वडिलांचे शब्द ऐकून मन्या म्हणाला, 'बाबा! मला काही नको. ही इस्टेट आपली थोडीच आहे?' वडील म्हणाले, 'आपली नाही तर कोणाची? माझ्या अक्कलहुषारीनं ती मी मिळवली आहे,' वडील पुढे म्हणाले. 'कर्ज घेताना नाही कधी रडत! कर्ज काढावं कशाला? लोकांना घ्यायला पाहिजे. द्यायला नको.'

मन्याची एक बालमैत्रीण होती. तिचे नाव लिली. ती शेजारीच राहात असे. लिलीचा बाप गरीब होता. धोंडोपंतांचा तो देणेकरी होता. मन्या व लिली एके ठिकाणी खेळत. लिली त्याला लटुपटीचे जेवायला वाढायची. दोघे झोपाळ्यावर बसत व मोठ्याने झोके घेत. दोघांची फार गट्टी होती. मन्याला लिलीशिवाय व लिलीला मन्याशिवाय करमत नसे.

परंतु मन्या लिलीकडे जात नसे. तो कोठेच जात नसे. नदीच्या तीरी जाऊन तेथल्या वटवृक्षाखाली तो बासरी वाजवीत बसे. मन्या फारच छान बासरी वाजवी. जणू गोकुळातील कृष्णच मुरली वाजवीत आहे असे वाटे. मन्याची बासरी ऐकून गाईगुरे तटस्थ राहात, पक्षी झाडावर गप्प बसत. नदीचे पाणी पांगुळे व वाहतनासं होई. वारा स्तब्ध होई. पाषाणाला पाझर फुटे. गरिबांची दुःखे का त्या बासरीतून आळवी? जगातील हायहाय का तो त्या सुरांतून प्रगट करी?

सकाळपासून संध्याकाळपर्यंत मन्या त्या झाडाखाली बसे. रानातील गुराखी त्याचे मित्र बनले. ते त्याला कांदा भाकर देत व नदी त्याला स्वच्छ पाणी देई. कधी-कधी पक्षी चोचींतून फळे आणून त्याच्या पायांजवळ ठेवीत, तर कधी त्याच्यासमोर येऊन गाई दुधाच्या धारा सोडीत. मन्या गाईचा वत्स होई व ते दूध पिई. मन्या सृष्टीचा बालक झाला होता. प्रेमळ मन्यावर सारी सृष्टी प्रेम करीत होती.

बरेच दिवसांत लिलीला मन्या भेटला नव्हता. मन्याला भेटावयाला ती अधीर झाली होती. आई रोज तिला खाऊ देई; परंतु तो तिने न खाता तसाच सारा जमवून ठेवला होता. मन्या व मी दोघे मिळून खाऊ असे ती मनात म्हणे. मन्या आज येईल, उद्या येईल अशी ती वाट पाहात होती. मन्या आला नाही.

मन्याच्या बापाने लिलीच्या बापाला ताकीद दिली होती की, 'खबरदार लिली मन्याकडे गेली तर. त्या कारट्याला एकटा राहू दे, म्हणजे शेवटी कंटाळून घरी येईल.' लिलीचा बाप देणेकरी होता, म्हणजेच गुलाम व मिंधा होता. त्याने लिलीला तसे बजाविले. तिच्या डोळ्यांत पाणी आले. ऋणी बापाला ते दिसले नाही, दिसले तरी रुचले नाही, पटले नाही.

एके दिवशी लिलीचा बाप बाहेरगावी गेला होता. आईला विचारून लिली मन्याकडे जावयास निघाली. तिने खाऊचा डबा बरोबर घेतला होता. नदी सागराकडे निघाली. कोकिळा वसंताकडे निघाली. मधमाशी फुलाकडे निघाली. मन्या पाठमोरा बसला होता. त्याच्या हातात बासरी होती. नदीच्या प्रवाहाकडे तो बघत होता. एकदम पाठीमागून जाऊन लिलीने त्याचे डोळे धरले, 'कोण आलं इथं छळायला? कोण धरतंय माझे डोळे? मन्या त्वेषाने म्हणाला व ते कोमल हात त्याने कुस्करले. लिली भ्याली व हरणीसारखी ती पळून गेली. गोड मन्याची आज तिला भीती वाटली.

मन्या पाठीमागे वळून पाहातो, तो लिली परत जात आहे असे त्याला दिसले. 'लिल्ले, लिल्ले' त्याने हाका मारल्या. ती परतली नाही. मन्या खिन्न झाला. त्याला वाईट वाटले. त्याला वाटले की पळत जावे व लिलीला आणावे. आपण तिला बासरी वाजवून दाखवू. तिच्याजवळ गोष्टी बोलू; परंतु त्याला धैर्य झाले नाही.

काही दिवस गेले. मन्याने हाका मारल्या तरी आपण गेलो नाही ह्याचे आता तिला वाईट वाटत होते. तिचा राग गेला. प्रेम का कधी रागावते? तिने पुन्हा एक संधी साधली. मन्यासाठी तिने खाऊ घेतला. ती निघाली. मन्या अलिकडे पाठमोरा बसत नसे. गावाकडे तोंड करून बसे व नदीकडे पाठ करी. लिली आली तर दिसावी म्हणून तो असे करी. लिली येताच त्याला दिसली. तो आनंदला. प्रेम परत आले, मैत्री परत आली.

तो म्हणाला, 'लिल्ये, त्या दिवशी अगदी फणकाऱ्यानं निघून गेलीस ना? मी किती तुला हाका मारल्या.'

लिली म्हणाली, 'तू माझ्यावर एकदम ओरडलास. मी घाबरले.'

मन्या म्हणाला, 'तू धरलं आहेस हे मला काय माहीत?'

लिली म्हणाली, 'लपंडावाच्या खेळात तुझे डोळे ह्याच हातांनी मी पूर्वी झाकीत असे. ते हात तू कसे ओळखले नाहीस?'

मन्या म्हणाला, 'परंतु अलिकडे कितीतरी दिवसांत आपण खेळलो नाही. शिवाय मी त्या वेळेस दुःखी होतो, त्रासलेला होतो. तुझ्या प्रेमाला माझे दोन शब्दही सहन झाले नाहीत? एका शब्दाने मैत्री मोडते? परंतु असली दुबळी मैत्री काय करायची? कितीं आघात झाले तरी ती अभंग राहावी, ती काचेसारखी नसावी, हिऱ्यासारखी असावी.'

लिली म्हणाली, 'मन्या! आई रोज मला खाऊ देई, परंतु तो मी कधी खाल्ला नाही. हा बघ सारा जमवून ठेवलेला आणला आहे. ये आपण खाऊ.'

दोघांनी खाऊ खाल्ला. लिली म्हणाली, 'मन्या, तू घरी का राहात नाहीस? वडिलांचं थोडं ऐकावं. तुझ्या वडिलांनी तुझ्याकडे येण्याची मला बंदी केली आहे. म्हणतात कसे, 'एकट्याला कंटाळू दे म्हणजे झक्कत घरी येईल!' 'मन्या, ये ना रे घरी, आपण रोज खेळू, रोज बोलू.'

मन्या म्हणाला, 'माझ्या बाबांना सारं जग नावं ठेवतं. तुझ्या मन्यालाही साऱ्यांनी निंदावं असं तुला वाटतं का? मला माझ्या घरी राहावत नाही. तिथं पाप आहे, अन्याय आहे. मला गोरगरिबांच्या किंकाळ्या तिथं ऐकू येतात. तुझ्या मन्याचा जीव तिथं होरपळू लागतो. गुदमरू लागतो. त्या हवेत मी जगू शकणार नाही. हा मन्यापक्षी रानातील मोकळ्या, प्रेमळ व सुंदर हवेतच नांदू शकेल, जगू शकेल.'

मन्याने नंतर बासरी वाजविली. लिली वेडी झाली. डोळे मिटून ती बसली होती. बासरी थांबली तरी तिची समाधी सुटली नाही. ती भानावर आली. ती सद्गदित होऊन मन्याला म्हणाली, 'मन्यादादा! मला शिकवशील बासरी वाजवायला? मी चोरून येईन व शिकत जाईन.' मन्या म्हणाला, 'ये, तुझ्यासाठी एक दुसरी बासरी मी तयार करीन.'

लिली निघून गेली. मधूनमधून ती बासरी वाजविण्याचा घरी सारखा अभ्यास करी. तिची आई रागावून म्हणे, 'काय ग सारखी कटकट!' लिली म्हणे, 'कैरी आंबट असते, परंतु काही दिवस गेले की तीच रसाळ व गोड होते. आई, आज तुला कटकट होत आहे, परंतु मला चांगलं वाजविता येऊ लागलं की तूच म्हणशील, 'लिल्ये, वाजव ग जरा बासरी.' मन्यादादा वाजवतो तेव्हा पाषाणही ओले होतात, नदी वाहाण्याचं विसरून थबकते.'

एके दिवशी लिली मन्याकडे गेली होती. त्या दिवशी मन्याची बासरी घेऊन लिलीने वाजविली. मन्या ध्यानस्थ झाला. मन्यापेक्षाही लिली उत्कृष्ट वाजवू लागली. मन्या म्हणाला, 'तुझ्या कोमल हातांनी तू वाजविलीस, तुझं प्रेमळ हृदय तू ओतलंस, म्हणून माझ्यापेक्षा दिव्य संगीत तू निर्माण केलंस. स्त्रियांचं जीवन हळुवार, सोशिक, पवित्र व प्रेमळ असं असतं. म्हणूनच तुला असं वाजविता आलं.'

लिलीला एके दिवशी वाटलं मन्यादादाची बासरी आपण मागावी. आपल्या बासरीपेक्षा त्याची बासरी सुरेल आहे, गोड आहे. मागताक्षणी मन्या देईल असे तिला वाटले. प्रेमासाठी प्राण देतात, मग टीचभर बासरी का मन्या देणार नाही? प्रेमाला देण्याला अशक्य असं काय आहे?

त्या दिवशी मन्या खिन्न होता. त्याची वृत्ती प्रसन्न नव्हती. तो त्रस्त दिसत होता. लिली आली तरी तो हसला नाही. मन्याची बासरी हातात घेऊन ती म्हणाली, 'मन्यादादा, ही मला देतोस? माझी बासरी तू घे व तुझी मी घेते. तू मला वाजव, मी तुला वाजवीन. बासरीच्या रूपानं तू मजजवळ असशील, मी तुझ्याजवळ असेन.' मन्या एकदम संतापला. त्याचे डोळे – ते प्रेमळ डोळे – लाल झाले. तो एकदम उसळून तिच्या हातातील बासरी खसकन ओढून म्हणाला, 'अग लबाड्ये, अग ढोंग्ये, माझी एक मैत्रीण म्हणजे ही बासरी; ती तू पळवणार होय? हे एकच माझं सुख ते तू चोरणार होय? त्यासाठी

इतके दिवस तू पोटात शिरत होतीस. माझ्या बाबांचं हे कारस्थान असेल. ज्या बासरीमुळं मला जीवन कंटाळवाणं होत नाही, ती बासरी लांबवावी असं तुमचं ठरलेलं दिसतं. जा, नीघ येथून. मला दर्शन नको. स्वार्थी व मत्सरी जगाचं मला दर्शन नको.'

फुलावर निखारे पडावेत, हरणाच्या कोवळ्या अंगावर कठोर व तीक्ष्ण बाण पडावेत, कमळावर थंडगार बर्फाची वृष्टी व्हावी तसे लिलीला झाले. तिला कल्पनाही नव्हती. ती मन्यावर प्रेम करी म्हणून तिने मागितले. प्रेमाला अशक्य काय आहे असे तिला वाटले. मोत्यासारखे अश्रू तिच्या डोळ्यांतून घळघळले. वेलीप्रमाणे ती थरथरत निघून गेली. लिली मन्याकडे पुन्हा आली नाही.

लिली आता मोठी झाली होती. तिच्या लग्नाच्या वाटाघाटी होत होत्या. ती आता कधी बाहेर जात नसे. तिची आई तिला म्हणे, 'लिल्ये, अलिकडे बासरी का वाजवीत नाहीस? तू गोड वाजवतेस.' लिली म्हणे, 'माझी बासरी बिघडली, माझा पावा पिचला. माझ्या बासरीतून गोड सूर आता ह्या जन्मी निघणार नाहीत. तिला कोण दुरुस्त करणार? दुरुस्त करणारा एकच आहे. परंतु तो कसा भेटणार, कधी भेटणार?'

लिलीचे लग्न जमले. दूरच्या गावचा तरुण मुलगा तिचा पती म्हणून ठरविण्यात आला. जानवसा लिलीच्या गावात उतरला. लिलीचे लग्न लागले. रात्री लिलीची वरात होती. वधू–वर घोड्याच्या गाडीत बसली होती. वाद्ये वाजत होती. गावाबाहेरच्या देवाच्या देवळात वधू–वर जात होती. गावाबाहेर झाडाखाली मन्या बासरी वाजवीत बसला होता. तो आवाज ऐकून वाद्ये वाजवणारे थांबले. मन्याची बासरीच ऐकू येत होती. गोड बासरी! लिलीच्या डोळ्यांना पाणी आलं. ती डोळे चोळू लागली. पाठराखणीने विचारले, 'काय ग झालं?' लिली म्हणाली, 'फूल डोळ्यांत गेलं!'

लिली सासरी गेली. तो गाव सोडून, माहेर सोडून गेली. त्या दिवसापासून मन्याने बासरी वाजवली नाही. गुराखी त्याला विचारीत, ' मन्यादादा, बासरी वाजव ना.' मन्याचे रडवेले डोळे उत्तर देत. गुराखी खिन्न होऊन जात. मन्या हसेना, बोलेना, खेळेना; वाजवीना. तो जिवंत असून मेल्यासारखा झाला होता!

लिलीची तीच स्थिती होती. सासरचे सारे काम तिला करावे लागे. मोठ्या पहाटे ती उठे. पोतेरे घाली, चुली सारवी, अंगण झाडून सडा घाली, खटाळभर

भांडी घाशी, पाणी भरी, धुण्याची मोट घेऊन तळ्यावर जाई. ती तळ्यावर जरा उशीरा जाई, त्या वेळेस तेथे कोणी नसे. ती तेथे बसून रडे. हृदयातील पाणी डोळ्यांवाटे तळ्यात पडे. दुःखी लोकांच्या अश्रूंचे तर ते तळे बनले नसेल ना? धुणी धुवून ती घरी येई. मग गोळाभर घास खाई, पुन्हा भांडी घाशी, धुणी वाळत घाली. दुपारी दळण, निवडणे वगैरे असे. आज भाजणी, उद्या मेतकूट, परवा पापड, तेरवा मिरच्या कुटणे, कधी मसाला, कधी काही हे असेच.

लिलीचे फुलासाररखे तोंड कोमेजून गेले. ती नीट खाईना, पिईना. नेहमी तिचे पोट भरलेले. त्या दिवसापासून आपण मन्याला भेटलो नाही याची रुखरुख तिला लागली होती. मन्याला कोण आहे? साऱ्या जगात त्याला कोणी नाही. ती नदी त्याची आई, गाईगुरे व पक्षी त्याची भावंडे, गुराखी त्याचे मित्र. त्रासलेल्या मन्याचे शब्द मी मनावर का घ्यावे? मी पुन्हा त्याच्याकडे का गेले नाही? सारे अभिमान खऱ्या प्रेमापुढे फिके पडतात. प्रेमाला 'अहं' ची बाधा कधी होत नाही. खरे प्रेम निरहंकारी असते. माझे प्रेम खरे प्रेम नव्हते म्हणून मी मनात अढी धरली. असे मनात येऊन लिली रडे.

शेवटी लिली आजारी पडली. ती अंथरुणाला खिळली. सासूसासऱ्यांनी तिला माहेरी पाठविली. आजारीपणात तिची सेवा कोण करणार? ती आता उपयोगी थोडीच पडणार होती! निरुपयोगी वस्तू माहेरी रवाना झाली.

लिलीची दैना पाहून तिच्या आईच्या हृदयाचे पाणी झाले. लिलीचे लक्षण बरे दिसेना. एके दिवशी लिली म्हणाली, 'आई! मन्यादादाला बोलाव ग. त्याला डोळे भरून पाहीन. त्याचा हात हातात घेऊन त्याच्यावर दोन टिपे गाळीन. जणू माझ्या अश्रूंचे अर्घ्य त्याच्या हातावर सोडीन. आई बोलावशील का? नको मला हे दूध, नको हे पाणी. मला मन्याची तहान आहे ग, माझ्या मन्याची.' परंतु मन्याला कोणी बोलाविले नाही, कारण मन्याच्या बापाची निक्षून सांगी होती की मन्याशी संबंध ठेवू नका. लिलीच्या बापाला लिलीच्या प्राणापेक्षा, तिच्या शेवटच्या इच्छेपेक्षा, सावकाराचे ऋण महत्त्वाचे वाटत होते; सावकाराची इच्छा महत्त्वाची वाटत होती.

लिली 'मन्या! मन्या!' करीत देवाघरी निघून गेली. लिली मेली. मन्याने गुराख्यांना विचारले, 'ते कोणाचे रे प्रेत येत आहे?' ते म्हणाले, 'लिलीचे.' मन्या चमकला. कसे तरी पाहू लागला. त्या झाडाखाली तो उभा राहिला.

लिलीची चिता धाडधाड पेटत होती. मन्याचे हृदय ताड–ताड उडत होते, जणू फुटू पाहात होते.

सारे लोक माघारे गेले. मग मन्या हातात ती आपली बासरी घेऊन तेथे गेला. त्या चितेजवळ तो बसला. रसरशीत निखारे तेथे होते. लिली व मन्या ह्यांच्या मनोरथांचे जळून असेच निखारे झाले होते. मन्या तेथेच बसला. तो मध्येच हात जोडी, मध्येच रडे, मध्येच उठून त्या चितेला प्रदक्षिणा घली.

मन्या पुन्हा गुराख्यांना तेथे दिसला नाही. मन्या कोठे गेला? मन्याचा पत्ता नाही. त्याची बासरी – जी लिलीने मागितली होती ती – लिलीच्या विझलेल्या चितेवर सापडली! परंतु ती बासरी वाजविणारा सापडला नाही. तो कोठे गेला? वाऱ्याला माहीत, वरच्या ताऱ्यांना माहीत, त्या वाहाणाऱ्या खोल नदीला माहीत!

त्या नदीतीरी रात्र पडली की गोड बासरी ऐकू येते. दोन निरनिराळ्या तऱ्हेचे सूर ऐकू येतात. गुराख्यांनी ते संगीत ऐकले व गावात सांगितले. लिलीचा बाप व मन्याचा बाप दोघे एके दिवशी रात्री तेथे गेले. ते दिव्य संगीत त्यांच्या कानी पडत होते. त्यांची दगडासारखी हृदये मृदू नवनीताप्रमाणे होत होती. बासरीच्या एकेका सुराबरोबर त्यांच्या हृदयाचे पाणी–पाणी होत होते; फत्तरांची फुले होत होती. मन्या व लिली ह्यांच्या जगण्याने जे झाले नाही, ते त्यांच्या मरणाने झाले.

मन्याचा बाप विरक्त झाला. सारी खते पत्रे त्याने फाडून टाकली. त्याने सर्वांना देणे माफ केले. होता नव्हता तो पैसा गोरगरिबांच्या हितार्थ त्याने खर्च केला. तो झोपडीत राहू लागला. बंगले, मळे, गाड्या, घोडी सारे विकून कोठे त्याने विहिरी बांधल्या, कोठे दवाखाना घातला, कोठे शाळा उघडली, कोठे खेड्यातील रस्ते दुरुस्त केले. मन्याचा बाप जणू खरे जीवन जगू लागला. मन्या मेला; परंतु पित्याचा पुनर्जन्म झाला.

धोंडोपंताने नदीतीरी एक सुंदर समाधी बांधली. ती मन्याची बासरी तेथे ठेवण्यात आली. 'मन्या व लिली' एवढे दोनच शब्द त्या समाधीवर लिहिलेले आहेत. येणाऱ्या–जाणाऱ्या मुशाफिरांना गुराखी ती जुनी गोष्ट सांगतात! मग ते ऐकणारे मन्या व लिलीचे अश्रू देऊन श्राद्ध करतात!

* * *

घामाची फुले : कथा चौथी

अश्रूंचे तळे

ते शहर फार सुंदर होते. पृथ्वीवरचा तो स्वर्ग होता, असे लोक म्हणत. रात्री विजेची रोषणाई झाली म्हणजे फारच मनोहर देखावा असे. डांबराचे रस्ते होते. सुंदर उपवने होती. त्या शहरात मोठमोठी नाटकगृहे होती. मोठमोठी ग्रंथालये होती. सायंकाळची वेळ झाली म्हणजे मोटारींतून सुंदर पोषाख करून नरनारी जात असत. जगात कोठे दुःख असेल असे त्या फुलपाखरांना पाहून मनात कधी येणे शक्य नव्हते.

परंतु स्वर्गाजवळच नरक असतो. कमळाजवळ चिखल असतो, फुलाजवळ कीड असते, जीवनाजवळ मरण असते, प्रकाशाजवळ अंधार असतो, स्वातंत्र्याजवळ दास्य असते, वैभवाजवळ विपत्ती असते, आलापांजवळ विलाप असतात, सुखाशेजारी दुःख असते, हास्याच्या जवळ अश्रू असतात. त्या सुंदर, सुखी शहरात अपरंपार दुःखही होते.

त्या शहरात एक भली मोठी धर्मशाळा होती. त्या धर्मशाळेच्या आवारात एक मोठा विस्तृत तलाव होता. दिवसभर शहरात भीक मागणारे लोक रात्री ह्या धर्मशाळेत येऊन राहात असत. कोणी कण्हत, कोणी कुंथत; कोणी रडत, कोणी ओरडत; कोणाला रोग होते, कोणाला काही होते; कोणाला शारीरिक वेदना, कोणाला मानसिक. पृथ्वीवरचा तो नरक होता.

त्या भिकाऱ्यांत लहान होते, थोर होते; स्त्रिया, पुरुष, मुले - सारे प्रकार होते. धर्मा एका भिकाऱ्याचाच मुलगा होता. मानमोडीच्या साथीत त्याचा बाप त्याला सोडून गेला होता. भिकेची झोळी मुलाला देऊन तो निघून गेला. धर्माला वाईट वाटले. भिकाऱ्यालाही हृदय असते, प्रेम असते, सारे असते. बाप मेला

त्या दिवशी धर्मा वेड्यासारखा झाला होता. बापाचा देह ना पुरता येई, ना जाळता येई. पित्याच्या प्रेताजवळ तो रडत बसला. बाकीचे भिकारी जगण्यासाठी भीक मागावयास गेले. शेवटी म्युनिसिपालिटीचा खटारा आला व तो मुडदा गाडीतून नेण्यात आला. मेलेली कुत्री, मेलेली मांजरे, मेलेले उंदीर, मेलेले पक्षी त्या गाडीतूनच नेण्यात येत असत.

धर्मा त्या गाडीच्या पाठोपाठ रडत–रडत गेला. पित्याला पुरण्यात आले. धर्मा रडून माघारा आला. दुःख कमी झाले. दिवस जात होते. अधूनमधून त्या पित्याला पुरल्याच्या ठिकाणी तो जाई व फुले वाही. अश्रू ढाळी. बापाचे एक फाटके वस्त्र त्याने जवळ ठेवले होते. जणू ते पितृहृदय, पितृप्रेम त्याने बाळगले होते. रात्री ते फाटके तुटके वस्त्र पोटाशी धरून तो झोपी जाई. कितीही थंडी असली तरी ते तेवढेसे वस्त्र त्याला पुरे. त्याच्याजवळ पांघरावयास दुसरे काय होते? गरिबाला थंडी वाजतच नाही. श्रीमंतांची थंडी जगातील सारे गरम कपडे घालूनही राहात नाही. ते पित्याचे प्रेमळ वस्त्र धर्माला भरपूर ऊब देई.

धर्मा त्या वस्त्राला कधी धूत नसे. फाटावयाचे एखादे वेळी लवकर आणि ते थोडेच मळणार होते? गंगा का मळते, चंद्रसूर्य का मावळतात, देव का मळतो? प्रेम हे मळत नाही. ते सदैव उजळतच असते. धर्माजवळची ती चिंधी. श्रीमंतांनी ती पाहून नाक धरले असते. त्यांना तिची दुर्गंधी आली असती. अत्तरे, तेले, चमचमीत पदार्थ, फुलांचे हार गजरे ह्यांचाच वास घेण्याची त्यांच्या श्रीमंत नाकांना सवय झालेली असते. धर्माच्या चिंधीतील पितृभक्तीचा वास, प्रेमाचा वास, तो समजण्याची शक्ती त्यांच्या नाकात उरलेली नव्हती.

ती फाटलेली चिंधी आणखी फाटेल म्हणून धर्मा भीत असे. किती हळू हाताने तो ती धरी. जणू फूल कुस्करेल, अंकुर मोडेल. कमळावर भुंगा जितक्या हळुवार रीतीने बसतो, तितक्या हळुवारपणाने तो ती चिंधी धरी. कोणी ती चिंधी चोरील असे त्याला वाटे. आपला हा अमोल ठेवा कोणी लुबाडील असे भय त्याला वाटे. एखादा दुसरा भिकारी हात पुसायला, नाक पुसायला ही चिंधी नेईल असे त्याला वाटे. भिकारी भिकाऱ्यांचीही चोरी करतात! चिंधीही जवळ नसणाऱ्या भिकाऱ्यांपेक्षा धर्मा हा श्रीमंत होता. चिंधीचा तो मालक होता. चिंधीचा भांडवलवाला होता.

त्या दिवशी सरदार गोपाळदास यांच्याकडे विवाहसोहळा होता. गोपाळदासांची मुलगी हेमलता हिचा विवाह होता. हेमलता किती तरी शिकलेली होती. श्रीमंत बापाची ती लाडकी लेक; त्यात पुन्हा विद्याविभूषित आणि सुंदर मग काय विचारता? विलायतेत जाऊन आलेल्या एका तरुणाशी तिचा विवाह होणार होता. वधू-वरांचा जोडा फारच अनुरूप होता. सागर व सरिता, चंद्र व रोहिणी असा हा जोडा आहे, असे बडे लोक म्हणत.

गोरज मुहूर्तावर लग्न होते. शेकडो मोटारी येत होत्या. श्रीमंत स्त्री-पुरुष येत होते. विजेचा चमचमाट होता. वाद्ये वाजत होती. रेडिओ लागले होते. फुलांचा, अत्तरांचा घमघमाट सुटला होता. मोठ्या थाटात लग्न लागले.

दुसऱ्या दिवशी गोपाळदासांकडे मोठी मेजवानी होती. दिवाणखान्यात मनोहर बिछाईत केलेली होती. लोड होते, तक्के होते, पानसुपारीची चांदीची तबके होती. श्रीमंतांची थुंकी झेलावयाला पिकदाण्या तयार होत्या. संगीत चालले होते, खेळ चालले होते. तेथे कशाची वाण नव्हती.

पंक्ती बसल्या. चंदनाचे पाट होते, चांदीची ताटे होती. उदबत्त्यांचा घमघमाट होता. पक्वान्नांचा सुवास सुटला होता. मंडळी जेवावयाला बसली. आग्रह होत होता. मंडळींचे नको नको चालले होते. प्रत्येकाच्या पानात चार उपाशी लोकांचे पोट भरेल इतके अन्न फुकट जात होते. 'अहो, घ्या आणखी एक लाडू व मग वर सोडा घ्या, पोट हलके होईल. घ्या की...' असे चालले होते. डॉक्टर आहेत, सोडे आहेत मग खायला कमी का करावे? परंतु श्रीमंतांची चैन निराळ्याच प्रकारची असते. नीरो नावाच्या रोमन बादशहाला रोम शहराला आग लावून ती बघण्यात मौज वाटे. तसेच ह्या श्रीमंतांना अन्नाचा नाश करण्यात मौज वाटत असते. 'कोणाच्या पानात काही टाकले नसेल' तर ते श्रीमंतांना अपमानाचे वाटते. ज्याच्याकडे अन्न जास्त फुकट जाते तो जास्त श्रीमंत.

जेवणाऱ्यांना श्रम होत होते. शेतात काम करणाऱ्या मजुराला घाम सुटत नाही, इतका घाम लाडू फोडताना व तो तोंडात टाकताना त्यांना येत होता. श्रमाचा विसर पडावा म्हणून रेडिओ लावले होते. घाम जिरावा म्हणून पंखे फिरत होते. थोरा-मोठ्यांचे जेवण ते का पाचदहा मिनिटांत आटपणार होते? तास दोन तास पंगत चालली होती.

बाहेर दाराशी ही कसली गर्दी ? ही मंडळी कोणाच्या मेजवानीसाठी आली आहेत ? ह्यांना कोणी बोलावले ? प्रेमाला बोलावणे लागत नाही. भिकाऱ्याचे सर्वांवर प्रेम असते. तो सर्वांच्या घरी जातो. त्या धर्मशाळेतील शेकडो भिकारी तेथे जमले होते. पानातील उष्टेमाष्टे मिळावे म्हणून ते आले होते. दारातील उद्धट नोकर त्यांना दरडावीत होता. 'अजून पंगत उठली नाही, तो आले कुतरे. ओरडाल तर खबरदार, वर बडी बडी मंडळी जेवत आहेत, तुम्हाला लाज नाही वाटत ? कावळ्यांची जशी कावकाव, कोल्ह्यांची कोल्हेकुई, तसं तुम्ही चालवलं आहे. गडबड कराल, तर काही देणार नाही.' नोकर व्याख्यान देत होता.

'नको रे दादा असं करू. आम्ही गप्प बसतो. दोन दिवसांचे उपाशी आहोत. धन्याला पुण्य लागेल. ताईबाईला आठ लेकरं होतील.' वगैरे बोलणी भिकाऱ्यांची चालली होती.

मेजवानीच्या ठिकाणचे दृश्य व हे रस्त्यावरील दृश्य ही दोन्ही दृश्ये पाहून त्या नगरच्या वैभवाची खरी कल्पना आली असती. आत संपत्ती होती; बाहेर विपत्ती होती. आत संगीत होते, बाहेर रडगाणे होते. आत ढेरपोट्ये होते, बाहेर खोलपोट्ये होते. आत विपुलता होती, बाहेर दुर्मिळता होती. आत सुकाळ होता, बाहेर दुष्काळ होता. आत अजीर्ण होते, बाहेर उपासमार होती. आत



सुख होते, बाहेर दुःख होते. आत आनंद होता, बाहेर खेद होता. आत जीवन होते, बाहेर मरण होते. आत सन्मान होता, बाहेर मिंधेपणा होता. आत स्वर्ग होता, बाहेर नरक होता. आत चष्मे होते, बाहेर आंधळे होते. आत पोषाखी होते, बाहेर उघडे होते. आत खाण्याचा आग्रह चालला होता, बाहेर नोकर गुरगुरत होता. आत पंखे होते, बाहेर ऊन होते. आत थंडगार होते, बाहेर झळा होत्या. ती दोन दृश्ये – त्यांतील विरोध अंगावर शहारे आणणारा होता, हृदय हलविणारा होता, विचार जागृत करणारा होता.

बडी मंडळी उठली. त्यांनी करकमळांचे प्रक्षालन केले. हात–रुमालांनी पुसून ते दिवाणखान्यात गेले. सुंदर रेशमासारख्या मृदू पिकलेल्या पानांचे तांबूल मुखकमलांत जाऊ लागले. ओठ रंगू लागले. मिशावंतांच्या थोड्या मिशाही रंगल्या. गायनाला रंग चढला, परंतु गाणे ऐकता ऐकता थकलेली मंडळी लोडांजवळ वामकुक्षी करू लागली.

श्रीमंतांच्या ताटांतील अन्न बालड्या भरभरून खाली नेण्यात आल्या. लाडू, जिलब्या, भजी - सारे त्यात होते. भिकारी अस्वस्थ झाले. त्यांच्यांत चळवळ सुरू झाली. कोणी पुढे घुसू लागले. कोणी गरीब बापडे मागे सरकू लागले. नोकरांनी त्या बालड्या दाराशी आणल्या. ज्याची वाट पाहात ते भक्त इतका वेळ उन्हात ताटकळत उभे होते, ते त्यांचे परब्रह्म बालड्यांतून दिसू लागले.

पाखरांना ज्याप्रमाणे दाणे फेकतात, उज्जयिनीला क्षिप्रा नदीतील माशांना व कासवांना सरकारी नोकरांकडून कणकेचे गोळे जसे फेकण्यात येतात, त्याप्रमाणे ते नोकर अन्न फेकू लागले. ते घेण्यासाठी झोंबाझोंबी होऊ लागली. परातीत अन्न घेऊन नोकर उभा राहिला. भिकारी हात वर करू लागले. 'अरे, मला हात लागेल ना. दूर सरा.' असे तो सनातनी नोकर ओरडला. लाडू, जिलब्या, भजी त्यांच्या झोळ्यांत, त्यांच्या पदरात टाकण्याऐवजी तो फेकी. कोणी आडदांड भिकारी वरच्यावर झेलीत. जमिनीवर पडे ते वेचण्यासाठी मारामारी होई. नोकराचा खेळ चालला होता. तो त्या भिकाऱ्यांना लढवीत होता. रेड्यांच्या झुंजी, कोंबड्यांच्या झुंजी संस्थानिक लावतात. ह्या श्रीमंतांच्या नोकराने भिकाऱ्यांच्या झुंजी लावल्या.

धर्माला अद्याप काहीच मिळाले नव्हते. तो पुढे घुसे, परंतु पुन्हा मागे लोटला जाई. शेवटी होती नव्हती ती शक्ती एकवटून तो पुढे सरकला व एकदम त्याने हात वर केला. त्या नोकराच्या परातीला तो हात लागला! अब्रह्मण्यम्! तो सनातनी धर्मनिष्ठ नोकर खवळला. 'माजलीत तुम्ही भिकारडी. शिवलास ना मला. कोठे आहे तो पोरगा?' असे तो गरजला. 'हा पाहा, हा पाहा', असे म्हणून इतर भिकारी धर्माला पुढे आणू लागले. त्या नोकराने त्याचा हात धरला व त्याच्या दोन-चार थोबाडीत दिल्या. धर्मा खाली पडला. त्याच्या पोटावर त्या धार्मिक नोकराने - पापभीरू नोकराने - लाथ मारली! धर्माने केविलवाणी किंकाळी फोडली; परंतु त्याच वेळेस गाण्याची एक सुंदर प्लेट दिवाणखान्यात लागली होती; त्यामुळे ती किंकाळी वर कोणालाच ऐकू गेली नाही.

खरकटे वाटून झाले. 'दादा, आम्हाला नाही रे काही मिळालं. आम्ही जरा थांबतो. दुसऱ्या पंक्तीचं दे रे दादा थोडंसं.' असे काही दीन भिकारी म्हणत होते. दिवस मावळत आला. संध्याकाळ होत आली. तरीही काही भिकारी आशेने तेथेच घुटमळत बसले होते. रस्त्यावरच्या थंड होणाऱ्या धुळीत बसले होते. रात्र झाली, शहरात दिवे लागले. गोपाळदासांचा बंगला इंद्रपुरीसारखा दिसू लागला. आकाशातील हजारो तारकाच खाली येऊन त्यांच्या घराच्या आत-बाहेर चमकत होत्या की काय कोणास कळे! का दीनदरिद्री लोकांचे जळते आत्मे होते ते? रात्री गोपाळदासांकडे जलसा होता. प्रसिद्ध गवई आले होते. नाचरंगही होता. ऐषआरामाला व सुखविलासाला तोटा नव्हता.

परंतु तो धर्मा कोठे होता? अन्नाची वाट पाहून सारे भिकारी गेले. त्या धर्मशाळेत सारे शिरले. मिळालेले तुकडे तळ्याकाठी बसून ते खाऊ लागले. परंतु धर्मा कोठे आहे? तो का अजून भीक मागत हिंडत होता? का पित्याच्या अस्थी जेथे होत्या, तेथे तो पूजा करावयास गेला होता?

रात्रीचा थंडगार वारा सुटला होता. रस्त्याच्या कडेला लोटलेला तो पाहा एक जीव जिवंत होत आहे. अरे, हा तर आपला धर्मा. त्याच्याने उठवत नाही. ईश्वराचा वाऱ्याच्या रूपाने आलेला थंड शीतल हात त्याच्या सर्वांगावरून फिरला. त्याच्यात जीवन आले. हे काय? तो काय शोधीत आहे? धर्मा? काय रे तुझे हरवले? लाडू–जिलबीचा तुकडा? भजे का भाजी? काय हरवले?

'गेलं, माझं सर्वस्व गेलं. अरेरे! आता मला कोणाचा आधार? मला ऊब कोण देईल? माझे अश्रू कोण पाहील? नेलं. माझं ते धोतर नेलं. लुटलं मला. माझा ठेवा कोणी रे देवा नेला? वडिलांची कृपा गेली, ते छत्र गेलं...' त्या मुलाचा शोक, त्या भिकाऱ्याच्या पोराचा शोक भाकरीसाठी नव्हता, लाडवासाठी नव्हता, जिलबीसाठी नव्हता, पित्याच्या त्या स्मृतिचिन्हासाठी होता. त्या जीर्ण चिंधीसाठी होता.

धर्माच्या पोटात कळा येत होत्या. त्या भुकेच्या होत्या का लत्ताप्रहाराच्या होत्या, का उभय होत्या? पोटावर हात ठेवून कसा तरी धर्मा चालत जात होता. त्याचे होते नव्हते ते सारे बळ जणू निघून गेले. त्या वस्त्रात चैतन्य होते. त्याचे प्राण वस्त्रमय होते. वाटेत घेरी येई, डोळ्यांसमोर अंधारी येई व तो बसे. कसे तरी करून तो त्या धर्मशाळेत जाऊ इच्छीत होता.

शेवटी तो पोहोचला. त्या तळ्याच्या काठी तो गेला. तेथे तो रडत बसला. डोळ्यांतील अश्रुसागर तलावात रिता होऊ लागला. तो तलाव जणू भिकाऱ्यांच्या आसवांचाच झालेला होता. रडता रडता धर्मा झोपला. त्याला चिरझोप लागली.

गोपाळदासांच्या घरी संगीत चालले होते. 'वाहवा, क्या मजा है!' असे रसिक म्हणत होते, सिगरेट ओढीत होते. विडे खात होते. पेले झोकीत होते.

सकाळची वेळ झाली. सूर्यनारायण बाहेर आला. पाखरे घरट्यांतून बाहेर पडली. भिकारी वणवण करण्यासाठी बाहेर पडले. परंतु त्या तळ्याकाठी कोण अजून निजलेले आहे? धर्मा आहे तो. त्याचे प्राणही देवाघरी भिक्षा मागण्यासाठी गेले आहेत. तेथे तरी त्याला भीक मिळेल का?

❖ ❖ ❖

घामाची फुले : कथा पाचवी

ज्याचा भाव त्याचा देव

गोष्ट फार जुनी. त्या वेळेस आजच्यासारखी स्थिती नव्हती. प्रत्येक गाव सुखी होता, समृद्ध होता, सर्वांना उद्योग होते. गावात कुंभार मडकी घडवी, चांभार जोडे शिवी; विणकर विणी, लोंढारी लोंढी; पिंजारी पिंजी, रंगारी रंगवी; तेल्याचा घाणा चाले, बुरुडाचे टोपल्या-रोवळ्यांचे काम चाले. लोक फावल्या वेळेत सूत कातीत. गावात नसे भांडण, नसे तंटा. काही कलागत झालीच तर गावातील गावसईत त्याचा निकाल लागे, तो निकाल सारे मान्य करीत. नव्हती कोर्टे, नव्हत्या कचेऱ्या; नव्हते वकील, नव्हत्या तारखा; नव्हते भत्ते, नव्हते अवाढव्य खर्च, रामराज्यच होते म्हणा ना.

साधारण प्रत्येक गावात त्या काळी शाळा असे. शाळेत एक पंतोजी असे. पंतोजीला गावात फार मान असे. दिवसा तो मुलांस शिकवी. रात्री महाभारत, भागवत लोकांना वाचून दाखवी. कोठे तंटा झाला तर पंतोजी मिटवावयाला असावयाचा. पंतोजी साऱ्या गावाचाच जणू शिक्षक असे. पंतोजीला पगारबिगार नसे. लोक त्याला राहावयास घर देत, खावयाला धान्य देत. कोणी भाजी आणून देई, कोणी पानफुले आणून देई. पंतोजी सर्वांचा. त्याचे काही नसून सारे त्याचे होते. त्याला कशाची वाण नसे. त्याच्या घरी लग्न-मुंज किंवा काही समारंभ वगैरे असले तर सारा गाव ते कार्य आपलेच समजून पार पाडी.

त्या गावाचे नाव होते सोनगाव. खरोखरच सोन्यासारखा होता गाव. स्वच्छ हवा, मुबलक पाणी. बारा महिने नदी वाहात असे. नदी म्हणजे गावाची कळा, गावाचे वैभव. ज्या गावाला नदी, तेथे दैन्य नाही कधी- अशी म्हणच आहे.

सोनगावच्या पंतोजींचे नाव रामभाऊ. रामभाऊंचे वय फार नव्हते. तिशीच्या आत-बाहेर. मोठे धार्मिक, कर्मिष्ठ; मोठ्या पहाटे उठावयाचे, नदीवर जाऊन स्नान करून यावयाचे. संध्या-नमस्कार करून शाळेत जावयाचे. प्रहरभर दिवस येईपर्यंत सकाळची शाळा चाले. मग सुट्टी होई. दुपारी जेवण झाल्यावर रामभाऊ नियमाने सूत कातावयाचे. स्वत:च्या धोतरे-उपरण्यासाठी व पत्नीच्या लुगडासाठी तेच सूत कातीत. पतीच्या हातच्या सुताचे लुगडे नेसताना पत्नीला धन्य वाटे. तिच्या हातचा स्वयंपाक चाखताना पतीला कृतार्थ वाटे. सूत कातून झाल्यावर ते थोडे वाचीत. नंतर पुन्हा शाळा. गाई घरी येईपर्यंत शाळा चाले. मग मुलांना घेऊन ते नदीकाठी जात. त्यांच्याबरोबर हुतुतू, हमामा खेळत, रंगत. अंधार पडू लागला की मुले घरी जात. रामभाऊ नदीवर हात-पाय धुवीत व तेथेच संध्या करीत. नंतर घरी येऊन भोजन करीत. रात्री देवळात रामविजय, हरिविजय, शिवलीलामृत- कोणती तरी पोथी वाचीत. असा रामभाऊंचा जीवनक्रम होता.

रामभाऊंना एक मुलगा होता. त्याचे नाव गोपाळ. असेल वर्षा-सव्वा वर्षाचा. मोठा चपळ व खेळकर. क्षणभर घरात टिकावयाचा नाही. गावातील पाटलाने गोपाळला 'वाळलेणे करून दिले. परंतु रामभाऊ म्हणाले, 'ब्राह्मणाला सोन्या-चांदीचे, हिरे-मोत्याचे दागिने शोभत नाहीत. ज्ञानाचा व शीलाचा दागिना त्याने मिळवावा व घालावा. त्यानेच त्याला शोभा.' रामभाऊंनी ते वाळलेणे स्वीकारले नाही.

थोर मनाचे रामभाऊ आजारी पडले. शाळा बंद राहू लागली. रामभाऊंचा ताप निघेना. घाम येईना. लक्षणे बरी दिसत ना. सीताबाई सचिंत दिसू लागल्या. त्या देवाला आळवीत होत्या. पतीची सेवा करीत होत्या. एके दिवशी तर त्यांना रडू आले. रामभाऊंनी त्यांना जवळ बोलावले व ते म्हणाले, 'मला काही तुला सांगायचं आहे, ते नीट ऐक.' पतीचे डोके मांडीवर घेऊन सीताबाई बसल्या. रामभाऊ म्हणाले,

'हे बघ, मरण कोणाला टाळता येत नाही. त्याचं दुःख कशाला? तुला मी गीता वाचून दाखवतो, त्यात नाही का सांगितलं? तुझे अश्रू पाहून मला वाईट वाटतं. गोपाळ आहे. त्याला तू वाढव, लहानाचा मोठा कर, देव सर्वांना आहेच. तो पोपटाला रंग देतो, मोराला पिसारा देतो, कोकिळेला गळा देतो.

त्याला साऱ्यांची काळजी. तू वाईट नको वाटून घेऊ. मी मरणार ह्यात शंका नाही. आज-उद्या. दोन दिवसांचा मी सोबती आहे. मला सारं कळून चुकलं आहे. बोलावणं आलं आहे. गेलं पाहिजे, नाही का? तू शांत व समाधानी राहिलीस तर मी सुखानं मरेन; परंतु तू रडू लागलीस तर मला मरताना शांत कसं राहाता येईल? माझी शांती तुझ्या हाती. मला मांडी दिलीस, आता मला शांतीही दे. पूस तुझे डोळे. ते ओले नको होऊ देऊ. रडणं हा देवाचा अपमान आहे. त्याच्या आमंत्रणाचा तो अपमान आहे. त्याच्या इच्छेला आपण राजी, आपण तयार असलं पाहिजे, नाही का?'

सीताबाई ऐकत होत्या. राम-सीतेचाच जणू तो जोडा होता. त्यांनी आपले डोळे पुसले. त्या दिवसापासून त्यांच्या डोळ्यांना पाणी आले नाही. त्या गंभीर व शांत होत्या. रामभाऊ त्यांना म्हणत, 'तुझं व्यंकटेशस्तोत्र म्हण. ऐकू दे मला. का सखूचं गाणं म्हणतेस? सखूचं गाणं तुझं आवडतं. म्हण तेच.' सीताबाई म्हणत व रामभाऊ ऐकत.

असे आजारीपणाचे दिवस चालले. एके दिवशी रामभाऊंनी राम म्हटला. सीताबाई एकट्या राहिल्या. गोपाळ लहान होता. त्याला पोटाशी धरून त्या रडल्या; परंतु पतीचे शब्द आठवून त्या पुन्हा शांत झाल्या. पतीचा आत्मा आपल्याभोवती असेल. हे अश्रू पाहून त्या आत्म्याला शांती मिळणार नाही असे मनात येऊन त्या लगेच अश्रू पुशीत.

सोनगावचे लोक हळहळले. गावची शाळा बंद पडली. पुन्हा कोठला एखादा शिक्षक मिळेपर्यंत ती बंदच राहाणार. सोनगावची मुले शेजारच्या गावच्या शाळेत जाऊ लागली. असेल कोसा-दीड-कोसावर ते गाव. त्या लांबच्या शाळेत जरा मोठी झालेली मुलेच जात. लहान मुले जात नसत. त्यांना भय वाटे.

गोपाळच्या आईची स्थिती आता वाईट होती. तिचा पती होता तोपर्यंत गावकरी जे लागेल ते आणून देत; परंतु आता तिच्याकडे कोणी लक्ष देईना. ती कोणाकडे दळण-कांडण करी, कोणाकडे धुणी धुवी; असे करून स्वत:चे व स्वत:च्या मुलाचे पोट भरी. गोपाळकडे पाहून ती सारे दु:ख गिळी. ती त्याला जवळ घेऊन म्हणे, 'माझा गोपाळ मोठा होईल व आपल्या आईचे कष्ट दूर करील.' चिमणा गोपाळ हसे व आई त्याचा मुका घेई.

गोपाळ आता मोठा झाला. पाच वर्षे संपून सहावे वर्ष त्याला लागले. गोपाळला आता शाळेत घातले पाहिजे असे आईच्या मनात आले. येत्या दसऱ्याला मुलाला शाळेत घालण्याचे तिने ठरविले. दसरा आला. गोपाळची आई आदल्या दिवशी गोपाळला म्हणाली, 'गोपाळ, उद्या दसरा. विजयादशमीचा दिवस. उद्यापासून तू शाळेत जा. तुझ्यासाठी माझ्या हातच्या सुताचं कापड केलं आहे. ते धोतर अंगावर घे. लाकडाची धूळपाटी घे, पाटीवर धूळ पसरून तीत बांबूच्या काडीनं अक्षरं काढ. एक काढून झालं की पुन्हा साफ करावं, नवीन अक्षर काढावं, अशा रीतीनं शीक. शाळा जरा लांब आहे; परंतु तेथील शिक्षक चांगले आहेत असं म्हणतात, ते तुला नीट शिकवतील. गोपाळ, शीक व मोठा हो. विद्या मिळव. तेच तुझं धन, तोच तुझा मान. जाशील ना शाळेत?'

गोपाळ म्हणाला, 'जाईन, बाबांसारखा मी शहाणा होईन.'

मुलाला पोटाशी धरून सीताबाई म्हणाल्या, 'शहाणा आहे माझा बाळ. गुणाचा माझा राजा.'

दुसऱ्या दिवशी सीताबाईंनी गोपाळला लवकर उठविले. त्याला त्यांनी आंघोळ घातली. गोपाळने नमस्कार घातले. त्याने गंध लावले. आईने विद्यादेवीची पूजा करावयास बरोबर फुले दिली, अक्षता दिल्या. निघाला गोपाळ बाळ. सीताबाई उंबऱ्यात उभ्या होत्या. गोपाळ गेला व त्यांना हुंदका आला. आज पती जिवंत असता तर गोपाळ घरीच शिकता, त्याला इतक्या लांब जावे लागले नसते इत्यादि विचार त्यांच्या मनात आले; परंतु पदराला डोळे पुसून त्या कामाला लागल्या. गरिबीला रडावयाला वेळ नसतो, हे एकपरी बरे.

गोपाळ शाळेत गेला. तेथील पंतोजींनी त्याची चौकशी केली. रामभाऊंचा मुलगा हे कळल्यावर त्यांनी त्याची पाठ थोपटली व ते म्हणाले. 'येत जा हं बाळ. हुशार हो. वडिलांची कीर्ती पुन्हा तू मिळव.'

गोपाळ घरी आला. आईने विचारले, 'गोपाळ! कशी आहे शाळा?' गोपाळ म्हणाला, 'फार चांगली. पंतोजी चांगले आहेत. त्यांनी पाठीवरून हात फिरविला व ते म्हणाले, 'चांगला हो. हुशार हो.'

सायंकाळ झाली. सीताबाई गोपाळचा परवचा घेत होत्या. त्याला रामरक्षा वगैरे स्तोत्रे शिकवीत होत्या. जेवण करून गोपाळ झोपी गेला. सीताबाई माळ

घेऊन जप करीत बसल्या. रुद्राक्षांची माळ. ती त्यांच्या पतीच्या जपाची होती. एखादे वेळेस माळ जपता-जपता सीताबाईच्या डोळ्यांतील आसवांची माळही सुरू होई.

एक-दोन दिवस गेले. एके दिवशी गोपाळ म्हणाला, 'आई, मी नाही जात शाळेत.' आईने विचारले, 'का रे बाळ? असं नये करू. शिकलं पाहिजे. विद्या मिळवली पाहिजे.' गोपाळ म्हणाला, 'नाही. मी जायचा नाही.' ती माउली म्हणाली, 'असा हट्ट नये करू गोपाळ. गरिबाला हट्ट करून कसं चालेल? का जात नाहीस ते तर सांग.' गोपाळ म्हणाला, 'मला सायंकाळी परत येताना त्या जंगलाजवळ भीती वाटते. इतर मुलं मोठी आहेत. ती पळत पुढं निघून येतात. मी एकटाच मागं राहातो. मला भय वाटतं. नको मला पाठवू शाळेत.'

गोपाळच्या आईने देवावर भरवसा ठेवला. ती म्हणाली, 'गोपाळ, तिथं रे कसली भीती? त्या जंगलात तर तुझा दादा राहातो. त्याला हाक मार. तो येईल.' 'काय, माझा दादा राहातो तेथे? मला दादा आहे? इतके दिवस तू का नाही सांगितलंस? दादा घरी ग का नाही येत?' असे गोपाळने उत्सुकतेने विचारले. सीताबाई म्हणाली, 'दादाला फार काम असतं. त्याला यायला वेळ नसतो. त्याचा धनी रागीट आहे. जा, तू हाक मार. थोडा वेळ तो तुझ्यासाठी येईल. जा बाळ.'

गोपाळ निघाला. तो पळतच निघाला. केव्हा एकदा दादा पाहीन असे त्याला झाले होते. तो त्या जंगलाजवळ आला. त्याने 'दादा-दादा' अशी हाक मारली. दादा येतो का गोपाळ बघत होता. तो काय आश्चर्य!

हलल्या वेली। मूर्ति सांवळी डोकावली ।। ध्रु० ।।
मोरपिसें तीं डोक्यावरतीं
स्वांदिं घोंगडी खाके काठी
वनमाळा ती शोभे कंठी
ओठीं मुरली ।। मूर्ति सांवळी डोकावली ।।

वेली हालल्या. पाने सळसळली. डोक्यावर मोराच्या पिसांचा मुगुट, तोंडात बासरी, असा दादा बाहेर आला. बासरी वाजवीत दादा आला.

गोपाळने विचारले, 'तू का माझा दादा? किती छान माझा दादा! मला देशील मोराची पिसे? उद्या दे हं मला आणून. हा पावा वाटतं? तुझ्या गाईसाठी,

होय ना?' गोपाळला खूप आनंद झाला. दादाचा हात धरून तो चालू लागला. दादाचा हात धरून सारखे चालत राहावे असे त्याला वाटले, मधूनच तो दादाच्या तोंडाकडे बघे, हसे, बोले.

दादा म्हणाला, 'गोपाळ! मी आता जातो. तुला भीती वाटली म्हणजे मला हाक मार.' दादा माघारा गेला. गोपाळ शाळेत गेला. शाळा सुटल्यावर गोपाळ मुद्दाम हळुहळू जात होता. सारी मुले पुढे गेली. त्याने दादाला हाक मारली. दादा गावापर्यंत त्याला पोहोचवीत आला व म्हणाला, 'ते बघ तुझं घर. जा हं आता.'

गोपाळ घरी आला व आईला म्हणाला, 'आई! दादा किती छान दिसतो, कसं गोड वाजवतो. डोक्यावर त्याच्या मोराची पिसं. मला देणार आहे उद्या दोन. मी रोज शाळेत जाईन.' सीताबाईंच्या डोळ्यांत पाणी आले.

'किती रे श्रमसी तूं वारंवार ।।'

हा चरण त्यांच्या ओठांवर आला. देव घोडे खाजवील, द्रौपदीला लुगडी पुरवील, तो दामाजीसाठी महार होईल, जनाबाईबरोबर दळील, तो कबीराचे शेले विणील, धर्माघरी उष्टी काढील. सीताबाई म्हणाल्या, 'देवा! माझ्यासाठी तू आलास ना धावून. तुझ्याशिवाय आम्हाला कोण आहे? आम्ही तुझी.'

एके दिवशी पंतोजी मुलांना म्हणाले, 'मुलांनो! माझ्या घरी मुंज आहे. तरी तुम्हाला आई-बापांपासून जी मदत मला देता येईल ती घेऊन या. माझं कार्य पार पाडा.'

गोपाळ आईला म्हणाला, 'आई! शाळेत पंतोजींनी काही तरी घेऊन येण्यास सांगितलं आहे. त्यांच्या घरी मुंज आहे. दे काही तरी.' आई म्हणाली, 'बाळ! आपल्या घरात काय आहे द्यायला? आपण गरीब आहोत.' 'काही तरी दे. इतर मुलं नाही तर मला हसतील--' गोपाळ रडवेला होऊन म्हणाला. सीताबाई म्हणाल्या, 'गोपाळ! दादाजवळ माग, तो देईल. जा.' 'खरंच. त्याच्याजवळ मागतो. तो काही तरी जम्मत देईल,' असे म्हणत गोपाळ निघाला.

गोपाळ दादाला म्हणाला, 'दादा, पंतोजींनी काही मदत घेऊन येण्याबद्दल सांगितलं आहे. काही तरी दे.' दादा म्हणाला, 'मी रे काय देऊ? मी गाईंचा गोवारी, म्हशींचा खिल्लारी. माझ्याजवळ रे काय आहे?' गोपाळ म्हणाला, 'हे रे काय असं? आई म्हणते, माझ्याजवळ नाही, तू म्हणतोस माझ्याजवळ

नाही. मग मी मागू तरी कोणाजवळ ? बाबा असते तर देते. दे, नाहीतर मी रडेन बघ.' दादा म्हणाला, 'रडू नको गड्या. माझ्याजवळ दह्याचं एक गाडगं आहे ते देऊ ? दह्याचं गाडगं नेशील ?' गोपाळ म्हणाला, 'हो. काहीही चालेल. दे गाडगं.'

दादाने शिंकाळी बांधलेले, दह्याने भरलेले गाडगे गोपाळच्या हाती दिले. गोपाळ शाळेत गेला. तेथे मुलांची गर्दी होती. मळेवाल्याच्या मुलाने केळीचे लोंगर आणले होते. सावकाराच्या मुलाने पंचवीस रुपये आणले होते.

मिठाईवाल्याच्या मुलाने पेढे आणले होते. कापडाच्या दुकानदाराने आपल्या मुलाबरोबर दोन ठाणे पाठविली होती. पंतोजी सारे घेत होते. गोपाळकडे कोणाचेच लक्ष जाईना. हातात गाडगे धरून तो कधीचा उभा होता. शेवटी तो मुसमुसू लागला.

पंतोजींचे लक्ष गेले. 'अरे, काय रे गोपाळ! काय झालं?' त्यांनी विचारले. गोपाळ स्फुंदत म्हणाला, 'माझं गाडगं कोणी नाही घेत.' पंतोजींनी विचारले 'काय आहे गाडग्यात?' 'दही' गोपाळ म्हणाला. पंतोजी म्हणाले, 'आण इकडे, ओतून घेतो.'

एका पातेल्यात त्यांनी गाडगे ओतले; परंतु पुन्हा ते गाडगे भरलेले. पुन्हा त्यांनी ओतले. तर गाडगे पुन्हा भरलेले! घरातील सारी भांडी भरली तरी गाडगे रिते होईना. साऱ्या गावकऱ्यांनी दही भुरकले. देवाघरचे दही. अमृतासारखे ते गोड होते. किती खाल्ले तरी वीट येईना. पोट भरेना. हवे-हवेसेच वाटे. सारे लोक आश्चर्यचकित झाले.

पंतोजींनी गोपाळला विचारले, 'गोपाळ! कोणी दिलं बाळ हे गाडगं?' गोपाळ म्हणाला, 'माझ्या दादानं'. पंतोजींनी पुन्हा विचारले, 'मला दाखवशील तुझा दादा?' गोपाळ आनंदाने म्हणाला, 'हो. माझ्याबरोबर या, म्हणजे दाखवीन. किती छान आहे माझा दादा. डोक्यावर मोराची पिसं, तोंडात पावा, खांद्यावर घोंगडी. गोड बोलतो. गोड वाजवतो. दाखवीन तुम्हाला. तुम्हालासुद्धा आवडेल.'

सायंकाळ झाली. मुले घरोघर गेली. गोपाळ व त्याचे पंतोजी निघाले. पंतोजींनी वाटेत पुन्हा विचारले, 'गोपाळ, खरंच कोणी दिलं रे गाडगं?' गोपाळ म्हणाला, 'खरंच म्हणजे? मी का कधी खोटं सांगतो? आई सांगते, नेहमी खरं बोलावं. खोटं बोललो तर आईला वाईट वाटेल. खरंच दादानं दिलं ते.' पंतोजींनी विचारले, 'तो कोठे राहातो?' गोपाळ म्हणाला, 'त्या राईत. ओढ्याकाठच्या जंगलात. तेथे गाई चारतो. त्याला घरी यायला वेळ नसतो. त्याला फार काम. मला भीती वाटे म्हणून मी आईला सांगितलं. आई म्हणाली, 'त्या रानात तुझा दादा आहे त्याला हाक मार.' मी हाक मारली तर खरंच आला. रोज माझ्याबरोबर येतो. त्यानंच दिलं गाडगं. आईजवळ काही नव्हतं. ती म्हणाली, 'जा, दादाजवळ माग.'

बोलत-बोलत दोघे जंगलाजवळ आले. गोपाळने 'दादा दादा, हे बघ पंतोजी तुला पाहायला आले आहेत. ये रे लवकर –' अशी हाक मारली; परंतु आज वेली हालल्या नाहीत, पाने सळसळली नाहीत. गोड तोंड डोकावले नाही. पंतोजी म्हणाले, 'गोपाळ! बऱ्याच गप्पा मारतोस. अरे, ह्या जंगलात वाघ, लांडगे राहातात. कोठला दादा व कोठल्या गाई. खरं सांग कोणी दिलं गाडगं ते.'

गोपाळ कळवळून व रडकुंडीस येऊन म्हणाला, 'खरंच माझ्या दादानं दिलं. मला खोटा नका म्हणू. माझ्या आईला वाईट वाटेल.' गोपाळने पुन्हा दादाला हाक मारली व तो म्हणाला, 'दादा ये. आजच्या दिवस तरी ये. तुला मी रोज त्रास देतो म्हणून रागावलास होय? नको रागावू. उद्यापासून रोज नको येऊ. पंतोजी मला खोटा म्हणतात, म्हणून तरी ये. ये, दादा, ये. ये.'

दादा आला नाही; परंतु झाडांतून, त्या जंगलातून गंभीर आवाज ऐकू आला. पंतोजी कान टवकारून ऐकू लागले. काय होता तो आवाज? काय होती ती वाणी? ती वाणी पुढीलप्रमाणे होती––

'नाही, मी येणार नाही. तुझ्या आईची माझ्यावर जेवढी श्रद्धा आहे, तेवढी तुझ्या पंतोजींची नाही. ज्याचा भाव त्याचा देव. ज्याचे प्रेम, त्याचा मी.'

❉ ❉ ❉

घामाची फुले : कथा सहावी

थोर त्याग

चैतन्य म्हणून बंगाल प्रांतात एक फार थोर भक्त होऊन गेले. बंगाल प्रांतात वैष्णव धर्म त्यांनीच वाढीस लावला. त्यांनीच भक्तिभावाची गोडी लोकांस लावली; परंतु भक्त होण्यापूर्वी चैतन्य हे एक मोठे पंडित म्हणून प्रसिद्ध होते. न्यायशास्त्रात त्यांचा हात धरणारा कोणी नव्हता.

एके दिवशी चैतन्य एका नदीतीरावर नावेत बसण्यासाठी आले होते. त्यांच्याबरोबर फारसे सामान नव्हते. एका पिशवीत ते मावले होते. नदीतीरावर जाणारांची खूप गर्दी होती. नाव लवकर सुटणार होती. लोकांची धावपळ सुरू होती. चैतन्यही नावेत जाऊन बसले. नाव सुटली. नदीच्या भव्य व विशाल प्रवाहावर नाव झरझर चालू लागली.

स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता. नदीतीरावरची प्रचंड झाडे दुरून सुंदर दिसत होती. वाऱ्यावर माना डोलावून, माना वाकवून, नदीला जणू वंदन करीत होती. मध्येच विजेप्रमाणे तळपणारे मासे पाण्यात दिसत. काही-काही मासे चांगलेच मोठे होते. हळूच पाण्यातून डोके वर काढून बाहेरच्या सृष्टीचे ते दर्शन घेत. पाण्यातून वर येऊन बाहेरच्या जगाला जणू ते रामराम करीत. सूर्यकिरण त्यांच्या डोक्यावर पडून ते चमकत. त्या माशांना पाहून कोणी म्हणे, 'ह्यांच्यावर चांगली मेजवानी होईल--'. दुसरा कोणी म्हणे, 'परंतु येथे मिटक्या मारण्यापलीकडे काय करता येणार?' तिसरीकडे कोणी म्हणाला, 'तुम्हाला खाण्याशिवाय दुसरं दिसतं आहे काय? खाणं-पिणं एवढंच का माणसाचं काम?'

अशा प्रकारची बोलणी चालली होती. सूर्याचे ऊन नावेत लागत होते. तरी गार वारा वाहात असल्यामुळे उन्हाचा एवढा त्रास होत नव्हता. चैतन्य नदीच्या तरंगांकडे पाहात होते. त्यांच्या हृदयसागरावर सुद्धा शेकडो तरंग उठत होते. इतक्यात एकाएकी कोणी तरी त्यांच्याजवळ आले. कोणी तरी त्यांच्या खांद्यावर हात ठेवला. चैतन्य आपल्या समाधीतून जागे झाले. त्यांनी वर पाहिले, तो त्यांच्या दृष्टीस कोण बरे पडले? त्यांचा बालपणचा मित्र त्यांच्याजवळ येऊन उभा होता.

'गदाधर, किती वर्षांनी आपण भेटत आहोत? गुरूच्या घरून विद्या शिकून आपण गेलो, त्यानंतर आजच आपली गाठ पडली. ये, बैस. तुला पाहून मला किती आनंद होत आहे.' असे बोलून चैतन्यांनी गदाधरला आपल्याजवळ बसविले. ते दोघे तेजस्वी दिसत होते. विद्येचे तेज त्यांच्या तोंडांवर चमकत होते. पावित्र्याची व चारित्र्याची प्रभाही त्यांच्या मुखांभोवती पसरलेली होती. रविचंद्रांप्रमाणे ते शोभत होते. गंगायमुनांच्या प्रवाहांप्रमाणे ते शोभत होते. चैतन्यांची अंगकांती दुधाच्या फेसाप्रमाणे पांढरी स्वच्छ होती. गदाधर

काळे-सावळे होते. दोघांनी एकमेकांचे हात प्रेमाने धरले. थोडा वेळ कोणीच काही बोलले नाही. भावनांचा पूर ओसरला व संभाषणाला अवसर मिळाला.

चैतन्य : गदाधर, तुझं कसं काय चाललं आहे? आपण शिकत होतो तोपर्यंत मौज होती. त्या वेळेस पाखरांप्रमाणं आपण निश्चिंत होतो; परंतु शिरावर संसाराची जबाबदारी पडली की जीव गुदमरू लागतो. तू हल्ली काय करतोस? संसाराची दगदग फार नाही ना होत?

गदाधर : चैतन्य, माझं चांगलं चाललं आहे. अध्ययन व अध्यापन ह्यांत वेळ जातो. घरी काही मुलं शिकण्यासाठी राहिली आहेत. त्यांना मी शिकवितो. एक श्रीमंत जमीनदार त्यांचा खर्च चालवितो. आनंदात आयुष्य जात आहे. कधी कधी मागच्या आठवणी येतात. गुरुगृही असताना आपण दोघे एकदा भांडलो होतो, ती मजा मी मुलांना किती तरी वेळा सांगतो. चैतन्य, आपण भांडत असू. परंतु किती चटकन भांडण विसरून जात असू. जी भांडणं मनुष्य विसरून जातो त्या भांडणांत आनंदच असतो, नाही?

चैतन्य : गदाधर, परंतु जग भांडणं विसरण्यास तयार नसतं. पुनः पुन्हा भांडणं उकरून काढण्यास जग तयार असतं. विचित्र आहे हे जग! गदाधर, आपण विद्यार्थी असताना किती मनोरथ रचीत असू, मनात किती मांडे खात असू! तुला आठवतं का सारं?

गदाधर : हो, का आठवणार नाही? एके दिवशी तू गुरुजींना म्हणालास, 'मी न्यायशास्त्रावर असा ग्रंथ लिहीन की सारं जग त्याला डोक्यावर घेऊन नाचेल!' गुरुजींनी तुला आशीर्वादही दिला होता.

चैतन्य : गदाधर, लहानपणचा तो निश्चय मी पार पाडीत आहे. न्यायशास्त्रावर मी ग्रंथ लिहीत आहे व तो जवळ–जवळ पूर्ण होत आला आहे. गदाधर, तो ग्रंथ पाहून तुला आनंद वाटेल.

गदाधर : कोठे आहे तो ग्रंथ? तू बरोबर आणला आहेस का?

चैतन्य : हो. आणला आहे.

असे म्हणून चैतन्यांनी पिशवीतून तो हस्तलिखित ग्रंथ काढला. सुंदर कपड्यात तो गुंडाळलेला होता. अत्यंत काळजीपूर्वक लिहिलेला होता. चैतन्यांनी गदाधरांच्या हातात तो ग्रंथ दिला. गदाधरांनी ग्रंथ घेतला व ते वाचू लागले. चैतन्यांचे अक्षर मोत्यांसारखे होते.

पानांमागून पाने गदाधर वाचीत होते. जसजसे ते वाचू लागले तसतसे त्यांचे तोंड खिन्न होऊ लागले. त्यांच्याने तो ग्रंथ पुढे वाचवेना. त्यांनी तो गुंडाळून ठेवला. क्षणभराने त्यांनी तो चैतन्यांच्या हातात दिला. गदाधर काही बोलेनात. एक दीर्घ सुस्कारा मात्र त्यांनी सोडला.

आकाशातसुद्धा ढग आले. सूर्याला त्यांनी झाकाळून टाकले. नावेतील लहान मुलांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून जणू ते ढग आले होते. आयाबायांना बरे वाटले; परंतु एकदम जोराचा वारा सुटला. काळे काळे प्रचंड ढगावर ढग जमू लागले. वादळाची चिन्हे दिसू लागली. नदीच्या प्रवाहावर प्रचंड लाटा उसळू लागल्या; नाव नाचू लागली, डोलू लागली. लोकांना भय वाटू लागले. आयांनी मुलांना पोटाशी धरले. 'काय आम्ही पाप केले म्हणून हे वादळ आले–' असे कोणी बोलू लागले.

आकाश–प्रसन्न आकाश–सारे काळवंडून गेले. थोड्या वेळापूर्वी किती निरभ्र व स्वच्छ होते. कोणाला सांगितले तर खरेसुद्धा वाटणार नाही. निसर्ग लहरी आहे. निसर्गाचा अंश मनुष्यप्राणी, तोही लहरी आहे. क्षणापूर्वी गदाधरांचे तोंड किती प्रसन्न होते! परंतु त्यांचे तोंडही पाहा किती काळवंडले आहे! त्यांच्याही हृदयाकाशातील सूर्य लोपला आहे व ढग जमा झाले आहेत. काय बरे कारण झाले?

चैतन्य : गदाधर, काय होत आहे? एकाएकी ग्रंथ का मिटून टाकलास? तुझं काही दुखतं का? का घरची शोकाची एखादी आठवण झाली? सांग, काय झालं ते मला सांग. एकाएकी बाहेर वादळ होत आहे, तुलाही एकाएकी काय झालं?

परंतु गदाधर काही बोलत ना. त्यांच्या डोळ्यांतून ते का दोन अश्रू आले? तोंड फिरवून त्यांनी डोळे पुसले. चैतन्यांकडे क्षणभर त्यांनी पाहिले, परंतु त्यांना पाहवेना. त्यांची दृष्टी खाली झाली व पुन्हा भरून आली. चैतन्यांचे हात त्यांनी आपल्या हातात घेतले व त्या निर्मल हातांवर गदाधरांच्या डोळ्यांतील पाणी पडले. चैतन्य चमकले व दुःखी झाले.

चैतन्य : गदाधर, आज इतक्या वर्षांनी आपण भेटत आहोत. तुझं दुःख मला का सांगत नाहीस? गुरुगृही असताना तू तुझं सुख–दुःख मला नेहमी सांगत असस. तुझं पोट दुखलं तर मी तेल चोळीत असे व ते राहात असे.

लहानपणापेक्षा आज मी निराळा का आहे? सुखदुःखाच्या गोष्टी सांगावयास त्या वेळी मी योग्य होतो व आज अयोग्य का झालो? गदाधर, तुझे अश्रू लहानपणच्याप्रमाणे आज मोठेपणीही मला पुसू दे. तुझं दुःख शक्य तर दूर करू दे. जगात एकमेकांचं दुःख थोडं–फार हलकं करणं ह्याहून थोर काय आहे? असे शेकडो ग्रंथ लिहिण्यापेक्षा एखाद्याचे अश्रू पुसणं व त्याचं दुःख दूर करणं हे थोर आहे असं कधी कधी मला वाटत असतं; परंतु पांडित्य मिरविण्याची, कीर्ती मिळविण्याची आसक्ती मला अद्याप सुटत नाही. मोहच हे. हे जिंकणं कठीण आहे आणि म्हणूनच त्यांना जिंकून घेण्यात पुरुषार्थ आहे; परंतु जाऊ दे. तुझं दुःख समजून घ्यावयाचं, ते सोडून मी प्रवचन देत बसलो. सांग गदा, तुझं दुःख सांग. आपला मित्र आपणाजवळ दुःख सांगत नाही ह्याहून दुर्दैव कोणतं, दुर्भाग्य कोणतं? कशाचं दुःख तुला होत आहे? सांग.

गदाधर : चैतन्या, काय सांगू, कोणत्या तोंडाने बोलू?ज्या गोष्टीनं आनंद झाला पाहिजे होता, त्या गोष्टीनंच मला दुःख होत आहे. माझं दुःख सांगण्याची मला लाज वाटते. परंतु तुझ्याशी खोटं कसं बोलू? चैतन्या, न्यायशास्त्रावर मीही एक ग्रंथ लिहिला आहे; परंतु तुझा ग्रंथ वाचून माझ्या ग्रंथाची मला लाज वाटली. सूर्यासमोर काजवा, सागरापुढं डबकं, गरुडापुढं घुंगुरटं, त्याचप्रमाणे तुझ्या ग्रंथापुढं माझा ग्रंथ होय! चैतन्या, माझा ग्रंथ पंडितमान्य होईल, जगन्मान्य होईल असं मला वाटत होतं; परंतु माझा गर्व गळाला. सारी अहंता सरली. चैतन्या, तुझा ग्रंथ असताना माझा ग्रंथ हातात कोण धरील? सोनं मिळालं असता मातीला कोण विचारील? तुझा ग्रंथ पाहून मला आनंद झाला पाहिजे होता; परंतु इतक्या वर्षांची माझी आशा क्षणात धुळीस मिळाल्यामुळं मी दुःखी झालो. ही निराशा सहन करण्याचं धैर्य मला नाही. चैतन्या, किती झालं तरी मी मनुष्यप्राणी आहे. तुझ्याबद्दल मला मत्सर वाटतो असं नाही; परंतु माझी घोर निराशा मला दुःख देत आहे. हळुहळू ती निराशा मी जिंकून घेईन. चैतन्या, माझा तिरस्कार तुला वाटत असेल; असा कसा हा मित्र, असे तू म्हणत असशील! परंतु क्षमा कर. खरं ते तुला सांगितलं. तुला पाहून मला आनंद झाला; परंतु तुझा हा अपूर्व ग्रंथ पाहून माझी फार निराशा झाली.

गदाधरांना पुढे बोलवले नाही. दोघे मित्र नदीच्या प्रवाहाकडे पाहात होते. वादळ येणार होते; परंतु ढग वितळले, नाहीसे झाले. सूर्य पुन्हा दिसू लागला.

लोकांना आनंद झाला. नाव झरझर चालू लागली. तासा अर्ध्या तासाने किनारा येईल असे नावाडी म्हणू लागले.

चैतन्य काही तरी विचार करीत होते. त्यांची चर्या गंभीर होती. डोळे स्थिर होते. त्यांच्या डोळ्यांत त्या वेळेस प्रेम, करुणा वगैरे भावनांचे मिश्रण दिसत होते. चैतन्यांच्या मांडीवर तो ग्रंथ होता. सुंदर वेष्टणात तो गुंडाळलेला होता. चैतन्यांनी तो ग्रंथ हातात घेतला. 'हे काय, हे काय' असे गदाधर म्हणत आहे तोच, तो ग्रंथ चैतन्यांनी त्या विशाल नदीच्या पात्रात फेकून दिला. नदीच्या गंभीर प्रवाहाने तो ग्रंथ शत-तरंगांनी आपल्या हृदयाशी धरला आणि खोल अंतरंगात ठेवून दिला.

चैतन्यांच्या गंभीर तोंडावर आता प्रेम पसरले होते. सरोवरावर कमळे फुलावी तसे प्रेम त्यांच्या मुखावर फुलले होते. त्या वेळेस चैतन्यांच्या तोंडावर असा काही मोहकपणा होता की, त्याचे वर्णन कोण करील?

गदाधर : चैतन्या, काय रे हे केलंस? काय केलंस? तुझ्या अशा करण्यानं मला आनंद आहे. ग्रंथ लिहीत असताना कितीदा तरी मनात येई की, मी व तुझं नाव चिरंतनच स्मरणीय राहील. चैतन्या, मित्रा, अरे असा अमोल ग्रंथ कसा रे फेकलास? क्षणभर माझी निराशा झाली, पण मी विसरून गेलो असतो. जगाचं फार मोठं नुकसान तू केलंस. तू केलंस असं म्हणण्यापेक्षा मीच ते केलं. माझं तोंड उतरलं नसतं, माझं दुःख मी सांगितलं नसतं तर असं होतं ना; परंतु आता काय! चैतन्या, गड्या!'

चैतन्य : गदाधर, झालं ते ठीक झालं. तुझाच ग्रंथ जगात जगू दे. त्यातच मला आनंद आहे. ग्रंथ लिहीत असताना कितीदा तरी मनात येई, की मी हे काय करीत आहे, कशाला ग्रंथ लिहीत आहे? हृदयात कोणी तरी असं बोले; परंतु तो गोड मंजुळ आवाज, ती हृदयातील खोल ईश्वरी वाणी, तिचा मी अव्हेर करीत असे. मला आसक्ती जिंकलीच पाहिजे. गदाधर, तुझ्यावर उपकार म्हणून नव्हे, तर माझा मोह जिंकण्यासाठी म्हणून तो ग्रंथ मी फेकून दिला. आसक्तीला जिंकण्यासाठी अशा शेकडो ग्रंथांचं मोल द्यावं लागलं तरी ते थोडंच होणार आहे! गदा, गड्या, असा खिन्न नको होऊ. तुझ्या ग्रंथात मी आहेच. एका गुरूचेच आपण शिष्य ना? राहू दे, तुझाच ग्रंथ राहू दे. तुझ्या ग्रंथाचं अध्ययन केल्याशिवाय न्यायशास्त्र पुरं अभ्यासिलं असं म्हणण्यास कोणी धजणार नाही. तुझ्या ग्रंथाची पूजा होईल. पंडित त्याला डोक्यावर घेतील. हस, गदा, हस, तो पाहा सूर्यसुद्धा पुन्हा हसू-खेळू लागला. त्याच्यावरचे ढग गेले. माझ्या गदाच्याही तोंडावरचे दुःख-निराशेचे ढग वितळू देत. गदा पुन्हा हसू दे, खेळू दे. होय. ते पाहा तुला हसू येत आहे. तू ते दाबू नकोस. हास्याला कधी दाबू नये. जगात साऱ्यांच्या तोंडावर हसं खेळावं असं मला कधी कधी वाटत असतं. कृपाळू परमेश्वराच्या ह्या जगात कोणीही दुःखी-कष्टी असू नये असं मला वाटत असतं, हस. गदाधर, हस. तुझ्या तोंडावर हसू यावं व डोळ्यातील आसू जावं म्हणून मी काय करणार नाही? हा ग्रंथच काय, पण माझे प्राणही फेकून देईन. पुढं मी साऱ्या जगाला सुखविण्यासाठी झटणार आहे;

परंतु आज मित्राला तरी हसवू दे. तुझ्यापासूनच आरंभ करू दे. त्यागाचा व प्रेमाचा पहिला धडा आज मला शिकू दे. पहिलं पाऊलच कठीण असतं. गदा- !

असे म्हणून चैतन्यांनी प्रेमभराने गदाधरास मिठी मारली. गदाधराचे हृदय गहिवरून आले. डोळ्यांत आनंदाश्रू आले. दोघांच्या तोंडावर अपूर्व तेज चमकत होते. हातात हात घेऊन दोघे प्रवाहाकडे पाहत होते. 'तीर आलं, किनारा आला,' नावाडी ओरडू लागले. लोक सामान-सुमान बांधू लागले. लहान मुले उठून किनारा पाहू लागली. 'खाली बसा, पडाल!' असे म्हणून आई-बाप त्यांना दवकावीत होते. नावेवरचे शीड गुंडाळण्यात आले.

चैतन्य : गदाधर, ह्या जगाच्या मुशाफरीत आपण पुन्हा कधी भेटू?

गदाधर : चैतन्या, आता आपण भेटलो नाही तरी एकमेकांस थोडेच विसरणार आहोत? तुझी मला प्रत्यही आठवण येत जाईल व ती आठवण सांगताना माझे डोळे भरून येतील. प्रेमपूर्वक त्यागानं, प्रेमानं तू मला कायमचं बांधून टाकलं आहेस. त्यागपूर्वक मी जगाला न्यायशास्त्र शिकविणार; परंतु चैतन्या, तू निरपेक्ष प्रेमाचं शास्त्र शिकविणार! न्यायशास्त्र, ते नीरस घटपटाचं शास्त्र शिकविण्यासाठी तुझा अवतार नाही; परम मंगल प्रेम शिकविण्यासाठी तुझा अवतार आहे!

चैतन्य : प्रेम, प्रेम, प्रेम! होय, ह्या जगाला, ह्या दुःखी कष्टी जगाला प्रेमाची आवश्यकता आहे. प्रेम भरू दे; माझ्या हृदयात प्रेमाचा सागर भरू दे व तो जगाला देऊ दे. सुष्ट वा दुष्ट, साऱ्यांना प्रेमाचा मेवा मला नेऊन देऊ दे. होय गदाधर, हेच माझं काम, हेच माझं जीवितकार्य. सापडलं, माझं जीवितकार्य मला सापडलं.

गदाधर : जीविताचं कार्य मिळालं तो धन्य आहे, कृतकृत्य आहे तो.

* * *

घामाची फुले : कथा सातवी

मातृभक्ती

एका गावात एक विधवा बाई राहात होती. ती गरीब होती. तिला तीन मुलगे होते. ते तीन मुलगे हीच तिची काय ती इस्टेट, तोच तिचा आधार. आपली मुले मोठी होतील व आपले पांग फेडतील असे त्या कष्टाळू माउलीस वाटत असे. आशेने व श्रद्धेने ती त्यांना वाढवीत होती, लहानांचे मोठे करीत होती. ती चार लोकांकडे चार धंदे करी व सर्वांचा सांभाळ करी. त्या मुलांची नावे गोपाळ, वामन व हरी अशी होती. गोपाळ हा सर्वांत मोठा. गोपाळ हा खेळात किंवा अभ्यासात, कशातच प्रवीण नव्हता; परंतु त्याचे हृदय थोर होते. जे हृदयाचे थोर असतात त्यांना देव बुद्धी कमी का देतो ? .थोर हृदय व मोठे डोके क्वचितच एकत्र आढळतात. गोपाळचे भाऊ वामन व हरी हे मात्र फार हुषार होते. त्यांचे नंबर नेहमी वरती असावयाचे. गुरुजी त्यांना शाबासकी द्यावयाचे, वाहवा करायचे.

गोपाळला शाळेत गुरुजी नावे ठेवीत. मुलांना नावे ठेवू नये; हे शिक्षण-शास्त्रातले पहिले सूत्र, परंतु ते फार थोड्या शिक्षकांस माहीत असते. शाळेतील इतर मुलेही गोपाळला चिडवीत, त्याची टर उडवीत. इतर मुले पाठीस लागतील एक, परंतु प्रत्यक्ष पाठचे भाऊ, ते सुद्धा गोपाळला घालूनपाडून बोलत व त्याच्या हृदयाला घरे पाडीत. एके दिवशी वर्गात गुरुजी गोपाळला म्हणाले, ‘गोप्या, अरे, शाळेत कशाला येतोस, बैलोबा ? तू शुद्ध अडाणीच आहेस, नुसता दगड आहेस, दगड. अरे दगडाचा तरी उपयोग होतो. पायखान्याला तरी लावता येतो. तुझा काडीचा उपयोग नाही. उगीच आईला त्रास देतोस झालं. कुणाची धुणी धू, आचारी हो. हे शिकण्याचं तुझ्यानं काही होणार नाही.’

गुरुजींनी गोपाळाजवळ बुद्धी नाही हे पाहिले. परंतु त्याच्याजवळ हृदय होते हे त्यांनी पाहिले होते का ? बुद्धीइतकेच किंबहुना अधिक हृदयाला महत्त्व आहे हे गुरुजी विसरून गेले होते. गोपाळाचा दिलदार स्वभाव, सर्वांना मदत करण्याची त्याची वृत्ती हे गुण का मोलाचे नव्हते ?

गोपाळाला वाईट वाटले. आपण जीव द्यावा असे त्याला वाटले; परंतु जीव दिल्यावर आईला कोण ? तिचे पाय कोण चेपील ? तिला कामात कोण मदत करील ? तिचे अंथरूण कोण घालील ? हे त्याच्या मनात आले व त्याचा विचार बदलला. घरी येऊन गोपाळ आईला म्हणाला, ''आई, मी गुरुजींना आवडत नाही, भावांना आवडत नाही, माझा जगात काय उपयोग ? भूगोल माझ्या ध्यानात राहात नाही, गणित मला समजत नाही. देवानं मला का ग बुद्धी दिली नाही ? बुद्धी ही सर्वांत मोठी देणगी. तीच माझ्यापासून त्यानं का लपवून ठेवली ?' आई म्हणाली, 'बाळ, असं मनाला लावून घेऊ नकोस. नाही आलं गणित तर नाही; परंतु चांगलं काय व वाईट काय हे समजण्याची बुद्धी देवानं तुला दिली आहे. विवेकबुद्धी तुला दिली आहे. तुझं मनही किती थोर आहे ! गोपाळ, तू गुणांचा राजा आहेस. तू कोणाला आवडत नसलास तरी मला आवडतोस व देवालाही आवडशील. उगी, रडू नकोस.'

आईचे असे शब्द ऐकले की गोपाळाच्या अंगावर मूठभर मांस चढल्यासारखे होई. आईच्या एका आश्वासनपर शब्दाने जगातील सारे अपमान तो विसरून जाई. पायाखाली तुडवले गेलेले, सुकलेले गवत चार थेंब पडताच पुन्हा टवटवीत दिसते, मान वर करते. आईच्या शब्दांनी गोपाळचे पोळलेले मन तसेच टवटवीत होत असे.

काही दिवस गेले. पुन्हा एकदा गुरुजी गोपाळवर असेच खवळले. त्यांनी त्याचा कान चांगलाच पिरगळला; त्याच्या थोबाडीतही त्यांनी दिली. 'गद्धा, हल्या !' असे म्हणून बाकावर त्यांनी त्याला उभे केले.

शाळा सुटली. प्रत्येक जण गोपाळाला पाहून हसे व नाक मुरडी. आपले भाऊ तरी आपल्या दुःखात वाटेकरी होतील असे गोपाळाला वाटले व त्याने भावांस हाका मारल्या; परंतु भावांनी ऐकले न ऐकलेसे केले. ते इतर मुलांबरोबर ऐटीत पुढे जात होते. आपल्या बुद्धिहीन भावाबरोबर चालण्याची त्यांस लाज वाटत होती. शेवटी गोपाळच आपण होऊन त्यांच्याकडे धावत गेला; परंतु

ते पाठचे भाऊ वसकन त्याच्या अंगावर गेले व म्हणाले, 'मोठा आला दादा! झालेत दादा, पण अक्कल असेल तर शपथ. आमच्याबरोबर नको येऊस. तुझ्यामुळं आम्हालाही मुलं चिडवितात. तुझा मूर्खपणा आणि आम्हाला उगीच त्रास. तू एक पुढं तरी जा, नाही तर मागं तरी राहा.'

गोपाळ मागे राहिला. भावांचे ते कठोर विषासारखे शब्द ऐकून त्याच्या हृदयाचे पाणी-पाणी झाले. तो खिन्नपणे मंद-मंद पावले टाकीत चालला. त्याचे डोळे पाण्याने भरून आले होते. जगाने केलेल्या अपमानाचे त्याला विशेष वाटले नाही; परंतु सख्ख्या भावांनी केलेला अपमान, त्याला झोंबला; परंतु ते भाऊ होते. त्यांना क्षमा करणे हा त्याचा धर्म होता. त्याने आपल्या भावांना केव्हाच क्षमा केली.

वामन व हरी हरणासारखे उड्या मारीत घरी पुढे गेले. ते दोघे आईजवळ गेले व म्हणाले. 'आई, दादाला कशाला ग शाळेत पाठवतेस? त्याला आज गुरुजींनी बाकावर उभं केलं. आम्ही त्याचे भाऊ म्हणून इतर मुलं आम्हासही नावं ठेवतात. आई, असा कसा ग दादा अगदी मूर्ख, अगदी शुद्ध टोणपा--' आईने एकदम मुलांच्या तोंडावर हात ठेवला व ती म्हणाली, 'छीः छीः, असं बोलू नये. अरे तो तुमचा वडील भाऊ ना? लोक बोलले तर ते बोलून-चालून लोकच मुळी; परंतु तुम्हीही त्याला अशी नावं ठेवलीत तर त्याला कोणी धीर द्यावा? कुणाकडे त्यानं पाहावं, कुणाकडे जावं? त्याच्यावर तुम्ही प्रेम करा हो. त्याला अंतर नका हो देऊ- -' 'आम्हाला नाही अशा दगडावर प्रेम करता येत!' ते म्हणाले व बाहेर खेळावयाला निघून गेले.

आई एकटीच देवापाशी बसली होती. गोपाळाबद्दलचेच विचार मनात येऊन ती कष्टी झाली होती. तिला त्याच्याबद्दल वाईट वाटत होते. इतक्यात गोपाळ आला. स्फुंदत स्फुंदतच तो आईजवळ गेला. जगातला एवढाच एक काय तो त्याचा आधार होता. आईला मिठी मारून गोपाळ रड रड रडला. आईचे हात आपल्या हातांत घेऊन तो म्हणाला, 'आई, माझा काय बरं दोष? मी अभ्यास का करीत नाही? किती तरी करतो; पण माझ्या लक्षात राहात नाही व समजतही नाही. देवानं मला शहाणपण दिलंच नाही. अभागी आहे तुझा मुलगा!'

आईने गोपाळच्या डोक्यावर आपला प्रेमाने भरलेला हात ठेवला व वात्सल्यपूर्ण स्वराने ती म्हणाली, 'बाळ, देव तुझं चांगलं करील हो.' गोपाळ बाहेर गेला व आई कामाला लागली. आई हे परम थोर दैवत आहे. हुशार मुलांपेक्षा मूर्ख मुलांवरचं आईचे प्रेम अधिक असते. शहाण्यासुरत्या मुलांचे कसेही होईल, परंतु जो अडाणी त्याचे कसे होईल हीच आईला चिंता असते.

गोपाळ व त्याचे भाऊ ह्यांचे ह्याप्रमाणे शिक्षण चालले होते. तिघे भाऊ मॅट्रिकच्या वर्गात होते. गोपाळ दर वर्षी नापास होई, तरी त्याला वरती घालण्यात येत असे. त्याला मॅट्रिकलाही पाठविण्यात आले. परीक्षेचा निकाल लागला. वामन व हरी हे फारच चांगल्या तऱ्हेने पास झाले. त्यांना शिष्यवृत्त्या मिळाल्या. परंतु पास झालेल्या मुलांत गोपाळचे नाव नव्हते. वामन व हरी ह्यांची जो तो स्तुती करीत होता. भावांची स्तुती ऐकून सहृदय व निर्मत्सर गोपाळला आनंद होत होता. आईला तो म्हणाला, 'आई, मी गावात गूळ वाटतो.' आईने त्याच्याजवळ गूळ दिला. गोपाळ गावात सर्वांना म्हणे, 'माझे भाऊ पहिले आले. ते आता पुढे मोठे होतील. घ्या गूळ.' लोक गोपाळला हसत होते. काही त्याला म्हणाले, 'अरे, अगदीच वेडबंबू दिसतोस! तू नापास झालास तरी गूळ काय वाटतोस? घरात एका कोपऱ्यात रडत बसायचं ते सोडून भावांचंच नाव सांगण्यात फुशारकी काय मिरवितोस? तुला काही लाज आहे का नाही?' गोपाळ शांतपणे त्यांना म्हणाला, 'मी नापास झालो म्हणून काय झालं? माझे भाऊ पास झाले, त्यांना स्कॉलरशिप मिळाली, म्हणून साऱ्या गावाला आनंद होत आहे. मग मी तर त्यांचा भाऊच आहे; मला आनंद नाही का होणार? माझ्या आईला आनंद झाला आहे, माझ्या भावांना आनंद झाला आहे, मग मी का रडत बसू? त्यांच्या आनंदात माझं दुःख मी कधीच विसरून गेलो. माझ्या आईचं सुख, माझ्या भावांचं सुख, त्यातच माझं सारं सुख!' गोपाळाचे हे बोलणे ऐकून लोक आणखी मोठ्याने हसत व म्हणत, 'अगदी अजागळ आहे, ह्याला काही समजत नाही!

वामन व हरी पुढे कॉलेजात गेले. ते हुशार होते. भराभरा परीक्षा पास होत गेले. पाच-सहा वर्षे झाली. हरी आता मुन्सफ झाला व वामन इंजिनिअर झाला. दोघांना सुदैवाने मोठाल्या सरकारी नोकऱ्या मिळाल्या. त्यांनी तिकडेच

लग्ने केली, संसार थाटले, मोठमोठ्या बंगल्यांमधून ते सुखाने राहू लागले. नोकर-चाकर, गडी-माणसे, गाडी-घोडा—कशाची तूट नव्हती.

परंतु मोठ्या भावाची व आईची त्यांना आठवण येत होती का? गोपाळ मनात म्हणे, 'आपल्या आईला आता काही कमी पडणार नाही, कशाची ददात भासणार नाही. आईचं नष्टचर्य आता संपेल, ती सुखानं नांदेल. ती चांगली लुगडी नेसेल, दान-धर्म करील. तीर्थ-यात्रा करील. आईच्या हातांना आता भांडी घासायला नकोत, दळण दळायला नको. धुण्याच्या मोटा धुवायला नकोत.'

परंतु जगाची रीत निराळीच असते हे गोपाळला काय माहीत?

'बायकोला पीतांबर घाटी। आईच्या लुगड्याला सतरा गाठी।।'

हे वचन खरे असेल असे त्याला वाटत नव्हते. हळुहळू सारे त्याला कळू लागले. भावांनी आपले वैभव पाहावयास आईला नेले नाही. सहा-सहा महिन्यांत घरी बोटभर पत्रही पाठवीत नसत की चार पैसे धाडीत नसत!

गरीब बिचारा गोपाळ! त्याने आता मिलमध्ये नोकरी धरली. सूर्यनारायणाचे किरण पृथ्वीवर पसरू लागत व मिलचा काळाकुट्ट धूर शहरावर पसरू लागे. सकाळ होताच हजारो लोक त्या मिलरूपी राक्षसाच्या तोंडात जात व सायंकाळी पांढरे फटफटीत होऊन बाहेर पडत. गोपाळही अगतिक होऊन त्या काळ्या बकासुराच्या घरात जाऊ लागला. त्याला दहा-वीस रुपये मिळत. तो पहाटे चार वाजता उठे. स्नानसंध्या व पूजा करी. आईसाठी पाणी भरून ठेवी. भाकर करी व थोडी खाऊन बाकीची बरोबर बांधून नेई. सायंकाळी सहा वाजता दमून भागून तो घरी येई. झाड-लोट करी. पाणी उदक पाही. रात्री जेवण झाल्यावर तो आईला भक्तिविजय वगैरे वाचून दाखवीत असे. आईचे पाय चेपी व आईला झोप लागली आहे असे पाहून मग तो स्वतः अंथरुणावर पडे.

परंतु त्याच्या आईला कोठली झोप यायला? आधीच म्हाताऱ्या माणसांना झोप कमी, त्यातून गोपाळच्या आईला किती चिंता व काळज्या! ती डोळे मिटून स्वस्थ पडे; गोपाळला वाटे की, आईला झोपच लागली. गोपाळला अंथरुणावर झोप लागली म्हणजे त्याची आई उठे व गोपाळजवळ जाऊन त्याच्या डोक्यावरून हात फिरवी. त्याच्या कल्याणार्थ ती माउली देवाची आळवणी करी व आपल्या खोल गेलेल्या डोळ्यांतून रात्रीच्या शांत समयी चार टिपे काढी.

असे कष्टमय, परंतु आईच्या सेवेने व सान्निध्याने आनंदमय वाटणारे जीवन गोपाळ कंठीत होता. एखादे वेळेस गोपाळने वामन किंवा हरी ह्यांच्याकडे जर चार पैसे मागितले, तर ते लिहीत, 'तुम्हाला रे कसला खर्च? आम्हाला येथे गडी-माणसं, गाड्या-घोडी, कपडे-लत्ते, मुलं-बाळं, किती खर्च. घराचं भाडंच ५० रुपये होतं! आम्हाला पैसे पुरत नाहीत, गडी-माणसांस उरत नाहीत, तर तुम्हाला कोठून पाठवू? पंचवीस रुपये तुला मिळतात, ते का दोन जीवांना पुरत नाहीत? तूच ५-१० रुपये आम्हाला पाठव. पुष्कळ साठवून ठेवले असशील! लग्न तर केलं नाहीसच. आई एकदाच खात असेल. ५-१० रुपयांत तुमचं भागत असेल.' अशी आलेली उत्तरे गोपाळ आईला वाचून दाखवीत नसे.

पुष्कळ वर्षांनी वामन व हरी घरी येणार होते. एक बाई व एक गडी कामाला लावून ठेवण्याबद्दल त्यांनी गोपाळला आधी कळविले होते. गोपाळला आनंद झाला होता. भावांच्या स्वागताची त्याने तयारी करून ठेवली होती. दोघे भाऊ बायका-मंडळींसह मुले-बाळे घेऊन घरी आले. आईला आनंद झाला. सुनांनी तिला नमस्कारही केला नाही. नातवांना मात्र आजी आवडू लागली. आजी त्यांना गोष्टी सांगे, अंगावर नाचू देई. मुलांना आजीचा लळा लागला.

वामन व हरी येऊन फार दिवस झाले नाहीत, तोच त्या गावात तापाची साथ आली. बायका म्हणू लागल्या, 'चला येथून लवकर.' हरी व वामन एकदम जाण्याची तयारी करू लागले. गोपाळ आपल्या भावांना म्हणाला, 'आईलाही घेऊन जा चार दिवस. तिला थोडा थरेपालट होईल. सारा जन्म ह्या गावात तिनं काढला, कंटाळली आहे. जा घेऊन. नाशिक-पंढरपूर दाखवा. जरा हिंडवा. आणि येथे साथही आली आहे; आई आजारी वगैरे पडली तर शुश्रूषा करणं कठीण जाईल. मोठ्या शहरात सोयी असतात.' वामन व हरी एकमेकांच्या तोंडाकडे पाहात होते. शेवटी हरी म्हणाला, 'आईला न्यावयाला हरकत नाही. परंतु आईचं ते सोवळं-ओवळं, तिचा देव-देव हे फार असतं. मुलं तिला शिवतील, त्रास देतील. तिलाच वाटेल की कोठून इकडे आल्ये.' वामन म्हणाला, 'आणि गोपाळ, एकट्या आईचंही तुझ्यानं होत नाही का रे? तुला कोणाचीच जबाबदारी नको आहे. मुलाबाळांचं, सर्वांचं करता करता आम्हाला कोण यातायात होते, आणि तुला एक आईही जड झाली? गोपाळ म्हणाला, 'जड

नाही रे. आईची सेवा करण्यात मला आनंदच आहे; परंतु तिला येथे राहून राहून कंटाळा आला असेल म्हणून म्हटलं. आहात तुम्ही तिचे दोन मुलगे चांगले रोजगारी, म्हणून सांगितलं. आपण कुठं जावं असं तिच्या नसेल का रे मनात येत? हरी म्हणाला, 'तिच्या मनात काहीसुद्धा येत नसेल. ती हरी हरी म्हणत बसत असेल. तूच तिच्या मनात भल-भलतं भरवीत असशील. तुला इतर बुद्धी नाही, परंतु ही लावालावीची आहे वाटतं.'

गोपाळच्या डोळ्यांना पाणी आले. ही बोलणी आई ऐकतच होती. आई तेथे आली व म्हणाली, 'गोपाळ, मी येथेच आहे ती बरी आहे हो. तुला तरी येथे कोण आहे? आणि अरे, साथ नि बीथ. आम्हा म्हाताऱ्यांना काहीसुद्धा व्हायचं नाही. तरणी-ताठी पटकन् जायची. माझी नको हो काळजी.' वामन, हरी निघाले. दारात गाड्या आल्या. सामान भरण्यात आले. नमस्कार करून वामन व हरी गाडीत जाऊन बसले. सुनांनी 'येतो' म्हणूनसुद्धा सांगितले नाही, मग नमस्कार करावयाचे तर दूरच राहिले. त्या आपली मुले-बाळे घेऊन निघाल्या; परंतु नातवंडे 'आजी, आजी' करू लागली. आजीने घ्यावे म्हणून ती रडू लागली. हात पुढे करू लागली. प्रेमळ आजीचा त्यांना लळा लागला होता; परंतु आयांना ते बघवले नाही. त्यांना त्या मुलांचा राग आला.

'आजी-आजी-काय आहे? गप्प बसता की नाही? दोन दिवस नाही आली तर कार्ट्यांना आजी गोड वाटू लागली.' असे म्हणून त्यांनी आपापल्या मुलांचे हात कुस्करले, गालगुचे घेतले. म्हातारीला वाईट वाटले. 'नका ग बोलू--नका ग मारू. मी थोडीच त्यांना येथे ठेवणार आहे?' असे ती म्हणाली.

गाड्या निघाल्या. 'जगा सारी जणं--' म्हातारी म्हणाली. 'पत्र पाठवा-' गोपाळ म्हणाला, बैल पळत गेले. धूळ दिसत होती. काही वेळ गोपाळ बघत होता. मग तो घरात आला. त्याचे डोळे ओले झाले होते.

'गोपाळ, रडू नकोस. तुला मी व मला तू. देव त्यांना तिकडे सुखी ठेवो. उदंड आयुष्य देवो.' ती गोपाळच्या डोक्यावरून हात फिरवीत म्हणाली.

गोपाळ पुन्हा पूर्वीप्रमाणे कामावर जाऊ लागला; परंतु एके दिवशी सायंकाळी घरी आला तो आई निजलेली होती. त्याच्या पोटात धस्स् झाले.

'आई, निजलीसशी?' त्याने घाबऱ्याघाबऱ्या विचारले.

'काही नाही रे. जरा अंग कणकण करीत आहे. तसे विशेष काही नाही.' ती म्हणाली.

जेवणे झाली. गोपाळने आईचे पाय चेपले. आईचे अंग जरा कढत लागले. दुसऱ्या दिवशी तो कामावर गेला. सायंकाळी घरी आला तो आई निजलेली. त्याने आईच्या कपाळाला हात लावला, तो कपाळ कढत कढत लागले. आईला खूप ताप होता. गोपाळने दोन घास खाल्ले व तो आईजवळ बसला.

आईचा ताप सकाळी निघाला नाही. गोपाळ कामावर गेला नाही. एक दिवस झाला, दोन झाले, चार झाले. ताप निघेना. गोपाळ आता कामावर थोडाच जाणार? तो रात्रंदिवस आईजवळ असे. जे उपचार त्याला करता येण्यासारखे होते, ते तो करीत होता. त्याचे कामगार-बंधू त्याला रात्रीच्या वेळी मदत करावयास येत.

आई वामनची व हरीची आठवण करी. गोपाळने शेवटी त्यांना तार केली.

'आले का रे वामन व हरी? लहान जगू आला का? मी आता वाचणार नाही. येणार आहेत का?' आईने विचारले.

'आई, ते आताच गेले. त्यांना रजा कशी मिळणार?' गोपाळ म्हणाला.

'परंतु तारेचं उत्तर आलं का?' तिने विचारले.

'आई, हल्ली तार पोचायला उशीर लागतो.' तो म्हणाला.

'बरं, येऊ दे उत्तर.' ती म्हणाली.

वामन व हरी ह्यांच्याकडून पंधरा रुपये आले. मनीऑर्डरीच्या कुपनावर 'येता येणार नाही.' इतकेच शब्द होते. कशाला ते येतील? सुखाचा जीव दुःखात घालायला कोण येईल? आईजवळ येणे म्हणजे सार्थात येणे, मरणाजवळ येणे. आई म्हातारीच होती. मेली तर सुटेल असे त्या भावांस वाटले असेल.

गोपाळची आई प्राण कंठी धरून होती. चार दिवस झाले.

'आलं का रे उत्तर तारेचं?' तिने विचारले.

'आई, ते काही येत नाहीत. पैसे पाठवले आहेत त्यांनी.' तो म्हणाला.

'बरं हो. त्यांना इकडं बोलावणंच चूक होतं. खरं ना?' ती म्हणाली.

नंतर थोड्या वेळाने ती म्हणाली, 'गोपाळ, बाळ इकडे ये.' गोपाळ आईच्या अगदी जवळ गेला. ती म्हणाली, 'तुझं डोकं जरा खाली कर.' त्याने आपले डोके खाली वाकवले. त्याने आपले तोंड आईच्या तोंडाजवळ नेले. आईने प्रेम,

वत्सलता, मंगलता ह्यांनी भरलेला हात गोपाळच्या तोंडावरून व डोक्यावरून फिरवला. मग ती म्हणाली, 'देव माझ्या गोपाळला काही कमी पडू देणार नाही.' नंतर ती थांबली व पुन्हा म्हणाली, 'माझ्या तोंडात थोडी गंगा घाल. तोंडावर तुळशीचं पान ठेव.' गोपाळ गहिवरून उठला. त्याने देवातील गंगा आणून आईच्या तोंडात घातली. तिच्या ओठांवर तुळशीचे पान ठेवून तो गीता म्हणू लागला. गीता ऐकता ऐकता गोपाळची आई देवाकडे गेली. गोपाळला सारे जग शून्य झाले. ज्यासाठी तो जगत होता, जगला होता, ते त्याच्याजवळून कठोर काळाने हिरावून नेले.

नदीच्या तीरावर गोपाळच्या आईच्या देहाला अग्नी देण्यात आला. गोपाळ मात्र वेडा झाला. तो नदीच्या तीरावर बसे व येणाराजाणारास विचारी, 'कुठं आहे माझी आई ? वामन व हरीकडे गेली ? छे ! ते नेणार नाहीत. मला कंटाळून का ती कुठं गेली ? छे ! ती मला कधीही कंटाळणार नाही. मग कुठं गेली आई ? सांगा, लौकर सांगा.' तो पक्ष्यांना म्हणे, 'दाखवा रे माझी आई.' तो झाडांना म्हणे, 'द्या रे माझी आई. तुमच्यासारखीच ती छाया करणारी होती.'

परंतु एके दिवशी गोपाळही अदृश्य झाला. कोठे गेला तो ? या जगात आईला शोधून ती सापडली नाही म्हणून दुसऱ्या जगात का तो शोधायला गेला ? कोणास माहीत ! वाऱ्याला माहीत असेल; त्या नदीला माहीत असेल; पलीकडील दरीला माहीत असेल; परंतु गोपाळ पुन्हा कोणाच्या नजरेला पडला नाही एवढे मात्र खरे.

त्या गावचे लोक सांगतात की त्या नदीतीरावर अजूनही कधी कधी 'कुठं आहे माझी आई, कुठं गेली माझी आई ?' असे शब्द कानांवर येतात !

* * *

घामाची फुले : कथा आठवी

बहुला गाय

भगवान श्रीकृष्ण गोकुळात अवतरले होते. नंदराजाच्या घरी गाईंचे मोठे खिल्लार होते. स्वतः कृष्ण गाईंना रानात चरावयास घेऊन जाई. त्या गाईंमध्ये बहुला नावाची एक सुंदर गाय होती. तिचा रंग काळासावळा होता. ती पुष्कळ दूध देई, म्हणून तिला बहुला म्हणत. तिची कृष्णदेवावर फार भक्ती होती. एक क्षणभरसुद्धा कृष्णदेवाला ती विसंबत नसे. नेहमी कृष्णाच्या जवळजवळ असावयाची, मधून मधून त्याच्याकडे बघावयाची. कृष्णाची मुरली वाजू लागली, तर खाणेपिणे सारे ती विसरत असे व तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू घळघळ गळत.

एके दिवशी ह्या बहुला गाईचे सत्त्व बघावे अशी कृष्णदेवास इच्छा झाली. भक्तांचा अंकित होण्यापूर्वी परमेश्वर त्यांची परीक्षा घेत असतो. गाई घेऊन रोजच्याप्रमाणे श्रीकृष्ण परमात्मा वनात गेला. यमुनेच्या तीरावर गाई चरू लागल्या. गोपाळ खेळू लागले. त्या दिवशी बहुलेला श्रीकृष्णाने भूल पाडली. बहुला हिरवे हिरवे गवत पाहून चरत चरत लांबवर गेली. कृष्णापासून कधी दूर न जाणारी बहुला कृष्णाला सोडून दूर गेली. तिला स्थळाचे व वेळेचे भान राहिले नाही.

सायंकाळ होत आली. सूर्य मावळण्याची वेळ झाली. कृष्णदेवाने घरी परत जाण्याची खूण म्हणून मुरली वाजवली. साऱ्या गाई गोळा झाल्या. गुराखी कृष्णासह गाई घेऊन घरी निघाले. गोठ्यातून वासरे हंबरत होती. हंबरून गाई उत्तर पाठवीत होत्या. गाई गोठ्यात घुसल्या. वासरे कासेला लागली व ढुशा देऊन देऊन भरपूर दूध पिऊ लागली.

परंतु बहुला कोठे आहे? बहुलेचा बाळ घरी होता. तिच्या वासराचे नाव डुबा होते.

गोजिरवाणा। बहुलेचा बालक तान्हा।।
काळे त्याचे आंग सुंदर
कपाळावरी चांद मनोहर
जसा चन्द्रमा निळ्या नभावर
तैसा जाणा। बहुलेचा बालक तान्हा।।
खुंट रुप्याचा बांधायाला
सोन-सांखळी घालायाला
डुबा आवडे अति सकळांला
मोहन साना।। बहुलेचा बालक तान्हा।।

असा तो डुबा. परन्तु आज त्याची आई कोठे आहे? आज त्याला पान्हा कोण पाजणार? त्याचे अंग प्रेमाने कोण चाटणार? डुबा एकसारखा हंबरत होता; परंतु बहुलेचे प्रेमळ उत्तर त्याला मिळाले नाही. डुबा कावराबावरा झाला. केविलवाणा दिसू लागला.

सायंकाळी बहुला भानावर आली. आपण घोर रानात आहोत'हे तिला कळले. तिला यमुना दिसेना, कृष्ण दिसेना, गाई, गोप दिसेनात. कृष्णाची गोड मुरली ऐकू येईना. बहुला घाबरली. तिला रस्ता दिसेना. सर्वत्र घोर रान माजलेले होते. रानकिड्यांचा किर्र आवाज होत होता. अरण्यातील श्वापदांचे भयंकर गदारोळ तिच्या कानी पडत होते. बहुला भगवंताचा धावा करू लागली. 'देवा, तुला सोडून मी आज कशी रे गेल्ये? तू मला का धरून ठेवलं नाहीस? तुझी मुरली मला का ऐकू आली नाही? हिरव्या हिरव्या गवताला भुलून मी तुला सोडून गेल्ये. मीच पापी आहे, लोभी आहे देवा. कृष्णा, ये. मला भेट. मला थोपट. पुन्हा मी तुझे पाय सोडणार नाही.'

इतक्यात काय चमत्कार झाला, झाडीत सळसळ आवाज झाला. बहुलेला वाटले, कृष्णाच्या पीतांबराचाच आवाज. ती आशेने पाहू लागली. ते पाहा

दोन हिरे, का तारे? कृष्णाच्या मुगुटावरचे का ते हिरे? छे! ते हिरे नव्हते, ते तारे नव्हते. ते वाघाचे डोळे होते. अरे बाप रे! केवढा प्रचंड वाघ. तो वाघ गुरगुरत बाहेर आला. तो वाघ जिभल्या चाटीत होता. गाईला पाहून त्याच्या तोंडाला पाणी सुटले होते.

वाघ पाहून बहुला घाबरली. वाघ बहुलेवर आता उडी मारणार, तिच्या मानेचा घोट घेणार, तोच बहुला करुणवाणीने त्याला म्हणाली, 'वाघोबा, मी तुझ्या तावडीत सापडल्ये खरी. तू मला खा. मी जीवदान मागत नाही, कारण मरणाचं भय मला वाटत नाही. कृष्णाच्या भक्ताला मरणाची डर वाटत नसते; परंतु एक मागणं तुला मागते. माझा बाळ डुबा घरी वाट पाहात असेल. तो हंबरत असेल. त्याला शेवटचा पान्हा पाजून, त्याला निरोप देऊन मी येते. मी खचित येईन.'

वाघ म्हणाला, 'एकदा निसटून गेल्यानंतर तू पुन्हा कशाला येशील? मरणाच्या तोंडात आपण होऊन पडण्याइतकी मूर्ख तू खचित नसशील. हातातील शिकार भोळेपणाने सोडून देण्याइतका मूर्ख मीही नाही. चल, मी तुला मारणार व खाणार. तुझं काही मांस माझ्या आजारी वाघिणीला व तिच्या पिलांना नेऊन देणार. माझी वाघीण वाट पाहात असेल.'

बहुला म्हणाली, 'वाघोबा, तुलाही मुलंबाळं आहेत. मुलांची माया तू जाणतोस. माझ्या मुलाची तुला दया येऊ दे, मी खरंच परत येईन, मी कृष्णदेवाची सखी आहे. मी दिला शब्द पाळीन. सूर्य वरून पडेल, पृथ्वी उडेल, सागर कोरडे होतील, अग्नी थंड होईल; परंतु बहुला सत्यापासून दूर जाणार नाही. माझी परीक्षा तर घेऊन पाहा. वाघोबा, दाखव, जवळचा रस्ता दाखव. मी आत्ता जाऊन येते.'

व्याघ्ररूपी भगवंत म्हणाला, 'बरं आज परीक्षाच घेतो. जा, लौकर जाऊन ये. मी इथं या दगडावर बसून राहातो. तुझा बाळ भुकेला आहे; तशी माझी बाळेही भुकेली आहेत हे लक्षात ठेव.'

बहुलेला एकदम जवळ रस्ता दिसला. इतका वेळ तिला कसा दिसला नाही, कोणास ठाऊक! सन्मार्ग जवळच असतो; परंतु पुष्कळ वेळा तो माणसाला दिसत नाही. बहुला धावपळ करीत निघाली. पुत्रप्रेमाने तिच्या कासेला गळती

लागली होती. तिचे ते चार सड म्हणजे जणू दुधाने भरलेले चार समुद्रच होते. पृथ्वीला, वाटेतील दगडधोंड्यांना दुधाचा अभिषेक करीत ती चालली. पळताना तिला ठेचा लागत होत्या, काटे बोचत होते; परंतु तिचे कशाकडेही लक्ष नव्हते.

घरी डुब्याचा ओरडून ओरडून घसा बसला होता. आज कृष्णदेव आपल्याला आंजारागोंजारायला आला नाही, ह्याचेही त्याला वाईट वाटले. गरीब बिचारा सारखा आईची वाट पाहात होता. ती पाहा हंबरत बहुला आली. डुबा हंबरला. बहुला डुब्याजवळ उभी राहिली. डुबा आईच्या कासेला झोंबला. तो तान्हा अपार पान्हा पिऊ लागला. आज बहुलेचा पान्हा संपता संपेना. डुब्याचे पोट भरता भरेना.

डुबा बहुलेचे दूध पीत होता; बहुला त्याचे अंग चाटत होती; परंतु एकाएकी डुबा चमकला. त्याचे दूध पिणे थांबले. आईच्या डोळ्यांतील कढत अश्रू त्याच्या अंगावर पडले. डुबा आईच्या तोंडाजवळ आला. आईच्या तोंडाला तोंड लावून डुबा रडत रडत म्हणाला, 'आई, का ग रडतेस ? तुला काय झालं ? तू कुणाच्या शेतात चुकून गेलीस होय ? त्यानं तुला मारलं होय ? हे तुझ्या अंगावर खरचटे उठले आहेत. काटेरी काठीनं तुला कुणी झोडपलं वाटतं ?' बहुला म्हणाली, 'बाळ, मला कुणी मारलं नाही. तुझ्यासाठी पळत येत होत्ये. वाटेतील काटेझुडपे लागली व अंग खरचटलं.'

डुबा : मग तू का रडतेस ? कृष्णदेव तुझ्यावर रागावला ? आज मला खाजवायला तो आला नाही. तुला त्यानं इतर गाईंबरोबर का आणलं नाही ? त्यानं तुला हाकलून दिलं होय ? तुला इतका उशीर का झाला ?

बहुला : कृष्णदेव माझ्यावर रागावला नाही. मीच त्याला सोडून दूर निघून गेल्ये.

डुबा : तू का निघून गेलीस ? तू माझ्यावर रागावलीस वाटतं ? दूध पिताना मी तुला ढुश्या देतो, म्हणून रागावलीस ? मी तुझ्याबरोबर वनात येण्याचा हट्ट धरतो म्हणून रागावलीस ? आई, मी हट्ट करणार नाही. तू वनात नेशील तेव्हाच येईन. आता मी गवत खाऊ लागलो आहे. पिताना तुला त्रास होत असेल तर मी दूध पिणार नाही, आई, माझ्यावर रागावू नको. मी का वाईट आहे ?

बहुला गहिवरून म्हणाली, 'बाळ, तुला कोण वाईट म्हणेल? तू गुणांचा आहेस. सारं जग तुझ्यावरून ओवाळून टाकावं असा तू आहेस. तुझ्यावर का मी कधी रागावेन? अरे, पितानां तू मला ढुश्या देतोस, त्यात तर माझं खरं सुख. तुझी एकेक ढुशी लागते व मला अपार पान्हा फुटतो. तुझ्यावर नाही हो मी रागावल्ये.'

डुबा : मग तू का रडतेस? तुझं दुःख मला का सांगत नाहीस? मी का फक्त तुझं दूधच पिऊ? तुझं दुःख नको ऐकू? आई जगात तुला मी व मला तू. तू मला तुझं दुःख सांगणार नसशील तर मी कशाला जगू?

बहुला : बाळ, सारं सांगत्ये, ऐक. आज हिरवं हिरवं गवत पाहून मी लांब चरत गेल्ये. कृष्णाला अंतरल्ये. मला मोह पडला. रात्र पडली तेव्हा मी भानावर आल्ये. तो जवळ ना यमुना, ना गाई, ना गोपाळ, ना कृष्ण, सभोवती भयंकर जंगल. मला रस्ता दिसेना. एकाएकी एक वाघ आला व तो मला खाणार, तोच मी त्याला म्हटलं, 'वाघोबा, माझ्या बाळाला मी शेवटचा पान्हा पाजून येते. त्याला निरोप देऊन येते, मग मला खा. मी खरोखर परत येईन.' डुब्या! वाघाला मी वचन दिलं आहे. आता मला जाऊ दे. मी सत्त्वापासून च्युत कशी होऊ? तू एकटा जगात राहाणार, अजून अंगावर पिणारा म्हणून थोडं वाईट वाटलं; परंतु कृष्णदेव तुला आहे. त्याची कृपा सर्वांना पुरून उरेल. बाळ, आता नीट वाग. फार उड्या मारू नकोस. फार झोंब्या घेऊ नकोस. रानात कृष्णाला सोडून दूर जाऊ नकोस, चांगला मोठा हो. देवाचा लाडका हो.' असे म्हणून बहुलेने डुब्याचे अंग चाटले. डुबा म्हणाला, 'आई, मीच त्या वाघाकडे जातो. तू जगात राहा. तुला माझ्यासारखी आणखी बाळं होतील. मी तुझ्याच पोटी पुन्हा येईन; तुझं बाळ होईन. मला जाऊ दे. तुझ्या दुधावर व तुझ्या कृपेवर पोसलेला हा देह तुझ्याच कामी येऊ दे. माझं सोनं होईल. मी कृतार्थ होईन.'

बहुला सद्गदित होऊन बोलली, 'बाळ, तू अजून लहान आहेस. वाघाचे कठोर पंजे तुझ्या कोवळ्या शरीराला कसे सहन होतील? तू मोठा हो. एक दिवस सत्त्वासाठी मरण्याचं भाग्य तुलाही लाभेल; परंतु आज हट्ट नको करू. आईचं ऐकावं हो बाळ.'

डुबा म्हणाला, 'आई, तुझं दुसरं सारं ऐकेन, परंतु या बाबतीत नाही. मी एक तोड सुचवतो. आपण वाघोबाकडे दोघेजण जाऊ व त्याला मी सांगेन, 'मला खा.' तू सांग, 'मला खा.' वाघाला ज्याचं शरीर आवडेल त्याला तो खाईल.'

बहुला व डुबा वनात जाण्यासाठी निघाली. अजून प्रहरभर रात्र उरली होती. आकाशात तारे स्वच्छ चमकत होते. हजारो डोळ्यांनी आकाश त्या मायलेकरांकडे पाहात होते. डुबा पुढे चालला होता. वनातून येताना आईचे दूध वाटेवर सांडले होते, त्या खुणेने तो चालला होता. बहुलेचे वाटेवर सांडत गेलेले ते गोड दूध साप पीत होते; परंतु त्या सापांकडे त्या गायवासरांचे लक्ष नव्हते. रानातील तरुवेलींवर असंख्य फुले फुलली होती. त्यांचा सुगंध सर्वत्र भरून राहिला होता. मंद वाऱ्यावरोबर सर्वत्र पसरत होता. जणू तो बहुलेच्या सत्यनिष्ठेचा सुगंध होता! वृक्षांच्या पानांवर टपटप बिंदू पडत होते. जणू निसर्गदेवता त्या मायलेकरांसाठी अनंत अश्रू ढाळीत होती.

बहुला व डुबा कोणी बोलत नव्हते, बोलणे त्यांना शक्यच नव्हते. भरलेल्या अंतःकरणाने, भरलेल्या डोळ्यांनी दोघे मुकाट्याने चालली होती. दोघे वाघाच्या जवळ आली. वाघ करकर दाढा खात होता. वाघाला पाहून डुबा जरा घाबरला. तो बहुलेच्या अंगाला बिलगला. बहुला त्याला म्हणाली, 'बाळ माघारी जा.' डुबा म्हणाला, 'मी भ्यायलो नाही काही, हा बघ पुढं होतो.' असे म्हणून उड्या मारीत डुबा वाघासमोर जाऊन उभा राहिला. तो वाघाजवळ बोलू लागला.

डुबा : तूच का रे तो वाघोबा? माझ्या आईला खाणारा तूच ना? वाघोबा, माझ्या आईला खाऊ नकोस. तू मला खा. माझी प्रार्थना ऐक.

बहुला : नको रे वाघोबा. त्या वेड्याचं काय ऐकतोस? तू आपला मला खा हो.

वाघ : बहुले, इतका उशीर का झाला? मी म्हटलं, तू येतेस की नाही? न येण्याचं ठरवीत होतीस ना?

बहुला : नाही रे वाघोबा. हा डुबा ऐकेना. रोज सांगितलेलं ऐकतो. इवलासुद्धा हट्ट धरून बसत नाही; परंतु आज ऐकेना. म्हणे, 'मलाच जाऊ दे.' त्याची समजूत घालण्यात वेळ गेला. शेवटी तो आलाच बरोबर. रागावू नकोस काही. फसवण्याचं स्वप्नातसुद्धा माझ्या मनात आलं नाही. ही मी तयार

आहे. तुझी वाघीण, तुझी पिलं भुकेली असतील. त्यांना लौकर माझा ताजाताजा घास नेऊन दे.'

डुबा : वाघोबा, नको रे आईला खाऊ. माझं अंग बघ कसं लोण्यासारखं मऊमऊ आहे. माझं अंग तुला आवडेल, तुझ्या पिलांना आवडेल.

बहुला : त्याला खाऊन साऱ्यांची भूक कशी शमणार? वाघोबा, तू मलाच खा. मी हाडापेरानं मोठी आहे, तुम्हा सर्वांचं पोट भरेल.

वाघ : मी तुम्हाला दोघांना मारून टाकतो. तुम्हा दोघांना आमच्या पोटात ठेवतो. गोठ्यात एके ठिकाणी असता, आता पोटात एके ठिकाणी राहा. डुब्याचं मांस - कोवळं कोवळं - माझ्या पिलांना फारच आवडेल. तुझं वाघिणीला आवडेल. चला. तयार व्हा. आता उशीर नको. बहुला, डुबा, माना खाली घालून तिथं बसा. देवाचं स्मरण करा.

मायलेकरं खाली माना घालून बसली; परंतु डुबा पुन्हा उठून म्हणाला, 'वाघोबा, खायचंच तर मला आधी खा. आईला फाडलेलं माझ्यानं पाहावणार नाही; परंतु आई मोठी आहे. धीराची आहे. तिच्या सत्त्वाला सीमा नाही. मला फाडलेलं पाहाण्याचं धैर्य तिच्याजवळ आहे.'

वाघ : गप्प बस. बोलणं पुरे. मरायची वेळ आली तरी चुरुचुरू बोलतच आहे.

डुबा : मला मरणाची भीती थोडीच आहे!

बहुला : बाळ, आता पुरे. कृष्णदेवाचं स्मरण कर. आता बोलू नको. मरणाच्या वेळेस गर्व नको. फुशारकी नको.

मायलेकरे तयार झाली. मरणाची वाट पाहू लागली. वाघाचे भयंकर पंजे आधी कुणाच्या अंगावर पडतात, त्याचे तीक्ष्ण दात आधी कोणाला फाडतात, ह्याची वाट पाहू लागली; परंतु छेः, ह्या गोष्टीकडे त्यांचे लक्ष नव्हते. कृष्णदेवाचे ध्यान करण्यात ती दोघे रंगली होती. वाघबीघ विसरून गेली होती.

आकाशातून पुष्पवृष्टी झाली. बहुला व डुबा ह्यांच्या अंगावर वाघाची उडी पडण्याऐवजी फुले पडली. मायलेकरे चपापली. ती वर पाहू लागली, तो फुलांचा वर्षाव होत होता. वाघाला ती पाहू लागली. वाघ कोठेच दिसेना. बहुला व डुबा उभी राहिली, तो त्यांना समोर कोण दिसले?

पालनवाला। श्रीकृष्ण तिथे अवतरला।।

मोरमुकुट तो माथ्यावरती
मंजुळ मुरली धरली ओठी
गळ्यात डोले सु-वैजयंती
प्रभुवर आला।। श्रीकृष्ण तिथे अवतरला।।

रक्षण भक्तांचे करणारा
भक्षण असुरांचे करणारा
श्यामसावळा गिरि धरणारा
धावत आला।। श्रीकृष्ण तिथे अवतरला।।

उभा राहिला देव येउनी
हृदयी गेला उचंबळोनी
बहुलेच्या सत्त्वास पाहुनी
अतिशय धाला।। श्रीकृष्ण तिथे अवतरला।।

कृष्ण परमात्म्यास समोर पाहून बहुलेने आपले मस्तक त्याच्या चरणांवर ठेवले. डुब्यानेही तसेच केले. कृष्णदेवाने आपल्या अमृतस्पर्शी हस्ताने डुब्याला थोपटले. देव म्हणाला, 'बहुले, बाई कष्टी होऊ नकोस. तू माझ्या परीक्षेत उतरलीस. आता मी कायमचा तुझा सेवक आहे आणि डुब्या तूही आईला शोभेसा आहेस. आईची परंपरा पुढं चालवशील. बहुले, तुला जे मागावयाचं असेल ते माग. मी प्रसन्न झालो आहे.' बहुला म्हणाली, 'देवा, हिरवं हिरवं गवत पाहून तुझ्याजवळून दूर जाण्याचा मोह मला कधी न होवो. नेहमी तुझ्याजवळ राहाण्याचीच इच्छा आम्हा मायलेकरांस होवो. दुसरं काय मागू?'

* * *

घामाची फुले : कथा नववी

घामाची फुले

आपल्या वर्गातील मुले घेऊन गुरुजी त्या दिवशी वनभोजनासाठी गेले होते. मुलांना खूप आनंद होत होता. आज मोकळेपणा होता. हसणे खेळणे चालले होते. प्रत्येकाने बरोबर शिदोरी आणली होती. काव्यशास्त्रविनोद करीत गुरुजी व विद्यार्थी जात होते.

पावसाळा संपत आला होता. हस्ताचे नक्षत्र सुरू होते. 'हस्ताचे पाणी। मुबलक पीक आणी।' अशी म्हण आहे. हस्ताचा पाऊसही पडला होता. शेतभाते सुंदर दिसत होती. शेतकरी आनंदला होता.

'साऱ्या जगात चांगलं पाणी कोणतं? पवित्र पाणी कोणतं? मोलवान पाणी कोणतं?' गुरुजींनी प्रश्न केला.

'गंगेचं पाणी सर्वांत पवित्र.' सदू म्हणाला.

'पावसाचं पाणी सर्वांत महत्त्वाचं.' विनू म्हणाला.

'सिंहगडचं देवटाक्यातील पाणी फार चांगलं.' शंकर म्हणाला.

'पश्चात्तापामुळं डोळ्यांतून पाणी येते ते सर्वांत थोर.' विचार करणारा लक्ष्मण म्हणाला.

'प्रेमासाठी मनुष्य रडतो, ते पाणी खरं.' प्रेमळ नामदेव म्हणाला.

मुले अशी उत्तरे देत होती; परंतु त्या उत्तरांनी गुरुजींचे समाधान झाले नाही. 'कुणाचं उत्तर बरोबर?' उत्तर न देणाऱ्या मधूने विचारले. 'माझ्या मनातील उत्तर कुणीच दिलं नाही.' गुरुजी म्हणाले.

'म्हणूनच मी उत्तर दिलं नाही. उगीच कशाला सांगा.' हसत मधू म्हणाला. 'तुमच्या मनात कोणतं आहे उत्तर?' मुलांनी विचारले.

'मी एक गोष्ट सांगतो. त्यावरून कळेल.' गुरुजी म्हणाले. मुलांना गोष्टीहून अधिक प्रिय काय आहे? गोष्ट सांगतो म्हणताच सारे विद्यार्थी जवळ आले. मधू मागे रेंगाळत होता. तो गर्दी करून गुरुजींच्या अगदी जवळ येऊन चालू लागला. गोष्टीला आरंभ झाला--

राम व लक्ष्मण सीतेचा शोध करीत वनातून जात होते. वाटेत त्यांना भिल्लीण भेटली, शबरी भेटली. रामासाठी ती वाट पाहात होती. रामासाठी तिने गोड फळे आणून ठेवली होती. शबरीने रामाची पूजा केली. त्यांच्यापुढे ती फळे ठेवली.

जेथे शबरी राहात होती, तो एक जुना आश्रम होता. तेथे आता ती एकटीच राहात होती. त्या आश्रमाच्या समोर दूरवरपर्यंत दृष्टी जाईल तेथवर फुलेच फुले दिसत होती. सुंदर सुगंधी फुले. रामचंद्र सारखे त्या फुलांकडे बघत होते. शेवटी ते शबरीला म्हणाले, 'शबरी, कुणी लावली ही फुलं? कशी दिसतात छान! वासही किती गोड येत आहे!'

शबरी म्हणाली, 'रामा, तो एक इतिहास आहे. मी सांगत्ये ऐका. पुष्कळ वर्षांपूर्वी इथं मतंग ऋषींचा आश्रम होता. त्यांची कीर्ती सर्वत्र पसरली होती. नाना ठिकाणचे विद्यार्थी त्यांच्या आश्रमात शिकण्यासाठी येऊन राहिले. भिल्लांची मुलंही शिकण्यासाठी येऊ लागली. मतंग ऋषी फार प्रेमळ. ते जसे प्रेमाचे सागर होते, तसेच ज्ञानाचे. आपल्या आश्रमातील मुलं पुढं चांगली व्हावीत म्हणून ते झटत.

एकदा काय झालं? उन्हाळा संपत येत होता. थोड्याच दिवसांनी रोहिणी, मृग ही पावसाची नक्षत्रं सुरू होणार होती; परंतु पावसाळ्यासाठी म्हणून आश्रमात जळणाची काहीच तरतूद केलेली नव्हती, लाकडे साठवलेली नव्हती. पावसात का ओली लाकडे पेटणार? स्वयंपाक कसा होणार? उन्हाळ्याचे अद्याप चार दिवस आहेत, तोच जंगलातून वाळलेल्या लाकडांच्या मोळ्या आणून ठेवल्या पाहिजे होत्या; परंतु कोण जाणार व आणणार?

मुलं आपण होऊन रानात जातील असं मतंग ऋषींना वाटत होतं; परंतु मुलं गेली नाहीत. शेवटी एके दिवशी वृद्ध मतंग ऋषी हातात कुऱ्हाड घेऊन निघाले ते निघाले. असं पाहाताच सारी मुलंही निघाली. आश्रमात उतरलेले

मोठेमोठे ऋषीमुनी तेही निघाले. महापुरुष पुढं होताच सारी दुनिया त्याच्या पाठोपाठ येऊ लागते.

सर्व लहानथोर मंडळी रानात गेली. लाकडे तोडू लागली. लाकडांचा ढीग पडला. मग लहानमोठ्या मोळ्या बांधण्यात आल्या. लहानांच्या डोक्यावर लहान, मोठ्यांच्या डोक्यावर मोठ्या. स्वतः मतंग ऋषींनीही डोक्यावर मोळी घेतली होती. मंडळी आश्रमात येण्यासाठी निघाली. तिसरा प्रहर होत आला. सर्व घामाधूम झाले. अंगातून घाम ठिपकत होता. ते घामाचे थेंब भूमीवर पडत होते.

आश्रम आला. सर्वांनी विसावा घेतला. आज रात्री अध्ययन नव्हतं. सर्व मंडळी लौकरच झोपली. सारे थकले होते. भगवान मतंग ऋषी मात्र ध्यान करीत होते. आपल्या आश्रमातील मुलं पुढे चांगली निघोत, जगाची सेवा करोत, अशी ते प्रभूला प्रार्थना करीत होते.

पहाट झाली. मतंग ऋषींनी गोड हाका मारून मुलांना उठवलं. मुलं बरोबर घेऊन ते नित्याप्रमाणे नदीवर निघाले; तो काय आश्चर्य! एकाएकी वास आला. सुंदर सुगंध आला. 'कुठून येतो हा गोड वास?' मुले म्हणू लागली. 'जा, शोध लावा.' मतंग ऋषी म्हणाले.

त्या सुगंधाचा शोध लावण्यासाठी मुले निघाली. ज्या बाजूने वास येत होता, त्या बाजूने निघाली. ज्या रस्त्याने काल ती रानात गेली होती व परत आली होती, त्या रस्त्याच्या बाजूने सुगंध येत होता. मुले तिकडे वळली. रामा, त्या मुलांना काय बरे दिसले? त्या मुलांना ठायी ठायी सुंदर फुले फुललेली दिसली. कोठून आली ती फुले? काल नव्हती. एकदम कोठून आली? आकाशातील तारे का आश्रमासमोर येऊन पवित्र होऊ पाहात होते? कोणी लावली ती फुले?

मुले धावत मतंग ऋषींजवळ आली. त्यांनी ती आश्चर्यकथा गुरूंना सांगितली. मतंग ऋषी स्वतः मुलांबरोबर तो अपूर्व देखावा पाहावयास गेले. सूर्याचे कोवळे किरण येत होते. त्या फुलांवर ते नाचू लागत होते. त्या फुलांचे जणू ते चुंबन घेत होते. सुंदर, अपूर्व देखावा! मतंग ऋषी पाहातच राहिले. त्यांनीही भक्तिप्रेमाने त्या फुलांना हात लावून वंदन केले.

'भगवन्, कुठून आली ही फुलं?' मुलांनी विचारले.

'तुमच्या घामातून. काल ह्या रस्त्यानं डोक्यावर मोळ्या घेऊन तुम्ही आलात. तुमच्या अंगातून घाम निथळत होता. ह्या पृथ्वीवर तो गळत होता. श्रमांचा पवित्र घाम. निढळाचा घाम. त्याहून पवित्र काय आहे? तुम्ही कसे श्रमलेत, कसे घामाघूम झालेत, हे पाहाण्यासाठी जणू भूमातेनं हे हजारो डोळे उघडले आहेत. तिचं हृदय तुमचे श्रम पाहून जणू फुललं. मुलांनो, श्रमासारखं पवित्र काही नाही; श्रमाचा घाम म्हणजेच देवाचं नाम. तुमच्या मनावर हे ठसविण्यासाठी जिथं जिथं तुमचा घाम पडला तिथं तिथं देवानं फुलं फुलवली आहेत. तुम्ही श्रमांना कंटाळू नये, म्हणून श्रमांचा महिमा प्रभू तुम्हाला ह्या फुलांच्या रूपानं शिकवीत आहे. श्रमांचा घाम नसेल तर जग कसं चालेल? शेतकरी श्रमणार नाही, त्याचा घाम शेतात पडणार नाही, तर शेतं कशी पिकतील? विणकर वस्त्रं विणताना दमणार नाही, तर अंगावर काय घालाल?

घरं बांधणारे श्रम करून तुमची घरं बांधून न देतील तर राहाल कुठं? ही दुनिया श्रमणाऱ्या लोकांमुळं चालली आहे. तुम्ही मोठे झालेत म्हणजे स्वतः श्रमा. श्रमणाऱ्या लोकांना मान द्या. वेदामध्ये एका थोर महर्षीनं लिहिलं आहे-

'न हि श्रान्तस्य ऋते सख्याय देवाः।'

म्हणजे जो दमलेला नसेल, त्याची मैत्री देव करीत नाही. देव त्याचाच हात प्रेमानं हातात घेईल, ज्याचा हात काम करून दमलेला आहे, काही तरी जगात मंगल निर्माण करण्यासाठी दमलेला आहे. आळशाचा, ऐतखाऊचा देव मित्र नाही. समजलेत ना? आता कधी कामाचा कंटाळा करू नका. समजलं ना?' मतंग ऋषींनी प्रेमाने विचारले.

'होय गुरुजी. आम्ही काम करू. कोणतंही काम करावयास लाजणार नाही. श्रमणाऱ्या लोकांना तुच्छ मानणार नाही. त्यांना मान देऊ, त्यांच्यामुळं दुनिया चालली आहे असं सदैव मनात बाळगून त्यांच्याविषयी कृतज्ञ राहू. ते आधी सुखात आहेत की नाही ते पाहू.' मुले मतंग ऋषींस म्हणाली.

'रामा, असा ह्या फुलांचा इतिहास आहे. ही फुले मेली नाहीत. नेहमी बारा महिने फुलतात. त्यांना कोणी पाणी घालो वा न घालो. ती सदैव टवटवीत, घवघवीत दिसतात. जणू तो घामाचा एक थेंब अनन्त काळपर्यंत त्यांस ओलावा देणार आहे. ह्या आश्रमात आता कोणी नाही. भगवान मतंग ऋषी निजधामास गेले; मग इथं कोण राहाणार? इथं ना आता विद्यार्थी, ना कोणी ऋषिमुनी.

परंतु ही फुलं मुकेपणानं मतंग ऋषींचा महिमा जगाला सांगत आहेत. रामा, तुला देऊ का फुलं तोडून ?'

'नको. त्या फुलांना मला वंदन करू दे. ती फुलं म्हणजे त्या महर्षींची तपस्या, त्या महर्षींची पुण्याई.' असे म्हणून रामाने त्या फुलांस प्रणाम केला.लक्ष्मणानेही केला. रामलक्ष्मण निघून गेले. फुलांचा सुवास त्यांच्याबरोबर जात होता. शबरीची भक्ती व मतंग ऋषींची पुण्याई त्यांच्याबरोबर जात होती.

गुरुजी थांबले. मुले बोलत नव्हती. सारे मुकाट्याने चालत होते.

'संपली का गोष्ट ?' मधूने विचारले. 'संपली.' गुरुजी म्हणाले. 'मग कोणतं पाणी चांगलं ?' मधूने विचारले. 'घामाचं पाणी.' लक्ष्मण म्हणाला.

'श्रीमंतांना तर सारखा घाम येतो. गादीवर लोळून घाम येतो. अंगावर खूप कपडे असल्यामुळं घाम येतो. कोणा कोणाच्या अंगात खूप वात असतो. त्यांना किती घाम येतो देव जाणे !' मधू म्हणाला.

'तो घाम नव्हे. ज्या घामातून काही तरी उपयोगी निर्माण होतं, सर्वांना लागणाऱ्या वस्तू निर्माण होतात, धान्य, फुलं, फळं, घरं, दारं, कपडे, नाना संसारोपयोगी वस्तू निर्माण होतात, तो घाम पवित्र. प्रामाणिक श्रमांचा निढळाचा घाम. तो घाम ज्याच्या डोक्यातून, ज्याच्या अंगातून निघतो, तो पवित्र; तो पूज्य; तो युक्त; तो खरा मनुष्य; परंतु आज त्यांचीच दैना आहे. तुम्ही त्या श्रमणाऱ्यांची उद्या मोठे झालेत म्हणजे बाजू घ्या. त्यांचे संसार सुखाचे करा.' गुरुजी म्हणाले.

* * *

समाप्त

* * *

बाल कुमार वाचकांसाठी पुस्तकेच पुस्तके

छोट्यांसाठी मोठ्याटाईपाची सचित्र पुस्तके

बालपंचतंत्र १ ते ५, त्र्यं. पु. थोरात ▪ छान गोष्टी १ ते ७, मालतीबाई दांडेकर
गोष्टींचा तास १ ते ११, भा. म. वैद्य ▪ बाल कल्पना रम्यकथा १ ते ३, बाललेखक
मनोरंजक नीतिपाठ १ ते ४ ग. म. वैद्य ▪ नवलकथा १ ते ९, गो. वि. रानडे
गमतीच्या गोष्टी, नेरूरकर ▪ सुरस गोष्टी, ग. म. वैद्य ▪ मौजेच्या गोष्टी, वैद्य.

कुमारांसाठी मनोरंजक व बोधप्रद पुस्तके

मनोरंजक सुबोध गोष्टी १ ते ६ डॉ. पाटणकर ▪ सदाशिव शेलार, इंगवले
सानेगुरुजींच्या गोड गोष्टी १ ते १० ▪ दिन्या मिनीची धमाल, देशपांडे
गोट्या भाग १ ते ३, चिंगी, खडकावरला अंकुर, ना. धों. ताम्हनकर,
गणितातील गमती, वा. मो. कोळेकर ▪ रंगीत अक्षरे, गो. वि. नामजोशी
सिंहासन बत्तिशी, घैसास ▪ बाल हितोपदेश, थोरात ▪ जादूची होडी, शिरवाडकर

अध्यात्माची आवड निर्माण करणारी संतचरित्रे

राष्ट्रगुरु समर्थ रामदास, न. प. महाजन ▪ अक्कलकोट स्वामी महाराज, मालपाठक
शेगावचे गजानन महाराज, मालपाठक ▪ स्वामी मुक्तानंद, वसंतराव मालपाठक
स्वामी विवेकानंदांची गोष्ट, वैद्य ▪ रामकृष्ण परमहंसांची गोष्ट, ग. म. वैद्य
स्वामी नित्यानंद ▪ ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज, ▪ जे. कृष्णमूर्ती, कृष्णप्रेमी
साईबाबा हाच चमत्कार, डॉ. गवाणकर ▪ स्वामी स्वरूपानंद. शांताराम थत्ते.

पाश्चात्य वाङ्मयाचे मराठीत सुरेख रूपांतर

रॉबिनहुड आणि त्याचे रंगेल गडी, भा. रा. भागवत ▪ डॉन क्विझोट, मा. पं. शिखरे
तीन शिलेदार, सौ. उषा आपटे ▪ ▪ ▪ वीस वर्षांनंतर, सौ. उषा आपटे
बाल अरेबियन नाइटस् १ व २ थोरात ▪ ऑलिव्हर ट्विस्ट, दत्त आपटे
गलिव्हरचे प्रवास, भा. म. गोरे ▪ ▪ ▪ रॉबिन्सन क्रूसो, वि. स. सुखठणकर
सिंदबादच्या ७ सफरी, अ. वा. मराठे ▪ पुढे व्हा! १ ते ३, यदुनाथ थत्ते.
पॉकेट डिक्शनरी (इंग्लिश - मराठी) ▪ मॉडर्न डिक्शनरी (इंग्लिश - इंग्लिश - मराठी)
स्टॅण्डर्ड डिक्शनरी १ ते ३ (मराठी - इंगजी - मराठी) ▪ सुलभ हिन्दी - मराठी शब्दकोश
मराठी शब्द रत्नाकर ▪ संस्कृत डिक्शनरी (संस्कृत - इंग्लिश - मराठी - गुजराती)

संपूर्ण यादी मागवावी. विनामूल्य पाठविण्यात येते.

केशव भिकाजी ढवळे

श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगाव, मुंबई - ४०० ००४.

साने गुरुजींच्या गोड गोष्टी : १ ते १०

भाग पहिला : खरा मित्र

आवडती नावडती, तीन मस्करी, न्याय देणारा गुराखी, गोसावी, सोन्याची साखळी आणि खरा मित्र अशा या सहा गोष्टी जिव्हाळा आणि ध्येयनिष्ठा निर्माण करतात.

भाग दुसरा : घामाची फुले

या नऊ विविध गोष्टी म्हणजे मुलांना मेजवानीच! मनोरंजनाबरोबरच नीतिमूल्यांचे दर्शन घडविणाऱ्या या गोड गोष्टी प्रत्येकाच्या जीवनात ध्येय निर्माण करतील.

भाग तिसरा : मनूबाबा

सिलास मार्नरची ही भावपूर्ण कथा. ज्यावेळेस जीवनाचा उपयोग एखाद्या ध्येयासाठी होऊ लागतो तेव्हाच जीवनाचा विकास होऊ लागतो. जीवनाला अर्थ प्राप्त होऊ लागतो.

भाग चौथा : फुलाचा प्रयोग

कृष्णकमळीच्या फुलावर सोनेरी छटा उमटवून दाखविणाऱ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस जाहीर केलेले होते. फुलाला मिळाले का ते? भावपूर्ण हृदयस्पर्शी कथा.

भाग पाचवा : दुःखी

व्हिक्टर ह्यूगोच्या 'ला मिझरेबल'ची ही हृदयस्पर्शी कथा. वालजी चोर होता. एका साधूने त्याला आपली चूक सुधारण्याची एक संधी दिली आणि वालजीचा महात्मा झाला.

भाग सहावा : सोराब नि रुस्तुम

वडील आणि मुलगा यांचे अनोळखी अवस्थेतील द्वंद्व आज जगात अजरामर झाले आहे. या पुस्तकातील इतर चार कथाही मनाचा वेध घेणाऱ्याच आहेत.

भाग सातवा : बेबी सरोजा

जीवनात कितीही संकटे आली, आपत्त्या आल्या तरी सत्य सोडू नये, दलितांविषयी प्रेमभाव ठेवावा. परमेश्वरावर विश्वास ठेवावा. हे पटवून देणारी तामीळ भाषेतील हृदयस्पर्शी कथा.

भाग आठवा : करुणा देवी

शिरीष करुणेला विसरला पण करुणेने कर्तव्याचा सुगंध दरवळत ठेवणारी आपली ज्योत सतत तेवत ठेवली आणि शिरीषच्या अंतरातील विझलेला दीप पुन्हा लावला.

भाग नववा : यती कि पती

यती होण्यासाठी संसाराचा त्याग करण्याचा प्रयत्न विजयने केला; परंतु मुक्तीचा मार्ग आपल्या सारख्या भावनोत्कट वृत्तीच्या माणसाला अनुरूप नाही हे त्याला पटले.

भाग दहावा : चित्रा नि चारू

चित्रा नि तिची मुसलमान मैत्रीण फातमा. मैत्रीच्या कर्तव्यापासून निर्माण झालेली चित्रा नि चारूची ही करुणागम्य कथा चित्राच्या वडिलांच्या प्रेमाचीही साक्ष पटविते.

केशव भिकाजी ढवळे

श्रीसमर्थ सदन, पहिली भटवाडी, गिरगांव, मुंबई ४